# वऱ्हाडसमाचार.

## THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR

VOL. IV AKOLA:—SATURDAY EVENING, MAY 1, 1869 NO. 17

पुस्तक ४ अकोला, शनिवार सायंकाळ तारीख १ माहे मे सन १८६९ इ० अंक १७

## आगगाडीकारितां लाकडी रस्ते.

विद्वान व शोधक पुरुषांचीं परोपरीचीं अद्भुत कृत्यें पाहून व त्यांविषयीं ऐकून मनास परमाल्हाद होतो. आगीच्या गाडीची कल्पना किती अपूर्व आहे? बराएवढाल्या मोठ्या शेकडो गाड्यांची माळ शेकडो मनुष्यें आंत बसून व हजारो खंडी माल भरून घोडा बैल वगैरे कसल्याही वाहनावाचून वायुवेगाप्रमाणें दिवसांतून दोन दोनशें कोस पळत जाते व मनुष्यांस यत्किंचितही श्रम होत नाहींत ही किती उत्तम गोष्ट आहे? आपण प्रथमच आगगाडीची कळा व तिचा खटाटोप पाहिला म्हणजे आपलें मन अगदीं गुंग होऊन जातें. व त्या कारखान्यांत आतां कांहीं अपूर्णता राहिली आहे असें कांहींमात्रही आपले मनांत येत नाहीं परंतु शोधक पुरुषाचें चंचल चित्त हरएक यांत्रिक कलाकुशलतेच्या कामीं पहिल्याहून अधिक उपयोगी, किंवा सुखावह, किंवा कमी खर्चाची, किंवा कमी श्रमाची नवी परकाढण्याविषयीं रात्रंदिवस भ्रमत असते व त्यांच्या योजनेनें या पृथ्वीवर अनंत प्रकारचे फायदे झाले आहेत, होत आहेत, व पुढें होणार आहेत. आणि हा विच्यार मनांत भरला म्हणजे वाटतें कीं तेच पुरुष या जगांत कृतकार्य झाले. अस्तु.

आगगाडीकडे आपल्या साध्या सडका कामास येत नाहींत त्यांजवर लोखंडाचे रेल पसरावे लागतात हें सर्वांस माहित आहेच परंतु अमेरिका खंडांत हल्लीं अशी युक्ति निघाली आहे कीं लोखंडाच्या ऐवजीं लांकडाचे रेल करून त्यांवरून आगगाडी चालवावी असा २० मैल लाकडाचा रेलवे तयार झाला आहे. व तो आगगाडीच्या कामास पाहिजे तसा उपयोगी पडतो असा अनुभव पाहिल्यावरून पुढें आणखी ही लाकडाचे रेल घालण्याचें काम चालू झालें आहे. व हे रेल घालण्यास एक मैलास सुमारें सवासातशें रुपये लागतात असा हिशेब काढिला आहे.

ही किती चांगली व थोड्या खर्चाची कल्पना निघाली. आम्ही इच्छितों कीं ही उत्तम व बिनधोक असेल तर आपल्या हिंदुस्थानांत रेलवेच्या शाखा बहुत ठिकाणीं होण्यास आवश्यक आहेत व मोठ्या खर्चाचे नोखमामुळें त्या व्हावयाच्या लांबणीवर पडल्या आहेत त्यांचे कामीं या लाकडी रेलाची योजना करण्याकरितां आपले हिंदुस्थानांतील निवळ नेटिव व्यापाऱ्यांची एक कंपनी व्हावी व तिनें जागोजाग शाखा कराव्या.

या कामीं आणखी जसजशी माहिती लागेल तसतशी ती आम्हीं आपले वाचकांकरितां अगत्य लिहूं. सध्या लोकांत या लाकडी रेलाची गोष्ट निघाली आहे तर ते म्हणत आहेत कीं लाकडाचे रेल टिकतील कसे? व गाड्यांचीं चाकें त्यांवर घासूं लागलीं म्हणजे रेल जळणार नाहींत काय? इत्यादि. तर आम्ही म्हणतों कीं याचें निराकारण त्या शोधक पुरुषानीं केल्या वाचून राहिलें नसेल व तें लवकरच इकडेही प्रसिद्धीस येईल.

(लिहून आलेला मजकूर.)

**आग**—या उन्हाळ्या दिवसांत बहुतकरून चहूंकडे आगीचा उपद्रव असतो त्यांत याप्रांतीं फारच नजरेस येतो. शेलगाव, नायगाव, देउळगाव, सीरलें, चतारी, वगैरे आस पासचें गावीं आगीचा उपद्रव होऊन बरेंच नुकसान जाहालें. येविशीं सरकारांत पोलिस चौकशी करून रिपोर्ट करितें परंतु त्या लोकांवर जशीं कपड्याची "दरेस (ड्रेस)" वास्तविक पोकळपणा दिसण्यांत मात्र भरदार कलई असते त्याप्रमाणें त्या चौकशीस कल्हइची झीलइ दिलेली असते; येविशीं बहुत लिहावयाचें आहे तें पुढें लिहुं. तुर्त लोकांविशीं विचार करितां इकडील लोकांस पुर्वीच्या मोंगलाइतील जी चाल लागली आहे ती अद्याप गेली नाहीं. मोंगलाइ मध्यें मक्तेदार तालुकदार व जमेदार यांचा त्रास फारही जहाला कीं, दुसरे तालुक्यांत जलद सटकन पळुन जातां यावे म्हणुन मुळींच सरासरी निर्वाहाचीं घरें बांधावयाचीं त्यांस सवय पडुन गेली. त्यांची जिनगी कायती ढोरें. खंडी दोन खंडी काय असतील तीं व बाकी थोडें भांडें कुंडें तें गाडींत घालुन येके खेपेनें त्यांस आपली सर्व मालमत्ता घेउन येकेठिकाणांहुन दुसरे ठिकाणीं पळुन जातां येतें परंतु सांप्रत आमचें इंग्रजसरकारचें कारकिर्दींत त्यांत ही पैमाष जमाबंदी जाहाले ठिकाणीं ठरलेले रकमे पेक्षां येक कवडी ही कोणी ज्यास्त घेण्यास समर्थ नाहीं. जमेदार, तहसीलदार वगैरेकडून ईजा पोंचल्यास दादलाऊन बंदोबस्त कराविण्याचे मार्ग चांगले खुले आहेत. अशाप्रकारची समज अज्ञान कुलबीवगैरे लोकांस सरकारानें व वर्तमानपत्रांनीं देऊन त्यांचीं मनें शांत करणें अगदीं अगत्याचें आहे. बहुतेक घरें छपरीं व हंगामी दाखल असतात म्हणून फार नाशकारक अनर्थ होतात यांजकरितां लोकांस समज देऊन चांगलीं घरें बांधणेंविशीं यत्न केल्यास उभयतांसही श्रेयस्कार आहे जाणून कळवळीनें सुज्ञ लोकांनीं ईकडे लक्ष्य पुरवावे अशी त्यांस शीफारस आहे.

## शोध लावण्यासारखा नवीन विषय.

(नेटिव ओपिनियन वरून)

वृद्ध व जुन्या अशा पुष्कळ मनुष्यांच्या सांगण्यांत असें आहे कीं पूर्वीं जाप्रमाणें पाऊस पडत असे तसा आतां पडत नाहीं पूर्वीं जा नद्यांस बारा महिने पाणी रहात असे त्या नद्यांस आतां उष्णकाळांत मुळींच पाणी रहात नाहीं. पूर्वीं अमक्या विहिरीस अथांग पाणी असे परंतु तीच विहिर आतां उन्हाळा आला म्हणजे आटते. अशा तऱ्हेच्या पर्जन्याविषयीं अनेक प्रकारच्या गोष्टी वृद्ध मनुष्यांच्या मुखांतून पुष्कळांनीं ऐकल्या असतील. आमच्या लहानपणीं जसा पाऊस पडत असे तसा आतां पडत नाहीं असें म्हणणारे वृद्ध आजही पुष्कळ सांपडतील. परंतु अशा प्रकारच्या म्हणण्यांत काहीं अर्थ नाहीं. केवळ जुन्या काळच्या गोष्टी तेवढ्या चांगल्या, आतांच्या काळच्या तितक्या वाईट, अशा अभिमानानें बोलतात असें नव्या काळच्या लोकांपैकीं वर लिहिल्या प्रमाणें वृद्धांच्या म्हाणण्यास थोड्यांनीं म्हटलें असेल असें नाहीं. परंतु पूर्वीं पाऊस फार पडत असे व आतां थोडा पडतो असें जें जुन्या काळच्या लोकांचें म्हणणें आहे तें सर्वथैव मिथ्या असेल अथवा त्या बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें म्हणतां येत नाहीं, हें पुढील मजकूर वाचला म्हणजे वाचकांचे ध्यानांत येईल.

आलीकडील शोधा अंतीं असा अजमास झाला आहे कीं जंगल अथवा मुख्यत्वें करून मोठमोठाले वृक्ष आणि पर्जन्य यांत अगदीं निकट संबंध आहे. म्हणजे जा देशांत मोठाल्या वृक्षांची झाडी फार असेल त्या देशांत पाऊस अधिक पडतो व जा देशांत वृक्ष थोडे असतील त्या देशांत पाऊस थोडा पडतो. पृथ्वीवर सूर्याचीं किरणें पडून तीं परावर्तन पावतात व त्यामुळें पृथ्वीवर परावर्तन झालेल्या किरणांपासून वातावरणास उष्णता पोंचते. याजकरितां जा देशांत वृक्ष नसतात अथवा थोडे असतात त्या देशांतील वातावरण अतिशय उष्ण होतें व त्यामुळें आकाशांतील ढगें या उष्णतेच्या मानाप्रमाणें दूर राहतात व त्यामुळें पाऊस पडत नाहीं. जा देशांत अतिशय झाडी असते त्या देशांत पाऊस फार पडतो याचें कारण असें कीं वृक्षांमुळें सूर्याचीं किरणें पृथ्वीच्या पाठीवर थोडीं पडतात व त्यामुळें भूमीच्या किरणापासून वातावरणास उष्णता थोडी जाते. दुसरें वृक्षांच्या अंगावर सूर्याचीं किरणें पडून त्यापासून बाष्पीभवन होत असतें व त्यामुळें वातावरणांत थंडाई रहाते व तसें झालें म्हणजे आकाशांतील ढगें जवळ येतात व तेणें करून पर्जन्य वृष्टी फार होते. ढगें जवळ येण्याचें व तीं पृथ्वीच्या पृष्ठापासून दुर होण्याचें जें हें कारण लिहिलें आहे तें म्हणजे शास्त्रसिद्ध झालें आहे असें नाहीं हा कित्येक विद्वान लोकांचा अजमास आहे. वृक्षांपासून वातावरणांत फेरफार होतात व हे फेरफार, पर्जन्य वृष्टी थोडी अथवा पुष्कळ होण्यास कितपत कारण होतात, हें सिद्ध झाल्या खेरीज त्याविषयीं बारीकपणें लिहिण्यांत कांहीं अर्थ नाहीं परंतु वृक्ष असल्यापासून पर्जन्य कमी पडतो याविषयीं ज्या गोष्टी दृष्टोत्पत्तीस आल्या आहेत व येत आहेत त्या पुढें लिहिल्या आहेत. त्या प्रत्येकानें स्वतःच्या अनुभवाशीं ताडून पाहाव्या म्हणजे याविषयावर जास्त विच्यार झाल्या सारखें होईल.

म्हैसूरच्या शेजारील कुर्ग प्रांतांतील झाडी तुटल्या पासून त्या प्रांतांत काय फेरफार झाले याविषयीं डाक्टर बीडी यांनीं पुष्कळ शोध व विचार करून रायल जोग्राफिकल सोसायटी पुढें या विषयावर निबंध वाचला आहे. यांचें असें म्हणणें आहे कीं प्रांतांतील झाडी कमी होत गेली म्हणजे पर्जन्य कमी पडावयास लागतो व जो पडतो तो नियमित कालीं पडावयाचा तसा पडत नाहीं. जा नक्षत्रांत पाऊस हटकून पडावयाचाच तें नक्षत्र अगदींच सुकें जातें व भलत्याच वेळेस पाऊस पडतो. पर्जन्य थोडा पडला म्हणजे देशांतील पाण्याचा साठा कमी होत जातो व तसें झालें म्हणजे हवा उष्ण होते. मद्रास इलाख्यांतील जंगल मि० इनस यांनीं, हिंदुस्थान, आफ्रिका, आणि युरोप खंड यांतील झाडी तुटल्यापासून झालेल्या वाईट परिणामाविषयीं हिंदुस्थानचे सेक्रेटरी आव स्टेट यांस पुष्कळ दिवसांपूर्वीं लिहिलें आहे. यांचें म्हणण्यांत असें आहे कीं पर्जन्य वृष्टी कमी होत असल्यामुळें हिंदुस्थानांत पूर्वीं जितक्या ओंडीवर पाणी लागत असे तितक्या ओंडीवर आतां लागत नाहीं. वीस वर्षांपूर्वीं तंजावर प्रांतांत जितक्या अंतरावर पाणी लागत असे त्याच्या दुप्पट आता विहिरी खोल खणाव्या लागतात.

युरोप खंडांत प्राचीनकाळीं थंडीच्या दिवसांत जा नद्यांचें पाणी थिजत असे म्हणोन इतिहासांत वर्णन केलें आहे त्या नद्यांचें पाणी आतां कधींही थिजत नाहीं. जा जा ठिकाणीं पूर्वीं अतिशय थंडी पडत असे त्याच ठिकाणीं आतां पहिल्या सारखी थंडी पडत नाहीं. याचें कारण युरोप खंडांतील पूर्वीं पासून आजपर्यंत झाडी अतिशय तुटल्यामुळें सदरहु प्रमाणें हवेंत फेरफार झाला असावा असें कित्येक विचारी सदेव लोकांचें मत आहे. हिंदुस्थानांत इंग्रज सरकारचें राज्य झाल्यापासून जमीनिची लागवड पहिल्या पेक्षां आतां जास्त झाली आहे व पहिल्या पेक्षां आतां जंगल ही फार तुटलें आहे. हिंदुस्थानचा प्राचीन कालचा अथवा बराच आलीकडचा देखील असावा तसा इतिहास नसल्यामुळें पूर्वीं पाऊस कसा पडत असे व आतां कसा पडतो याचा शोध करण्यास कांहींच मार्ग नाहीं. परंतु आलीकडेस हिंदुस्थानांत दर साल कोठेंना कोठें तरी दुष्काळ पडत आहे व परजन्य वृष्टी व्हांवी तशी होत नाहीं

याजकरितां झाडी तुटणें हें अनावृष्टीचे जरी मुख्य कारण नसलें तथापि अंशतः तरी हें कारण नसेल असें तरीं कशावरून? पूर्वीं जाप्रमाणें पाऊस पडत असे तसा आतां पडत नाहीं असा कित्येक लोकांचा बोभाट आहे यांत कांहीं तथ्य नाहीं असें म्हणण्यास तरी आधार काय आहे,

वृक्षांची लावणी फार झाल्यापासून पाऊस पडल्याचीं एक दोन उदाहरणें आढळांत आलीं आहेत तीं अशीं. जरूसलम शहरांत राहणाऱ्या लोकांच्या सांगण्यांत असें आहे कीं जरूसलमच्या शेजारील केड्रान नामक नदीस कधीं मोठा पूर आला असें पूर्वी कधींही झालें नवतें. परंतु थोडया वर्षांपूर्वी या नदीच्या आसपास तुताचीं झाडें अतिशय लाविल्या मुळें त्या नदीस प्रथमच मोठा पूर आला असें तेथील लोक सांगतात. इजिप्त देशांतून एका फ्रेंच गृहस्थानें फ्रान्स देशांतील एका वर्तमान पत्रास असें लिहून पाठविलें आहे कीं इजिप्तमधील डेलटा नामक प्रदेशांत पूर्वी वर्षांतून सारा पाच अथवा सहा दिवस पाऊस पडत असे परंतु या प्रदेशांत महमद अल्ली याणें दोन कोटि वृक्षांची लागवड केल्यामुळें आतां तेथें वर्षांतून सुमारें चाळीस पंचेचाळीस दिवस पर्जन्य पडूं लागला आहे.

देशांत वृक्ष पुष्कळ असले अथवा लावले म्हणजे पर्जन्य पडतोच असा सिद्धांत करण्यास वर लिहिलेलीं उदाहरणें अथवा या बाबतींत आजपर्यंत झालेला शोध हीं नरीं सबळ कारणें नाहींत तथापि या विषयाकडेस लोकांनीं व सरकारानें विशेष लक्ष पुरविण्यासारख्या वजनदारीचा हा विषय आहे यांत संशय नाहीं. पर्जन्य न पडण्याचें कारण काय अथवा तो पडण्यास युक्ती कोणती याचा शोध जो पुरुष करील त्याची कीर्ती चिरकाल पृथ्वीवर राहील. कारण या शोधापासून मानव प्राण्यांचें व तसेंच इतर जीवांचें अपरिमित कल्याण व्हावयाचें आहे.

अलीकडेस आमच्या मुंबई इलाख्यांतील कित्येक ठिकाणची झाडी फार तुटली आहे. याजकरितां या झाडी तुटलेल्या प्रदेशांतील शेतकरी लोकांशीं आमच्या वाचकांपैकीं ज्यांचा संबंध असेल त्यांणीं तेथील हवेंत व पाऊस पडण्याचे मानांत काय फेरफार झाले आहेत याचा शोध करून या शोधा अंतीं त्यांस जी माहिती मिळेल ती छापून प्रसिद्ध करण्याविषयीं आम्ही त्यांस शिफारस करितों.

## TESTIMONIAL TO THE HON. SIR JOSEPH ARNOULD, Kt.

A public meeting of the native inhabitants of Bombay was held on Thursday afternoon at "Mazagon Castle," the residence of Sir Jamsetjee Jejeebhoy, Bart., for the purpose of testifying their esteem and respect for the Honourable Sir Joseph Arnould, one of the Judges of the High Court of Judicature at Bombay. On the motion of Mr. Muncherjee Hormusjee, Camajee, seconded by Mr. Venayekrao Juggonnathjee Sunkersett, Sir Jamsetjee Jejeebhoy, Bart., was called to the chair.

Sir Jamsetjee Jejeebhoy, in opening the meeting, said,—Gentlemen,—I am extremely gratified at the proposition calling upon me to fill the chair of this public assembly this evening. Ever since we have learned of the intention of Sir Joseph Arnould, our esteemed and respected Judge of the High Court of Bombay, to retire from his high post of honour, every member of the native community has given unanimous expression of great esteem, respect, and affection for him, as well as of sorrow at his approaching departure from amongst us,—respect and affection for the noble qualities which have distinguished His Lordship for a period of ten years during which he occupied the sacred seat of Justice, and sorrow at the prospect of being deprived of those benefits which a ripened judgment, a powerful mind, and unflagging industry conferred upon our community. That all classes of the native community have, with one voice, thus expressed their sincere feelings for the learned Judge, is as well known to you as to me. That I should be afforded an opportunity of taking a prominent part in proceedings such as these for testifying our regard to a Judge, who is at once so popular and so worthy, is a fortunate circumstance for me. At the same time you are honouring yourselves in coming forward to honour one who unites in himself so many noble attributes of virtue, high-minded liberality, and elevated sense of justice. You are so fully acquainted with the various qualities of the heart and head of the Hon. Sir Joseph Arnould, that it is needless for me to refer to them here in detail. An Address, embodying the sentiments of the natives of all classes, has been prepared, by the Managing Committee, which will be read by Mr. Shantaram Narayen. (Cheers).

Mr. Shantaram Narayen, the secretary of the "Arnould Testimonial Committee," then read the address, which is follows:—

To the Honourable Sir Joseph Arnould, Knight, Judge of Her Majesty's High Court of Judicature, Bombay.

Honourable Sir,—The period of your retirment from the high and honourable post you have occupied amongst us having drawn near, we, the native inhabitants of Bombay, take leave to bid you a hearty farewell before your return to your native land. The ten years of your sojourn and judicial career amongst us have been marked by such genuine good will and friendly feeling towards the people of this country, that it seems to us as if that period had passed too swiftly away, and we view with feelings of deep regret the prospect of your departure from these shores.

Even a cursory retrospect of your judicial career, first as Judge of the late Supreme Court of Judicature, and afterwards as Judge of Her Majesty's High Court of Judicature, is sufficient to establish the fact that the most befitting attribute of a Judge, namely, an anxious desire to deal out even-handed justice, without favour or prejudice, and without regard to caste or colour, has ever been exhibited in the discharge of your high functions. The stern independence of judgment and action which in this country is required to be exercised whenever the interests of the governing race come into collision with those of the subject people, has formed, we rejoice to say, a happy feature of your career. It becomes a very pleasing duty for us to testify, upon the eve of your departure, that whenever any case has come before you which was calculated in its moral aspects to conduce to the amelioration of the people, you spared neither industry nor ability in its thorough investigation and decision.

Within the last five years a period of abnormal, commercial, and speculative excitement passed over Bombay, and in the extensive litigation which followed it, your administration, we are happy to note, was characterized by a spirit of strict justice, tempered by a judicious consideration of the unusual circumstances which pbq ravaged the city. Apart from the uniform and signal advantages with which your judicial career has been fraught to all classes of the people in our country, we have sincere pleasure in bearing testimony that in your private capacity you have ever taken a warm interest in the promotion and advocacy of the interest of our countrymen. Your services as President of the Parsee Law Commission will always be remembered with gratitude by that class of the community, who, by your aid and advocacy, have obtained legislative recognition for their special laws of marriage and succession.

The admission of natives of this country to a higher and lager share in the administration of public affairs, their elevation to posts of honour and emolument in the State, and in liberal and respectable professions independent of the State, has always secured the deepest sympathy on your part, whilst the treatment, on a footing of equality, which you always accorded to our countrymen, bore practical and pleasing testimony to you large-minded liberality.

Nor can we omit to refer to your services in the cause of education more especially in connection with the University of Bombay, of which you were for some time Vice-Chancellor.

To mark our sense of your worth as a Judge, of your profound learning and eminent abilities, and of your claim upon our greateful recollection and commemoration, we have resolved that in connection with the University of Bombay, in the organization and progress of which you have taken so deep an interest, a scholarship be instituted bearing your name. We trust that you will accept this small but sincere tribute of our regard and respect and in the hope that a long career of happiness and usefulness is in store for you in your native land, we bid you once more a hearty farewell.—We remain, Honourable Sir, your most faithful servants.

Bombay, 22nd April, 1869.

It was then proposed by Mr. Framjee Nusserwanjee Patel, seconded by Mr. Hajee Ismael Hajee Hubbeeb, and carried unanimously, that the address of the native inhabitants of Bombay to the Honourable Sir Joseph Arnould, just read, be approved and adopted.

On the proposition of Mr. Vurjeewundass Madhowdass, seconded by Mr. Nowrojee Manockjee Wadia, it was unanimously resolved, that the subscription already collected and that may here after be collected, be made over by the managing committee to the Senate of the Bombay University, with a request that the interest accruing thereon be devoted to a scholarship to be entitled the "Arnould Scholarship," for proficiency in Hindu and Mahomedan Law.

Mr. Rughoonath Narayen proposed and Mr. Lukhmidass Khimjee seconded, that "The best thanks of this meeting are due to Sir Jamsetjee Jejeebhoy for his able conduct in the chair and for lending his mansion for this meeting."

The address is very elegantly engrossed on parchment, with neat and tastefully laid out borders. Parchment sheets are placed at the Framjee Cowasjee Institute and the office of the Bombay Association, Elphinstone Circle, for signatures. The address will be presented to the Honourable Sir Joseph Arnould on Wednesday evening next at 5 o'clock, at the Court House, Fort, when the public is requested to attend.

*Bombay Gazette.*

## Local

## वऱ्हाड.

आम्हास चांगल्या आधारावरून असें कळतें कीं चांदूर तालुके तळेगाव, मूर्तिजापुर आणि कारंजें हीं गावें उमरावतीचे स्मालकाज कोर्टाचे हद्दींत होतीं तीं चांदूर व मूर्तिजापुर एथील तहशिलदारांस ५० रुपयांपर्यंत दिवाणीचा अधिकार देऊन त्यांचे ताब्यांत दिलीं.

खामगावास दोन आठवडे मोठे महत्वाचा एक खटला चालला होता त्याचा निकाल गुरुवारीं होऊन नंबर १ चा कैदी देवचंद खत्री यास दोन वर्षे सक्त मजुरीची कैद व ५०० रुपये दंड झाला व नंबर दोनचा कैदी बाळाप्रसाद चीफ कानस्टेबल यास ५०० रुपये दंड झाला. मे० दस्तुर बहिमनजी जामासजी फुलपावर माजिस्त्रेट यांचेपुढें हा खटला चालला होता व कैदीतर्फे मुंबईहुन डाक्टर डालास साहेब अटर्नी आले होते. याजविषयीं पुढील आठवड्यांत साद्यंत लिहूं.

बुलढाणें (मित्राकडून) जिल्ह्यांत मौजे भादोलें तालुके चिखली येथें तारिख २१ रोजीं २ वाजतां ईशान्य दिशेकडून अग्निरूप दरोडेखोराची स्वारी येऊन प्रथमतः येका ठाकराच्या खोपट्यावर हल्ला केला. ते वेळेस त्याचा कमजोरच होता इतक्यांत धांवाधां

न जाहली असती तर बरें होतें परंतु धांवाधांव होऊन लोक जमतात तों पाठीमागून मारुत अवधूताची स्वारी कडिकोट तयारिनिशीं इतकी झपाट्यानें आली कीं त्याच्या सबळ साह्यानें दरोडेखोराची सुमारें २० घरें जाळून फस्त करण्याची १ तासांत सर झाली. ह्या खेपेस सदरहु गृहस्थानीं कांहीं माळवदें हीं आपल्या कबजांत आणण्याचा प्रयत्न करण्याकरितां कित्येक धाब्यासभोंवतीं समूळ पसरून सक्त मेहेनत केली. परंतु अग्नीच्या शत्रूचा ( पाण्याचा ) जोर ज्यास्ती झाल्यामुळें माळवदें पेटलेलीं विझालीं जाऊन निराश होऊन शेवटीं नारोपंतास कुच करणें भाग पडलें.

१ तासाच्या इतक्या थोड्या अवकाशांत नारोपंतानीं बरेंच म्हणजे सु० १००० रुपयांचें नुकसान केलें याप्रसंगीं पाटील पांड्यांनीं आग विझविणें व लोकांस सहाय करणें हीं कामें चांगलीं बजाविलीं. दुसरें कृष्णाजी पाटील व लक्ष्मण घाटे वगैरेनीं ही बरीच मेहनत घेतली परंतु यांनीं आपापले फार ओळखिले परंतु मारुती पाटील व बळवंतराव पांडे ह्यांनीं दावेदारासही योग्य मदत दिली.

कायहो पत्र कर्ते महाराज, वारंवार वर्षोवर्षीं तुम्हीं आपल्या पत्रद्वारें अशा गोष्टी न घडण्याविषयीं अगर घडल्यास त्याची त्वरित तजवीज लौकर होण्याविशीं चांगली तजवीज गावगन्ना आगाऊच केलेली असावी म्हणून सरकारास विनंती करीत असूनही, सरकार ह्याविशीं कांहींच मनावर घेत नाहीं हें केव्हढें आश्चर्य बरें! एडिटरराव तुम्ही थोडे दिवसांपूर्वीं येका अंकांत लिहिल्याप्रमाणें घरें करण्याची व दरघरीं पाणी असण्याची वगैरे सोय असण्याची तजवीज सक्तीनें सरकार करील तर फार फार बरें होईल. असो कमिशनरी अमल तेव्हां लहरीचा फळफळाट फार जिकडे फिरली तिकडे फिरली. "दगडा पेक्षां वीट मऊ" या म्हणीप्रमाणें मोगलाईपेक्षां बरें, इतकेंच मला वाटतें. सध्याच्या दिवसांत मेहेकर वगैरे इतर तालुक्यापेक्षां चिखली तालुक्याचें किंवा त्यांतील लोकांचें नशीब चांगलें म्हणून त्यांनां रामरावासारखें रत्न तहशिलीच्या कामीं मिळालें आहे करितां ही आशा कीं आमचे लोकप्रिय व दयालु तहशिलदार अशा परोपकारी कामाकडें जरूर व फार लक्ष देतील व या कामाकरितां आपणही त्यांच्याकडे शिफारस कराल ही उमेद आहे.

जानेफळ:—हल्लीं येथें मेहेकर तालुक्याची रेविन्यु सरवेकडील जमाबंदी चालू आहे. हजारों मनुष्य जमा जाहलें आहे. हे सर्व लोक शेतकरी आहेत. येथील सदरस्टेशन बुलढाण्यास गेल्यापासून एवढा जमाव एथें कधींही जमला नव्हता तूर्त या गावास शोभा बरीच आली आहे. आणि हे दिवस उन्हाळ्याचे असल्यामुळें बरें आहे. लोकांस बिऱ्हाडाची वगैरे फारशी तकलीप नाहीं त्यांत विशेषेंकरून बहुतेक शूद्र लोक असल्यामुळें त्यांचें बिऱ्हाडही विंचवाचे बिऱ्हाडाप्रमाणें पाठीवरच असतें. "तवा पितळी आणि तांब्या व दोन भाकरीचें पीठ अथवा जवळ आसपासचे लोकांच्या दोन दोन भाकऱ्या" दिवसा फौजदार साहिबांचे कचेरीचे शोभेस व सलामास जाऊन रात्री रानांत मैदानांत ही फौज पडत असते.

अद्यापपर्यंत लोक खुषसे दिसतात यावरून जमाबंदी फार कडक आहे असा रंग दिसत नाहीं पुढें पाहावें पण दु:ख इतकेंच वाटतें कीं गरिब रयतेविशीं दया व कळवळा म्हणुन जो म्हणतात त्याचा मात्र गंध ही नाहीं. असता तर इतके लोक येकदम बोलावून इतके दिवस उन्हांत तळतळविण्याचें कारण नव्हतें. ज्या गावास ज्या तारखेस समजूत द्यावयाची त्याच तारखेस फार तर पूर्व तारखेपासून हजर राहाण्याविशींचे हुकूम जरी दिले असते तरी बिचाऱ्या गरिब लोकांनीं अमान्य केले असते असें नाहीं. शिरसावंद्य हुकूम मानून हजार कामेंही एकीकडे टाकून लोक हजर झाले असते पण हजारों ( सुमारें पांच हजाराहून अधिक असावे ) रयतेमध्यें अमलाचे नात्यानें साहेब बहादुर कसे शोभतात हें पाहाण्याची संधी अशी दुसरी येत नाहीं. अस्तु सरासरीनें पाहातां झालेले ठराव लोकांस सुखदायक दिसतात. पुढचें पुढें समजेल.

उष्णता फार आहे पण येथें पाण्याचे विपुलतेमुळें तें दु:ख कमी आहे. साहेब बहादुरांनीं जिल्ह्याचे म्हणजे बुलढाण्यासारखे ठिकाणीं हा थाट केला नाहीं ही मोठी दया केली. मेहेकर तहशिलदार यांची स्वारी हल्लीं येथेंच आहे.

## अकोला.

शाळाखात्याचे वार्षिक रिपोर्टाकरितां सर्व डिपुटि इन्स्पेक्टर लोकांस पाचारण केल्याप्रमाणें रा० रा० बज्याबा रामचंद्र, वामन नारायण व चिमणाजी राजाराम हे येथें येऊन दाखल झाले. बाकीचे एक दोन दिवसांत एथें येतील.

येथील पोष्ट आफीस नवीन तयार झालेल्या बंगल्यांत कालपासून गेलें.

मे० कारनाक साहेब काटन कमिशनर खामगावाहून आज रोजीं येथें आले.

गेल्या सात महिन्यांत नोटी ४७४०२० रुपयांच्या गेल्या पैकीं खजिन्यांत २२७२०० रुपयांच्या गेल्या व मुंबई व इतर ठिकाणांहून पैशाकरितां १३५१२० रुपयांच्या वापस आल्या बाकी १११७०० रुपयांच्या नोटी गेल्या मार्च महिन्याचे ३१ वे तारखेस लोकांचे हातीं राहिल्या. यावरून असें दिसतें कीं इकडील अडाणी लोकांनीं नोटी फारश्या उपयोगांत आणल्या नाहीत.

---

## वर्तमानसार.

---

बुखाऱ्याचे अमीर यांस त्यांचे वडील मुलानें मारल्याबद्दलची जी वदंता होती ती अगदीं गप आहे असें पायोनिर पत्रास समजलें आहे.

वर्धा आणि सिंदी यांचे दरम्यान ता० २३ रोजीं रात्रौ असि० कमिशनर मि० रोटस्ली व परमेनंट वे इन्स्पेक्टर मि० बार्न्स हे लारीवरून जात असतां मागून गुड्स ट्रेन येऊन ठार मेले. व नेटिव लोकांनीं उड्या टाकून आपले जीव वाचविले.

मि० जे, बी, पील हे विलायतेहून येऊन मुंबईच्या डायरेक्टर आफ पब्लिक इनस्ट्रकशनचे कामावर रुजू झाले.

बडोदा रेलवे कंपनीनें दिल्ली रेलवे स्टेशन विकत घेण्याबद्दलचें बोलणें करून ठरावांत आणिल्याचें समजतें.

ता० १४ रोजीं पेशावर येथें अमीर साहेबानीं कायनर येथील अधिकाऱ्याची भेट घेऊन रस्त्याचा बंदोबस्त केला, व व्यापाराचे साईकरितां २५००० रुपयांची कुमक करून सात पोलिस स्टेशनें बांधण्याची कबुलायत केली.

मध्यप्रांताचे कमिशनरानीं अशी शिफारस केली आहे कीं नागपुर येथील सध्याचे स्मालकाज कोर्ट बंद करून त्याऐवजीं मोठें एक कोर्ट करावें आणि त्यांत सध्याचे जज्ज मे० मेनिक साहेब यांस पहिले प्रतीचे जज्ज नेमून त्यांचे हाताखालीं दुसरे दोन जज्ज असावेत.

ग्याझेट पत्रकर्यास कल[illegible] जतें कीं सुलतान टिपु यांचे [illegible] शा यांची पत्नी ता० १७ [illegible] मरण पावली. तिचें वय सुमारें [illegible] वर्षांचें होतें.

हैदराबादचे निझामवा[illegible] रंजीव मीर महिबूब अली[illegible] राज्य पदावर बसविलें हें आम्ही [illegible] लिहिले हा हेच. महिबूब अलीखान [illegible] मुळें त्यांचें पालन पोषण क[illegible] बुब अलीखान यांची आ[illegible] नबाबाची आई दिलावर [illegible] बेगम इजकडेस सांगितलें आहे. सर सालर जंग आणि हैदराबाद येथील रेसिडेंट हे उभयतां राज्यकारभार चालविण्याची व्यवस्था लावीत आहेत. निझामाचे सांप्रतचे प्रधान हे बहुतकरून, सर सालर जंग या नावानें माहित आहेत परंतु त्यांचा हा किताब असून त्यांचें खरें नाव व हुद्दा नवाब सुजाउद्दौला मुखत्यार उलमुलुख सैयद तोराब अलीखान बाहादुर असा आहे.

हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी ड्यूक आफ आरगाईल ह्यानीं हल्लीं हिंदुस्थानांतील राज्यव्यवस्थेच्या फेरफाराबद्दल एक कायद्याचें बील पार्लमेंट सभेंत दिलें आहे. ह्यांत तीन गोष्टी मुख्य आहेत, असें इंडियन एकझामिनरचा एक बातमीर लिहितो. १ ली, नानरेग्युलेशन प्रांतांच्या कारभारासाठीं जे कायदे कानू पाहिजेत ते गवर्नरजनरल ह्यानीं आपल्या हुकूमानें करावे. दुसरी नेटिव संस्थानिकाच्या अमलांत राहून इंग्लिश सरकारच्या रयतेनें गुन्हे केले तर त्यास पारिपत्य गवर्नर जनरलनें करावें आणि तिसरी, सिव्हिल सर्विससाठीं परीक्षेनें अगर परीक्षेशिवाय नेटिव लोकांस निवडण्याचा अधिकार गवर्नरजनरलास असावा.

स्तुत्य कृत्य—दिल्ली येथील माजी कलेक्टर व माजिस्ट्रेट मि० चार्लस मकेन्स बेथो यांच्या मडमीनें [illegible] स्कालरशिप या नावानें निरंतर चालणारी [illegible] स्कालरशिप दिल्ली येथील कालेजांत स्थापन करण्याकरितां अकरा हजार रु० बाक्षिस दिले असें बांबेग्याझेटवरून कळतें.

रा० ब० मोरोबा कान्होबा चांगल्या आधारावरून बांबेग्याझेट कर्ते यांच्या ऐकण्यांत आलें आहे कीं, मुंबईच्या स्माल काज कोर्टाचे चवथे जज्ज रा० ब० मोरोबा कान्होबा हे लवकरच रजा घेऊन पेनशनाकरितां अर्ज करणार आहेत.

गेल्या सोमवारीं सकाळीं चार वाजावयाच्या सुमारास मुंबई पासून जवळ केनरी बेटापासून चार कोसांवर आटलांटा हें जहाज बुडालें. यांतील कांहीं लोक वांचले. तीस असामींचा पत्ता लागत नाहीं सबब मेले असे दिसतें

तंबाखूचा उपयोग करणारांस सूचना तंबाखूच्या उपयोगापासून शरीरास हित होण्या पेक्षां अहित फार होतें हें पाहून पारिस शहरांत मंडळी स्थापन झाली आहे, तिचा उद्देश तंबाखूचा कोणतेही प्रकारचा उपयोग जितका न होईल तितका करण्याकरितां प्रयत्न करणें असा आहे त्या मंडळीचे सभासद होणारांस [illegible] तंबाखूचा कोणत्याही प्रकारचा उपयोग करणारांस नाहीं म्हणून करार करावा लागतो. या मंडळींत हल्लीं बाराशें लोक आहेत असें नाशनल पेपरवरून समजतें.

---

## Advertisements.

## जाहिरखबरा.

---

नोटिस—गंगाधर जोरावरमल साहू दुकान अकोलें यांस ओंकार पुरणमल साहू दुकान अकोलें यांजकडून देण्यांत येते कीं तुम्हीं माहे एप्रील सन १८६९ इसवी [illegible] आमची रुईची खंडी ३१ दर [illegible] प्रमाणें आमचे दुकानचे वहिवाटदार [illegible] सितराम मारवाडी यांचे मार्फत [illegible] घेतली आहेत [illegible] दिवशीं सदरील रुईचा सवदा केला त्या दिवशीं ओझीं तगून घेतलीं नाहींत नंतर [illegible] दिवसांनीं तगून घेतलीं तो तगआमचा वहिवाटदार सितराम याचे हातचा आला आहे त्याणें ओझीं तगल्यावर रुपये मागितले असतां दुसरे दिवशीं प्रात:काळीं देऊं म्हणून कबूल केलें दुसरे दिवशीं सितराम यांणीं मागणें केलें असतां देतों देतों म्हणून म्हणत राहिला पण आजवर देऊन उलगडा केला नाहीं.

रुईचा सवदा ज्या दिवशीं झाला तेच दिवशीं रकम न दिली तर ओझ्याची रकम व त्याचें व्याज दरमहा दरशेकडा रुपये २ प्रमाणें व हुंडाबळा दरशेकडा रुपया येक प्रमाणें असें देण्याचा सराफींत शिरस्ता आहे.

सदरहु आमची रुईची रकम व ज्यास्ती दिवस लागल्यामुळें व्याज हुंडाबळ सहीत मागत असतां उलगडा केला नाहीं त्यास नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं आज तारखेपासून आठ दिवसांत उलगडा करावा न केल्यास फिर्याद करून खर्चासुद्धां रुपये भरून घेण्यांत येतील.

तुम्हीं आमची रकम जर दिली असती तर या रकमेवर ओझीं दर ८३।८३॥ प्रमाणें खरेदी करून ८७ प्रमाणें विकलें असतें. रुपये न दिल्यानें साडेतीन रुपये प्रमाणें दर ओझ्यास आमची नुकसानी केली आहे ती नुकसानी घेण्यांत येईल.

तुम्हीं गेल्या मार्गशीर्ष मासीं गहू खंडी २० दर खंडीस रुपये ७३ प्रमाणें आम्हास दिल्हे. त्याजबद्दल रुपये १४६० आमचे दाखवून तुम्ही रोख घेतले पैकीं तुमचे कडून एकंदर खंडी १५ अदल असल येऊन बाकी खंडी ५ घेणें राहिले आहेत तेही दिल्हे नाहींत मागितले असतां देऊं दिलाऊं करिता. आठ दिवसांत उलगडा न केल्यास त्याजबद्दलही या नोटिशीचे खर्चासुद्धा सर्व रकम घेण्यांत येईल कळावें तारिख १ माहे मे सन १८६९. इसवी.

(सही) ओंकार पुरणमल साहू दु० अकोलें

---

## नोटिस.

गजराई मर्द रामजी गांवडे रहाणार मौजे घुसर तालुके अकोलें यांस माणकचंद अनंदराम दुकान मोरगांव तालुके मजकूर याजकडून देण्यांत येते कीं आमचे रुपये ४०० घेणें आहेत तर ही नोटिस पोचल्यापासून आठ दिवसांचे आंत उलगडा करावा. नाहीं तर दिवाणींत, फिर्याद करून नोटिशीचे खर्चासुद्धां रुपये भरून घेण्यांत येतील कळावें तारिख २८ एप्रिल सन १८६९ इसवी.

(सही) माणकचंद अनंदराम दस्तुर खुद

नोटिस—वंशमि भवानी वलद जानजी पाटील मौजे निंभोरे परगणे अकोलें याशी सखाराम वलद मानाजी पाटील मौजे हिंगन तामसवाडी तालुके अकोलें नोटिस देतो कीं तुमचे कर्ज ऐन रुपये १३१३।. त्याचे व्याज दर शेकडा दोन रुपये प्रमाणें २८९ येकूण रुपये १६०२।. बरहुकूम रोख देणें आहे त्यांत शेतीचे मालाबद्दल किंमत येणें प्रमाणें.

२३० सन १२७७ फसलीबदल.

७५ कापुस खंडी ३ दर २५ प्रमाणें

१०५ गहूं खंडी ३॥ दर ३० प्र० लहान पायलीचे

५० पडीत नंबरांत ढोरें चारल्या बदल किंमत रुपये. ढोरें सुमारें २० सहा महिने पावेतों चारलीं आहेत.

२३०

६१२॥।. सन १२७८ फसली सालांत माल येणें प्रमाणें.

४९३॥।. कापुस खंडी ९॥।२॥. दर ५० शीका कंपनी रुपये.

१२० हरभरे खंडी २ पायली च्यार शेरी दर खंडीस रुपये६० प्रमाणें.

१०० लाख दोन खंडी पायली च्यार शेरी दर खंडीस रुपये ५० प्रमाणें.

९० गहूं खंडी येक पायली च्यार शेरी दर २० प्रमाणें

१२ कडबी पुले ८०० दर ४ प्र०

१७ कुरखंड म्हणजे लाकडें सागवानचे दर येक कुरखंडास रुपये ३ प्रमाणे.

८६२॥।.

२५० पैकीं वजा सरकारी सारा रु०

८४२॥।.

बाकी रुपये.

६१२॥।.

येकंदर वसूल ८४२॥।. वजा जातां बाकी ७५९॥ राहिले आहित हल्लीं देण्यास सिद्ध आहों.

वसूल जातां जी बाकी तुमची मजकडे निघाली आहे ती देण्यास नगद हजर आहों तुम्ही घेउन दस्ताऐवजांत गहाण लिहून दिल्हेली मिळकत स्थावर जंगम सर्व खुली करून रोखा आमचा काढुन द्यावे.

सरकार साऱ्याची जमीन माझे नावची असोन तुमचे रुपयावर गाहाण लाउन देउन रुपये सर्व मुद्दल व्याज फिटे पावेतो तुमचे नांवें खातें करून दिल्हें आहे त्यांस हल्लीं तुमचे रुपये जे निघतात ते नगदी घेऊन रोख्याचे शर्तीप्रमाणें तुम्हीं राजीनामा देऊन आमचे नावाने खाते करून द्यावें.

सदरहू माझे शेताचे नंबर, रुपयाचे फेडी करितां तुमचे नांवें करून दिल्हे परंतु त्याची वहीती लागवड मसाला लाऊन सरकार सारा फेडून बाकी उत्पन्न माल जो भाव भावहोईल तो तुम्हास देण्याची शर्त आहे तुमचे नावाचे नंबर झाले म्हणजे तुम्हीं शेताची वहीती करावी अशी शर्त नसल्या वरून त्यां जमीनिवर तुमचा हक्क बिलकूल नाहीं व तुम्हांस वाहू देणार नाहीं.

हि नोटिस तुम्हांस पोहोचल्याचे तारिखे पासून आठ दिवसांचे आंत जे रुपये तुमचे हिशोबानें निघतील ते घेऊन गहाण असलले शेताचे राजीनामे सरकारांत देउन माझे नांवें नंबर शेताचे पुर्ववत करून द्यावे.

वर लिहीलेले मुदतीचे आंत तुम्हीं रुपये घेण्यास न याल व शेताचे राजीनामे नदेऊन आमचे नांवें शेताचे नंबर न झाल्यास तुमची रक्कम तीन्हायतीं ठेऊन पुढे व्याज देणार नाहीं शेताचे नंबर पूर्ववत माझे नांवें करण्या करितां तुम्हावर दिवाणींत फिर्याद करून फिर्याद दीचे व नोटिसीचे खर्चा सुद्धा रुपये भरून घेण्यात येईल हें समजावें कळावें. तारिख २८ माहे एप्रील सन १८६९ इसवी.

( सही ) सखाराम वलद मानाजी पाटिल मौजे हिंगणी तामसवाडी निशाणी खुद्द हातची असे.

---

नोटिस—खुशाल वलद चंद्रभान पाटील मौजे राहेर तर्फे पिंपळ खुंटे तालुके बाळापूर यांस नोटिस देण्यांत येतेकीं, तुम्हाकडे देउळगाव साकरशा येथील श्रीराम शाळिग्राम या दुकानची खातेबाकी आश्वीन वद्य ८ संवत १९२५ रोजी रुजू झालेली रुपये ४९८१३ एकुणपन्नास रुपये तेरा आणे येणें आहेत ते दुहोत्र्या प्रमाणे व्याज व या नोटिसीचा खर्च सुद्धां नोटीस पावल्यापासून १५ पंधरा दिवसांचे आंत फडशा करून देणें नाहींपेक्षां फिर्याद करून घेण्यांत येईल कळावें तारी १४ एप्रील सन १८६९इ०

( सही ) श्रीराम शाळीग्राम दस्तुर हीरालालजी

---

नोटिस—रा० बाबूशेट सोनार राहाणार मौजे नायगाव कसबे घाटबोरी तालुके मेहेकर यांस नोटिस देण्यात येते कीं तुम्हांकडे देउळगाव साकरशा येथील श्रीराम शाळीग्राम या दुकानची खातेबाकी भाद्रपद शुद्ध ७ संवत १९२४ रोजी रुजू झालेली शेचाळीस ४६ रुपये मुद्दल खेरीज दुहोत्र्या प्रमाणें व्याज येणें आहे याचा उलगडा नोटीस पोचल्या पासून नोटीसीचे खर्चासुद्धा पंधरा दिवसांत केल्यास ठीक आहे नाहींपेक्षा दिवाणी कोर्टांत फिर्याद करून वसूल करण्यांत येईल कळावें तारीख १४ एप्रिल १८६९.

( सही ) श्रीराम शाळीग्राम दस्तुर हीरालालजी

---

नोटिस—झिंगराजी शेळखी मुकाम मौजे वडाळी परगणें घाटबोरी तालुके मेहेकर यास देण्यांत येतेकीं, तुम्हाकडे देउळगाव साकरशा येथील श्रीराम शाळिग्राम या दुकानची खातेबाकी मुद्दल ३३८१० तेहतीस रुपये दहाआणें शिवाय दुहोत्र्या प्रमाणें व्याज येणें आहे याचा फडशा नोटीशीचे खर्चा सुद्धा नोटीस पावल्या पासून पंधरा १५ दिवसांचे आंत करावा न केल्यास सरकारमार्फत वसूल करण्यांत येईल कळावें तारिख १४ एप्रिल सन १८६९.

( सही ) श्रीराम शाळीग्रम दस्तुर हीरालालजी

---

नोटिस—कुकाजी वलद महादजी ढंवगे राहाणार मौजे उटी परगणे फत्ते खेडले तालुके मेहकर यांस देण्यांत येते कीं तुम्हीं तारीख २९ आक्टोबर सन १८६९ कार्तीक शुद्ध २ ची मुद्दे चिठी लिहून दिल्याप्रमाणे तुम्हाकडे देउळगाव साकरशा येथील श्रीराम शाळिग्राम या दुकानचें रुई चे एक १ आंखें बंगाली वजनी येणें त्याचा करार माघ शुद्ध१५ शके मजकूरचा होता त्याप्रमाणें तुम्हीं दिलें नाहीं तरी ते मितीचे भावाप्रमाणें तुम्हाकडे मुद्दल एक आं रुचाची किंमत रुपये ३५ पसतीस खेरीज त्या दिवसापासून दुहोत्र्याप्रमाणें व्याज येणें आहे त्याचा फडशा या नोटिशीचे खर्चासुद्धा नोटिस पोचल्यापासून पंधरा दिवसाचे आंत करावा नाहीपेक्षा सरकार मार्फत वसूल करून घेण्यांत येईल कळावें तारीख १४—४—१८६९.

( सही ) श्रीराम शाळी ग्राम दस्तुर हीरालालजि

---

नोटिस मारुती वलद लक्ष्मण पुनाड राहाणार मौजे वडाळी परगणे घाटबोरी तालुके मेहकर यास देण्यांत येते कीं तुम्हाकडे देउळगाव साकरशा येथील श्रीराम शाळीग्राम दुकानचे कर्ज मुद्दल रुपये ८१ एक्यायशी शिवाय दुहोत्र्या प्रमाणें व्याज तारीख २९ सेपटेंबर सन १८६७चे रोख्या बरहुकुम येणें आहे तें या नोटिशीचे खर्चा सुद्धा नोटिस पोंचल्यादिवसापासून १५ दिवसांचे आंत फडशा करून देणें नाहीं पेक्षा सरकार मार्फत वसूल करून घेण्यांत येईल कळावें तारीख १४—४—१८६९.

( सही ) श्रीराम शाळीग्राम दस्तुर हीरालालजि

---

## जाहिरखबर.

खालीं लिहिलेलीं भस्में व औषधें अति उत्तम रितीनें तयार केलीं आहेत.

१ सांबरशृंगभस्म.
१ प्रवाळभस्म.
१ रुप्याचें भस्म.
१ वंगभस्म (कथील)
१ सिलाजित भस्म.
१ चंद्रप्रभा गुटिका (गोळ्या)
१ नागभस्म (सिसें)
१ ताम्रभस्म.
१ लोहोकांत.
१ पंचकापूर.

ईतकीं तयार आहेत व पुढें तयार करण्याचा क्रम चालू आहे ही भस्में व औषधें माफक दरानें देण्यांत येतील.

पणे पेठ बुधवार तारीख १९ एंप्रिल सन १८६९इसवी

नारो आपाजी गोडबोले

---

## पाहिजेत.

मराठींत तयार कंपाझिटर.

आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्याकरितां मराठींत टाइप जुळणारे जुने महितगार दोन चपल कंपाझिटर पाहिजेत. पगार त्यांचे हुशारिप्रमाणें १५ पासून २० पर्यंत मिळेल. ज्याची येण्याची इच्छा असेल त्यांनीं लवकर अकोल्यास येऊन आम्हास भेटावें किंवा अर्ज पाठवावे.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

---

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचे बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबदलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्धे आणा प्रमाणें व्याज द्यावें लागेल. ता० १० माहे आकटोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

---

## वर्गणीदारांस विनंती.

गेल्या वर्षाचे आकटोबर महिन्यांत आम्ही आकोल्यास वऱ्हाडसमाचार पत्र सुरूकेलें. त्यास वर्ष होऊन गेलें तर आगाऊ वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस हो विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

---

आक्ट.

सन १८६८चा ९वा पेशे व धंदे यांवरील कराविषयीं किंमत च्यार आणे.

---

## नादारी प्रकरणीं नियम.

हें पुस्तक आमचे छापखान्यांत नुकतेंच छापून तयार झालें आहे. वऱ्हाडांतील न्यायाच्या कोर्टांत हे नियम चालतात. किंमत ०६ सहा आणे व डाक हाशिल एक आणा पडेल. व. स. म्यानेजर.

---

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to remind our subscribers that their Subscriptions, for the present year, should be remitted as early as possible, otherwise, we would, however reluctantly, be under the necessity of ceasing to transmit the paper to their addresses. We believe that this reminder will not fail to arouse the sympathies of our Constituents in the country and bring about speedy remittances from defaulting Subscribers.

*Proprietors of Berar Samachar*

---

| किमतीचे ठराव. | रु. | आ |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास… … | १ | ० |
| साल अखेर … … | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ … … | १ | ८ |
| सहामाही अखेर … … | ४ | ० |
| फुटकळ एक अंकास … … … | ० | ६ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५१ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालअखेर ३ रु० ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरु तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी.

नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत… … … १ रुपया

१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०।०१

एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

---

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छापून प्र० केलें.

# वऱ्हाडसमाचार.

THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.

VOL. IV — AKOLA:—SATURDAY EVENING, MAY 8, 1869 — NO. 18

पुस्तक ४ — अकोला, शनिवार सायंकाळ तारीख ८ माहे मे सन १८६९ इ० — अंक १८


## खामगावचा फौजदारी मुकदमा.

सर्व वऱ्हाडांत व्यापाराविषयीं प्रसिद्ध एक उमरावती व दुसरें खामगाव आहे. खामगावास कापसाचा फार मोठा व्यापार चालतो. तेथें कित्येक युरोपियन लोकांचींही दुकानें आहेत. हाफ प्रेस, फुल प्रेस वगैरे कापसाचे गठ्ठे दाबण्याचीं येंत्रे बरींच आहेत. घडामोड मोठी आहे व त्यामुळें दलाल वगैरेचेंही मोठें प्राबल्य आहे. व जेथें असे, मोठे खटाटोप चालतात तेथें बंदोबस्ताचे धोरणाप्रमाणें उण्या अधिक अंशानें लबाडयाही चालतातच. त्यांतही आमचे ऐकण्यांत आलें आहे कीं खामगावास हा प्रकार पुष्कळ अधिक आहे. व गरीब गुरीब कुणब्यास तो न समजल्यामुळें व त्यांच्या अज्ञान स्थितीमुळें आणि गरीबीमुळें त्यांचें फार नुकसान होत असतें व कधी कदाचित समजलें तरी निमुटपणीं ते बिचारे कुणबी नुकसान सोसून स्वस्थ बसत असतात असा बोभाटाही आहे. असो. समजुतदार, धनवान, व ठळक लोकांनीं अशा अज्ञान कुणब्यांस बुचाडून त्यांच्या निढळाच्या घामाच्या मालांत तनाखोरी करावी हें बरें नाहीं व ईश्वराचे घरीं रुजु नाहीं.

नुकतेच फौजदारी मुकदम्यांत ज्यास शिक्षा झाली तो पहिले नंबरचा कैदी देवचंद खत्री या नावाचा दलाल आहे. हा सर्व खामगावांत मशहूर असून सुमारें पन्नास हजार रुपयांचा धनी आहे असें समजतें. यास सगळ्या गावाची उठाठेव करावयास फार उरकत असे व मागें फौजदारी गुन्ह्यांतही हा आलेला होता इत्यादि कारणावरून व हल्लींचे याचे खोटे कृत्यावरून यास जी शिक्षा झाली ती कांहीं बावगी झाली नाहीं असें बहुत लोकांचे तोंडून खामगावास आम्ही समक्ष ऐकिलें आहे. आतां या शिक्षा झालेल्या खटल्याची थोडी हकीकत लिहितो ती अशी.

फिर्यादी केशव पितांबर या दुकानचे गुमास्ते बिरजी वसनजी यांचे तर्फे वकील गंगाधर बाळकृष्ण हे होते.

आरोपी नंबर १ देवचंद बदरीनाथ खत्री दलाल, नंबर २ बाळाप्रसाद चीफ कानस्टेबल खामगाव, नंबर ३ चिंतामण ढिंबे व नंबर ४ रामशिंग. पैकीं नंबर एक तर्फे वकील वामन लक्ष्मण व केशव घनःशाम शिवाय मुंबईचे अटर्नी डा० डालास साहेब व त्यांबरोबर दुभाषी धोंडो शामराव गरूड हे त्यानें आणले होते. नंबर २ चे तर्फे वकील ३ होते. एक विठुल वामन खामगाव पैकीं, दुसरे पांडुरंग गोविंद अकोल्या पैकीं, व तिसरे गणेश रावजी मलकापुर पैकीं होते. नंबर ३ चे तर्फे वकील नारायण रघुनाथ हे होते, व चवथे नंबरचानें वकील दिला नव्हता.

देवचंद नंबर १ चा आरोपी हा बिरजी वसनजी यांचा कापुस वजन करण्याचा काटा ज्या कंपौंडांत ठेविला होता तेथें ता० ३० मार्च सन १८६९ रोजीं दुसरे नंबरचा आरोपी चीफ कानस्टेबल यासहित गेला व तुमचा काटा तपासून पाहाण्याकरितां न्यावयाचा आहे असें म्हणून चवथे नंबरचे आरोपिताचे डोक्यावर तो काटा देऊन घेऊन गेला. नंतर कांहीं वेळानें फिर्यादीस भेटून सांगितलें कीं तुमचा काटा खोटा आहे त्याजबद्दल सरकारांतून तुम्हांस मोठी शिक्षा होईल. व ती न होण्या करितां ५०० रुपये द्याल तर सर्व मिटवामिटव करितो. त्यांनीं तेवढी रक्कम कबुल केली नाहीं. शेवटीं ठरतां ठरतां दोडशें रुपये द्यावे असें ठरून त्याजबद्दल गणेश दास भटर याचा हवाला पटला व काटा ज्याचा त्यास परत मिळाला व या हवाल्याचे कामांत नंबर तीनचा आरोपी मध्यस्थी दाखल कांहीं बोलला हा त्याजवर आरोप होता.

हा गुन्हा फुलपावर माजिस्त्रेटचे अखत्यारांतिल असल्यावरून मि० निकोलेट साहेब यांजकडे न चालतां मे० दस्तुर बहिमनजी ज्यामासजी साहेब यांजकडे चालला. मुकदम्याचें स्वरूप एवढें मोठें झालें कीं सुमारें ७५ तर साक्षी झाल्या. व मुकदम्यांत एकंदर निशाणीचे कागद १३० झाले. फिर्यादी कडील पुरावा बरोबर पाहिल्यानंतर आरोपी देवचंद याजवर पिनल कोडचें कलम ३८४ प्रमाणें जुलमानें घेणें म्हणजे नुकसानीची भीतिघालून व काटा खरा असलेला खोटा म्हणून पोलिसाचे जोरानें १५० रुपये घेतले हा च्यार्ज ठेविला; व त्यास सहाय केल्या बद्दल बाकीचे तिन कैदींवर पिनल कोडचें कलम १०९ प्रमाणें च्यार्ज ठेविल.

सर्व अपराधी गुन्ह्यास नाकबुल होते व त्यांनीं आपआपले तर्फे साक्षिदार दिले होते त्यांच्या बोलण्यांत परस्पर बहुत गैरमेळ दिसून आले.

हा मुकदमा नऊ दिवस चालला होता कचेरीमध्यें दर रोज लोकांची दाटी इतकी होत असे कीं बसावयास जागा न मिळाली तर उष्णकाळचें व भर दोन प्रहरचें ऊन असतां त्यास न जुमानतां कोर्टाबाहेरही कित्येक लोक उभे राहून या खटल्याचा परिणाम काय होतो तो पहावयास मोठे अतुर असत. मि० कारनाक साहेब काटन कमिशनर, मि० निकोलेट साहेब असिस्टंट कमिशनर, व व्यापारी मि० ब्रूय साहेब, मि० उइलसन साहेब, मि० रिचर्डसन साहेब, मि० स्मिथ साहेब वगैरे युरोपियन पाहणारांत होते. तसेच पुरणमल जयनारायण, वर्धमान पुनसी, किसनदास नानराम बिरजी गोकुळदास इत्यादि नेटिव साहूही बरेच होते. शिवाय साक्षीकरितां आणिलेले बहुत थोर थोर लोक होते ते वेगळेच.

आरोपितांनीं आपले तर्फे सर्व पुरावा दिल्यानंतर नंबर १ चा देवचंद यास वाटलें कीं कोणी युरोपियन बारिस्टर आणावा व त्याप्रमाणें डिफेन्सचे वेळीं डा० डालास साहेब यांस त्यानें आणिलें. त्यांच्याबद्दल सुमारें १६०० रुपये त्यास खर्च आल्याचें समजतें. डा० डालास यांनीं इंग्लिश भाषेंत सर्व डिफेन्स सांगितला व कोर्टास ती भाषा येत नव्हती म्हणून मि० धोंडो शामराव यांनीं त्याचा तर्जुमा करून सांगितला. त्याचें मनन केल्यानंतर कोर्टानें ठराव सांगितला तो.

आरोपी देवचंद याजवर च्यार्जाप्रमाणें गुन्हा शाबित आहे सबब त्यानें दोन वर्षे तुरुंगांत राहून मजूरीची कैद भोगावी व ५०० रुपये दंड द्यावा, आणि दंड न दिल्यास आणखीं सहा महिने सक्त मजुरी कैदेची शिक्षा भोगावी— आरोपी बाळाप्रसाद यानें सहाय केल्याचा गुन्हा त्याजवर शाबिद आहे सबब त्यानें ५०० रुपये दंड द्यावा, आणि दंड न दिल्यास सहा महिने सक्त मजुरी कैदेची शिक्षा भोगावी—नंबर तीनचा आरोपी चिंतामण याजवर च्यार्जाप्रमाणें बरोबर शाबिदी झाली नाहीं म्हणून त्यास सोडून दिलें, व नंबर ४ चा रामशिंग याजवर गुन्हा शाबिद झाला सबब त्यानें २०० रुपये दंड द्यावा अगर दंडाऐवजीं तीन महिने सक्तमजुरी कैदेची शिक्षा भोगावी.

हुकुमःप्रमाणें नंबर २ व ४ च्या कैदीनीं दंड दिले व ते मोकळे झाले.

हल्लीं देवचंद व बाळाप्रसाद यांनी फुलपावर माजिस्त्रेटचे ठरावावर एथें कमिशनर साहेबांकडे अपिल केलें आहे. व एथेंही चौकशीचे दिवशीं देवचंद दलाल हा बारिस्टर आणणार आहे असें म्हणतात. मग पुढें काय परिणाम होतो तें पहावें.

याप्रमाणें या फौजदारी मुकदम्याची हकिकत आहे. देवचंद दलाल हा खामगांवामध्यें मोठा गाबुड होता व तो शिक्षा पावून तुरुंगांत गेला तेव्हां एक खामगावांतील काटा उपटल्यासारखा झाला, असें तिकडील लोक म्हणतात. थोडयाच दिवसांमागें खामगावीं दलालास सनदा म्हणजे लायसेन्सें दिलीं त्यांपैकीं एकटया देवचंदानें आपले घरांत १३ लायसेन्सें घेतलीं यावरून त्याचा केवढा उपद्व्याप होता तो दिसून येतो.

हा मुकदमा चालत असतां मलकापुरचे वकील रा० गणेश रावजी यांचे वकीलपत्र मुकदम्यांत दाखल होण्याचे पूर्वी यांनीं रा० पांडुरंग गोविंद कोर्टापुढें बोलत असतां एक आक्टाचा नंबर सांगावयास चुकले व मागे यांच्याकडे पाहूं लागले म्हणून, " सन १८५९ चा आक्ट २ " असें त्यास सांगितलें तें कोर्टास गैरशिस्त वाटून कोर्टानें गणेश रावजी यांस १० रुपये दंड केला. व तो त्यांनीं तेव्हांच भरला.

## दोन तरुणांचें विलायतेस जाणें.

विलायतेस जाणें हें सध्याचे कालांत इतकें महत्वाचें झालें आहे कीं मोठा धार्मिक मनुष्य पवित्र क्षेत्राचे ठायीं जाऊन जें समाधान मानितो तें समाधान किंवा तशा प्रकारची कृतकृत्यता आलीकडील तरुण विद्वान विलायतेस जाऊन येण्यांत मानितात. आम्ही हो म्हणतों कीं औषध गुणास आल्यावर वैद्याची तारिफ करणें गैरवाजवी नाहीं. धार्मिक जनास मोक्ष साधनास जशीं तीर्थें पुनित तशीं व्यवहारी जनास सुखसाधनास विलायतेंतील विद्यालयें योग्य व आवश्यक आहेत यांत संशय नाहीं. एका आधुनिक कवीनें म्हटलें आहे कीं.

श्लोक.

सर्वांवनीचीकुशलैंगिलशांनीं, केली असे लंडन राजधानी ॥ चला तिचें दर्शन घ्याव यासी, नाहीं पुरी अन्य महींत ऐसी ॥१॥

अस्तु. ज्या सरकारचे ताब्यांत आपण आहों त्यांचा तो देश असून सकल विद्यानें कलाकौशल्यादि गुणांनीं परिपूर्ण भरलेला आहे सबब ज्ञानेच्छु जनांनीं तिकडे जाऊनच अध्ययनसंपन्न झालें पाहिजे म्हणजे आपले देशाचें वास्तविक कल्याण लौकर होणार आहे.

दुसरी अशी गोष्ट आहे कीं सरकार चाकरीचे आपले देशांत जे मोठे हुद्दे कलेक्टर, जज्ज, रेविन्यु कमिशनर, हायकोर्टाचे जज्ज, गवर्नरच्या कौंसलांतील मेंबर, वगैरे आहेत ते आपल्या नेटिवांपैकीं विद्वान लोकांस चालवितां येणार नाहींत असें नाहीं परंतु सरकारानें त्यांत अशी एक अट घालून ठेविली आहे कीं जे नेटिव विद्वान विलायतेस जाऊन सिविल सर्विसचे परीक्षेंत पास होऊन कोमिनेटेड म्हणजे सनदी [illegible] शिक्कामोर्तबानें इकडे येतील त्यांस मात्र सदरीं हुद्यांपैकीं जागा मिळावयाच्या. परीक्षेविषयीं आमचे लोक भितील असें काढिमात्र नाहीं. परीक्षेचे प्रकार हल्लीं आहेत त्याहूनही अधिक बिकट ठेवावे पण त्या परीक्षा इकडे हिंदुस्थानांत घ्याव्या इतकीच आमच्या लोकांची सरकारास विनंती होती व तीही इतक्याच करितां कीं तो देश फार लांब व महागाईचा आणि आमचे परीक्षेच्छु लोक फार गरीब यामुळें त्यांच्यानें ती मजल रेटवत नाहीं, त्यास निरुपाय आहे. व आजपर्यंत सिविल सर्विस मध्यें आमच्या नेटिव लोकांचा म्हणवयासारखा पाय शिरकत ना-

ण्यास जी हरकत आली ती विलायतेस न गे ल्याचीच होय असें आलीकडे दृढ ठरून गेलें आहे. त्यामुळेंही विलायतेस जाणें सांप्रत नवीन तरुणांच्या दृष्टीनें मोठें महत्वाचें झालें आहे.

सरकारानें नेटिव लोकांपैकीं थोडया (लाखाच्या किंवा त्याहूनही कमी हिशा इतक्या म्हटल्यास चिंता नाहीं) लोकांस कांहीं मदत व्हावी म्हणून एक मेहेरबानी केली आहे कीं वर्षास ९ विद्यार्थी सरकारी स्कालरशिपा देऊन व जाण्या येण्याचा वाटखर्च देऊन विलायतेस पाठविण्याचा ठराव केला व तो या वर्षी अमलांत येत आहे. आमच्या लोकांचें जें मागणें होतें कीं सिविल सर्विसची परीक्षा हिंदुस्थानांत व्हावी तें सरकारानें कबुल केलें नाहीं त्यापेक्षां हें कृत्य आमच्या लोकांस अधिक हितावह आहे असें नाहीं परंतु अगदींच निराशेपेक्षां वर्षास ९ नेटिव लोक विलायतेस शिकावयास जात जातील व त्यांचे श्रमाचा व विद्येचा आमचे देशास उपयोग होईल हाच लाभ मनून आम्ही अल्पतृप्ण होत्साते स्वस्थ बसतों.

नऊ स्कालरशिपां पैकीं मुंबई इलाख्याचे वाटणीस दोन आल्या व मुंबई सरकारानें त्या रा० रा० कृष्णराव गोपाळ देशमुख व रा० रा० सिताराम नारायण पंडित यांस दिल्या. कृष्णराव गोपाळ हे रावबाहादुर गोपाळरावहरी देशमुख अमदावादचे स्मालकाज जज्ज जे अर्ध्या हिंदुस्थानामध्यें आबाल वृध्दांत प्रसिद्ध आहेत त्यांचे द्वितीय चिरंजीव बि एच्या परीक्षेंत पसंत झालेले आहेत. दुसरे सिताराम पंत पंडित हे रा० रा० शंकर पांडुरंग पंडित दक्षिणा प्राइज्ज कमिटीचे सेक्रेटरी यांचे बंधू आहेत. व हेही बी ए आहेत. देशमुख यांचा मानस बारिस्टरचें काम शिकावें असा आहे व पंडित यांचे मनांतून सिविल सर्विसचे परीक्षेचा अभ्यास करावयाचा आहे. व त्याकरितां या महिन्याचे पहिले तारखेस म्हणजे गेल्या शनिवारीं हे उभयतां गृहस्थ मुंबईहून आगबोटींतून विलायतेकडे चालते झाले. आम्ही मनापासून इच्छितों कीं ईश्वर त्यांस सर्व प्रकारें सहाय देऊन त्यांचा हेतु सिद्धीस नेवो व त्यांस यशस्वी करो.

आज तारखेस आपल्या हिंदुस्थानांत सिविल सर्विसचे परिक्षेंत पास झालेले एकच हिंदु गृहस्थ असिस्टंट जज्जाचे जागेवर आहेत त्यांचें नाव मि० सत्येंद्रनाथ तागोर. व ती विद्या शिकावयाकरितां थोडया महिन्यां मागें रा० रा० श्रीपाद बाबाजी गेले आहेत, व हल्लीं सदरील पंडित हे गेले आहेत. हिंदुस्थान सरकारचे ठरावाप्रमाणें आणखी सात गृहस्थ कोण कोण गेले व कोण कोणत्या विद्याभ्यासाचे उद्देशानें गेले, किंवा कधीं जाणार तें अजून समजलें नाहीं. समजल्यावर आम्ही आपले वाचकांस लिहून कळवू.

कित्येक वर्षांमागें रा० गोविंदविठ्ठल करकरे विलायतेस विद्याभ्यासाकरितां गेले होते व तिकडे बारिस्टरच्या परीक्षेंत पसंत ठरून आले पण यांच्या या विलायतेच्या जाण्यांत आमच्या हिंदु लोकांस उत्तेजन येण्या सारखी गोष्ट झाली नाहीं व कित्येक लोक त्यांस नांवेंही ठेवितात; कारण त्यांनीं तिकडे जाऊन स्वधर्माचें रक्षण केलें नाहीं व ख्रिस्ती धर्म स्वीकारिला. विलायतेस अशा परिक्षेस जाण्यास वय थोडें लागतें, व तितक्या वयाचा मनुष्य स्वतंत्र नसतो त्याच्या वडिलां कडून किंवा पोषकांकडून त्याच्या जाण्याची तरतुराई होत असते; आणि त्यांस असें कळलें कीं विलायतेस जाणारीं मुलें स्वधर्मभ्रष्ट होतात तर ते म्हणतील कीं जळो ती विलायती विद्या व जळो तें श्रेष्ठत्व; हिंदु लोक आपल्या मुलांचें धर्मांतर झालें म्हणजे त्यांस जीवंत असतां मेल्या सारखें समजतात; सारांश त्या घराण्यास या कृत्यानें फार मोठा कलंक लागला असें बहुतेक हिंदु समजतात म्हणून विलायतेस गेलेले तरुण हिंदुलोक जर धर्मांतर पावून परत आले तर आमच्या हिंदुलोकांस त्यांपासून सौख्य होण्यापेक्षां दुःखच विशेष होणार आहे. या गोष्टीवर नवीन विलायतेस जाणार लोकांनीं अगत्य लक्ष दिलें पाहिजे.

सारांश प्रस्तुतचे मन्वंतरांत विलायतेस जाणें आवश्यक खरें, व तिकडील विद्या, कला कौशल्य, देश, रिवाज, व्यवस्था वगैरे पाहिल्यावाचून मनुष्य हरभास व इंग्लिश दरबारांत सर्वांशीं योग्य होणार नाहीं असें विलायत सरकारचें म्हणणें आहे तें बहुतांशीं खरें आहे व त्याकरितां ज्यांस ज्यांस अनुकूल असेल त्यांनीं विलायतेस जावें हें फार चांगलें आहे यांत संशय नाहीं.

धर्माचे दृष्टीनें अजून कोणी कोणी लोक विलायतेस जाण्यांत दोष मानितात परंतु त्यांत फारसा अर्थ आहे असें आम्हांस वाटत नाहीं. व या विषयी "इंग्लंडांतील प्रवास" या पुस्तकांत मि० करसनदास मुलजी यांनीं सविस्तर लिहिलें आहे तें संशयी लोकांनीं वाचून पाहवें अशी आम्ही त्यांस शिफारस करितों. करसनदासजी हे मुंबईंतील सत्यप्रकाश नांवे गुजराथी वर्तमानपत्राचे एडिटर होते; व गुजर आणि भाटे लोकांचे गुरु जदुनाथजी महाराज यांची अनीती व पाप त्यांनीं वर्तमानपत्रांतून बाहेर काढिलें होतें त्याबद्दल त्या जातींतील भोळ्या भाविक लोकांस वाईट वाटून त्यांनीं जदुनाथजी कडून करसनदास यांजवर लायबलची फिर्याद करविली होती परंतु त्याच जातींतील सुधारलेल्या लोकांनीं करसनदास यांस चांगली मदत केली व त्यांचा पक्षही खरा आणि नीतीचा होता म्हणून ईश्वरानें त्यांस सहाय देऊन त्यांकडून जदुनाथजीची फजिती करविली. हे करसनदासजी नंतर विलायतेस गेले व तिकडून आल्यावर इंग्लंडसंबंधी माहिती व विशेष गोष्टी यांजवर त्यांनीं गुजराथी भाषेंत एक महदुपयोगी पुस्तक तयार केलें. त्याच्या दोन आवृत्ती निघून पुष्कळ खप झाला. व आलीकडे त्याचा मराठींत तरजुमा ही त्यांचे मित्र रा० रा० भास्कर हरी भागवत यांनीं केला आहे. या पुस्तकाची १२ रुपये किंमत आहे. सारांश करसनदासजी विलायतेहून परत आल्यावर लोकांनीं त्यांस आश्रय चांगला दिला व त्यांच्या जातवाल्यांनीं ही त्यांचा कांहीं छळ केला नाहीं. व काठेवाडपैकीं एका राजानें आपले कामा करितां मि० करसनदासजी विलायतचे माहितगार म्हणून त्यांस दुसऱ्यानें विलायतेस पाठविलें.

गुजराथेंतील विद्याखात्याकडील एक डिपुटी इन्स्पेक्टर मि० महिपतराम रूपराम हे कांहीं महिने विलायतेस गेले होते व तिकडून आल्यावर जातिवाल्यांनीं त्यांशीं अन्नव्यवहार ठेवण्यास हरकत घेतली होती तेव्हां धीटपणानें ते जातिवाल्यांची परवा न करितां कित्येक वर्षें त्यांपासून तुटक राहिले होते; परंतु वाईट गोष्ट पुढें अशी झाली कीं ते त्यांचें धैर्य गडबडून जातिवाल्यां कडून प्रायश्चित्त घेऊन ते जातींत शिरले. पण पुन्हा लवकरच तट पडून दुसरे लोकांनीं महिपतराम व त्यास प्रायश्चित्त देणार यांस बहिष्कृत केलें. येणेंकडून महिपतराम हे धड "डोमकावळाना खबुतर" असे होऊन फार अप्रतिष्ठित पावले; सारांश त्यांचें विलायतेस जाणें झाल्यापासून देशास कांहींच उपयोग न होतां उलटें त्यांचेंच हसें झालें आहे.

मुंबईचे कस्टम खात्यापैकीं कैलास वासी रामबाळकृष्णजी हे विलायतेस गेले होते व ते परत आल्यावर त्यांच्या जातिवाल्यांनीं व मित्रांनीं त्यांचा योग्य आदर केला हें त्यांच्या जातीस भूषण होय.

प्रसिद्ध घराण्यांतील ब्राम्हण कुळाविषयीं हें हल्लीं रा० ब० गोपाळराव हरी देशमुख यांच्या चिरंजिवाचें पहिलेंच उदाहरण आहे. मागें जमखंडीकर श्रीमंत राजश्री आपासाहेब पटवर्धन सहकुटुंब विलायतेस जाणार म्हणून दोन वर्षें पुकारा होऊन दोन वेळां सर्व तयारी झाली होती, पण पुढें माशी शिंकल्याचा किंवा कसला अपशकुन झाला कोण जाणें, हल्लीं त्यांच्या विलायतेस जाण्याचें नावही निघत नाहीं. असे मोठे गृहस्थ एकवार पाहिल्यानें विलायतेस जाते तर त्यांपासून देशास फार मोठा फायदा झाला असता. असो, हल्लीं जाणारे देशमुखाचे चिरंजिवाविषयीं आमचे मुंबई विर इंदुप्रकाशकर्ते बंधु लिहितात कीं "लोकाचा व्यर्थ व निष्कारण अपवाद न यावा म्हणून देशमुख यांनीं सर्व यथास्थित बंदोबस्त केला आहे."

यावरून आम्हांस फार संतोष वाटतो. व आम्हांस मनापासून वाटतें कीं विलायतेस जाणाऱ्यानें बरोबर ब्राम्हण व सामान सुमान बेतांचें नेलें, व इकडील प्रमाणें सामान्यत: हिंदु धर्मास अनुकूल असें आचरण केलें तर इकडील लोकांनीं त्यांस दोष देण्याची बिलकुल गरज नाहीं. धर्म हा मनानें व सामान्यत:आचरणानें पाळिलेला आहे व कोणी तितक्यापुरता जपतो आहे तर त्यास धर्मबाह्य म्हणण्याचा कोणास अधिकार नसावा व त्रेतायुगांतील कडक धर्माचरण कलियुगांत वर्ज्यच झालेलें आहे आणि हेंही खरें कीं तसल्या आमिष्टासारख्या कडक सोवळ्याच्या युगामध्यें हल्लींच्या नवीन तरुण लोकांस परमेश्वरानें जन्मास घातलें नाहीं ही त्यांवर मोठी कृपा केली आहे. आतांचे युगांत ओलें जळतें व वाळलेंही जळतें अशी गंमत आहे. म्हणजे कोणी कडक धर्माचरणी पाटीभर देव पुढें घेऊन व त्यावर गोणीभर फुलें घालून दिवसाच्या दिवस नाक धरून किंवा गोमुखींत हात घालून बसला व तो दांभिक अगर देव भोळा कसाही असला तरी लोक त्याची पर्वा करित नाहींत व त्या च्या उलट कोणी दोन दोन दिवस स्नान करित नसला, अगर श्रावणी पौर्णिमेखेरीज कधीं संध्या करित नसला अथवा भाद्रपद वद्यपक्षाखेरीज कधीं आपल्या मृत पितरांस तिलोदक देत नसला तरी तो खपतो. एवढेंच कशाला? याहूनही हिंदु धर्मी लोकांचें पुढें पाऊल आहे. आगगाडी मध्यें पाणी प्यायल्यास चालतें, व आगबोटींत अठरापगड जाती बसलेल्या असतां फराळ चालतो. आतां ही आलीकडील सुधारलेल्या लोकांनीं नवी चाल काढली म्हणून जुनें व दांभिक लोक नाकें मुरडित असतील तर मागील दाखले पहा. घोडयाबरोबर माहार जातीचा मोतदर असतां पडशींतील दशम्या फराळास चालतात, यज्ञांत पशूंच्या वपा चालतात, पूजेंत मादकद्रव्यें चालतात, व वेश्या जी जातीची मुसलमानीण असते तिच्या मुखामृताच्या मिटक्या चालतात! अस्तु. याबद्दल आम्ही लोकांस दोष देऊन गोमुख्या व कडासनें घ्यावयास सांगतों असा अर्थ नाहीं. आमचे म्हणण्याचा इतकाच भावार्थ आहे कीं अशीं अशीं महान दोषप्रद मानिलेलीं कृत्येंही प्रस्तुत निर्वेध चालतात व तीं आचरिल्यानें कोणी धर्मबाह्य होत नाहीं, तर त्याच्या लक्षांशही दोषी नाहीं असें नुसतें विलायतेस जाऊन येण्याचें कृत्य कोणी केलें व खाण्यापिण्यांत आणि नीतींत उत्तम जपणूक केली तर त्यास कोणी दोष देऊ नेय व त्याचा हिंदु धर्म तिलमात्र बुडूं नये हें रास्त आहे, व त्याप्रमाणें घडावें आणि उत्तरोत्तर घडेल अशी आम्हांस आशा आहे.

आतां हा फार लांबत आलेला विषय पुरा करितों.

## OUR DUTY TO THE EAST INDIA ASSOCIATION.

Mr. Dadabhai Nowrozji's lectures in the Framji Cavasji Institute on the "East India Association and its work" cannot have failed to raise serious consideration in the minds of those who take a real interest in the welfare of their country, regarding the means by which the existence and energetic working of that most important and useful Association can be ensured. It is as clear as noonday to any body that reflects, that if by any mishap the East India Association were to go down or begin to drag a mere nominal existence, the cause of India's progress and welfare will suffer beyond calculation. Such a mighty and influential union of the well-wishers of India as the Association has effected, composed as it is of noble Lords of the United Kingdom, Members of Parliament, retired officers of the Indian Civil and Military Services, distinguished officers in the services themselves, Chiefs and Sirdars reigning over Native Principalities, educated Natives of India in and out of Government service from all the Presidencies of India,—such a union has been quite unpreceedented, and if it cannot gather and store up the elements of inner life and activity, there can be very little hope for India's future progress and well being. It must be evident to all that the last battlefield where political privileges for the people of India must be fought for and won is England not India, and it is therefore of the utmost importance, nay absolutely indispensable, that there should always be in that

country a standing body which, by its influence, honest advocacy, and accurate information will command attention and respect, will be always on the alert to press Indian topics on the attention of the British nation. British statesmen, and British Legislature, and will stand by the side of India in the hour of need. Such a body, by conserving the just interests of India will also guard the true interests of Britain, for the true interests of the two countries go hand in hand and can never be separated. It is however more reference to India that we must contemplate the importance of the existence of a body like the East India Association. The people of India have to win every thing politically, and though their gain is ultimately a gain to the people of the United Kingdom also by strengthening the tie of allegiance between India and England, still, the latter are in present possession of advantages which they will feel regret to give up in favour of the former on prudential considerations of a far-seeing policy. The people of India, therefore, in order to secure their political rights, cannot do better than take steps to ensure the permanent existence and efficient working of the East India Association. We believe, the native community of Bombay contemplate honouring Mr. Dadabhai Nowrozji for the prominent share he has taken in the establishment and working of the East India Association and in patriotically advocating the cause of his country in England. All honour is due to Mr. Dadabhai, and the highest mark of the honour the community will bestow upon him will fall short of his deserts. But nothing will gratify Mr. Dadabhai Nowrozji himself so much as if an organized movement were set on foot for permanently placing the East India Association on a permanently satisfactory footing. It is notorious that the receipts of the Association fall considerably short of its expenses. The Journal, the very backbone of the Association, is in danger of going down for want of funds, nor can the services of an efficient officer as Secretary be long secured without adequately remunerating him. More funds must therefore be got if it is wished that the Association should go on working efficiently. These funds the Natives of India ought to collect, seeing that the Association is fighting their political battle on the ground where alone there is a chance of success. Looking to the present State of Indian Society, the financial affairs of the Association can never be in a satisfactory state if the were left to depend entirely on the fluctuating income of subscriptions from members. Though the Association has secured a large measure of success in securing members and patrons, yet their number falls far short of what is required to keep the Association above want by mere ordinary annual subscriptions. We have sanguine hopes that the number of members of the Association will go on multiplying, but it will be a very long time before the requisite standard is attained. In the meantime the Association must go on working with unflagging energy and not come to a stand still for want of funds. If the Association fail down, goes with it our cause. The only way to guard against this danger is to collect a fund which, being capitalized, will yield such an amount of interest as will, when supplemented by the annual subscriptions, maintain the Association. Looking into the expenses of the Association and its receipts, we find that a fund of about three lacs of rupees will have to be raised. This looks a very formidable figure, but if the principle which the East India Association has adopted, be acted upon, the sum, we believe, can be raised up. Appeal to the *mass* of the population, get them interested in the movement, let them each contribute a small mite, and still a very large fund will be raised. The prospect of such a thing coming to pass is not at all an impossible one to us, if the leading members of the Bombay community will heartily inaugurate the movement. As far as we can judge, the working of the East India Association has attracted the attention of and given satisfaction to all classes of the community, and even those who are not directly acquainted with its working have a vague favourable idea about it. If our Sir Jamsetjis, the Honourables, and other Shettias were to vouchsafe a word of explanation and persuasion among the mercantile community, the most ignorant shopkeeper even would not grudge to contribute half a rupee as his contribution to the fund. With a population of about eight lacs, our island can, if the plan of appealing to the *masses through their leaders* be adopted, easily raise a Lac of rupees or two. To compass such a result will be the highest mark of honour we can show to Mr. Dadabhai for his patriotic labours; and with such a splendid contribution from ourselves we can decently call upon the Mofussil and the other Presidencies to co-operate in the common cause and may well hope that our call will be responded to. With Mr. Dadabhai among us, it is our part to begin and let us show that we are not backward.

In raising such a fund as we propose, a legitimate question will rise in the minds of many as to the security that the fund will not misapplied and that the efficient working of the Association will be ensured thereby. It is but just that the contributors should have satisfactory assurance on this head and the Committee which will be appointed here for the collection and disposal of the fund should enter; through Mr. Dadabhai, into conditions with the Council of the Association regarding the proper application of the money. With such a guarantee for the right appropriation of the money, we should one and all, strain our nerves to gather funds for the Association and place it on a permanently satisfactory financial footing.

*Indu Prakash.*

## Local
## वऱ्हाड.

मे० लायल साहेब कमिशनर शिमला दऱ्याकडे गेले. तसेच आकोडिंग डायरेक्टर क्या० वोडहौस साहेब हीतिकडे जाणार, व त्यांजबरोबर त्यांचे हेडक्लार्क व अकोल्याचे आणि उमरावतीचे डिपुटी इन्स्पेक्टर जाणार. इलिचपुरचे डि० इ० रा० रा० बाळकृष्ण शास्त्री आगाशे आहेत त्यांनी च्यारमहिन्यांची रजा मागितली आहे. मि. ळाल्यावर ते मुंबईकडे जाणार. बाशीमचे डि०इ० रजेवर गेले.

मे० मेकंजी साहेब हे० क० अकोलाकडे गेले आहेत.

मि० सिलिमान बेग वाशिमाकडील पोलि. इ० यांस जळगावास तहशिलदार नेमण्याचा कमि०साहेबांचा विच्यार आहे असें म्हणतात.

असें समजतें कीं खामगांवापासून जलम पर्यंत रेल्वे लवकर होणार आहे.

या प्रांतीं दर जिल्ह्यांत २०० रुपये पगाराचा एकेक दत्परदार नेमण्याचा विच्यार चालला असल्याचें सु० प्र० पत्रांत लिहिलें आहे.

मोजणी कडील अधिकारी तालमजकुरी मालेगावास न जातां परतवाड्यास राहणार.

सु० प्र०

चांदुरचे तहशिलदार रा० रा० पांडुरंग रावजी खारकर यांस वर्ध्यास एकस्ट्रा असि. कमि० ची जागा मिळाल्याची बातमी आहे.

सु० प्र०

मोर्शीचे तहशिलदार रा० रा० सदाशिव राजाराम मरण पावले. त्यांची चाकरी पेनशनास आली होती.

रा० बाळकृष्ण श्रीधर घुडे उमरावतीचे वकील यांच्या नालायकी विषयीं क्या० फिटझरलड साहेबांनीं रिपोर्ट केला आहे.

सु० प्र०

रा० रा० विठ्ठल बळवंत उमरावती कडील पोलीस इन्स्पेकटर यांनीं ३१४ गुन्ह्याचे चांगले तपास केले म्हणून व त्यांच्या मागील चाकरीवरून त्यांस १२५ रुपये पगार आहे त्याची बढती व्हावी म्हणून स० प्र० कर्त्यांनें शिफारस केली आहे.

या जाहिरातीवर थट्टेदाखल विधवांचीं दोन च्यार पत्रें नांवे ग्याझेटमध्यें प्रसिद्ध झालीं आहेत [illegible] व इतर प्रकारांवरून कार्याच्या [illegible] संशय दिसतो. मग पुढें पडावे [illegible] रोबास ही जाहिरात प्रसिद्ध करण्यास एकही मराठी पत्र पसंत वाटलें नाहीं हें कसें?

खानदेशचे प्रसिद्ध मामलेदार रावसाहेब श्रीधर विठ्ठल दाते यांजवर पिनलकोडचें कलम २११, २२०, ३४२, ३८४, ४४१ प्रमाणें च्यार्ज होते. व त्यांची चौकशी डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेट मि० शेफर्ड यांनीं जानेवारीचे २९ वे तारखेस केली त्यावेळीं फिर्यादीं तर्फेंच सर्व साक्षीदार घेतल्याचे त्यांनीं नाकबूल केलें व फिर्यादी कडून क. २२० व ३४२ अन्वयें आणिले ल्या च्यार्जाचा पुरावा झाला नाहीं असें ठरवून व बाकीच्या च्यार्जांत पि. को. क ७७ प्रमाणें मामलेदार अपराधी नाहीं असें ठरवुन फिर्याद काढून टाकिली, पुढें क्रिमिनल प्रोसिजरच्या ४०४ क० प्रमाणें हायकोर्टानें त्या खटल्याचे कागदपत्र मागविले त्यांचे चौकशीचे वेळीं अर्जदाराचे तर्फे मि० लीथ साहेब बारिस्टर होते. त्यांनीं तक्रार केली कीं आरोपी श्रीधर विठ्ठल यानीं इमानानें तीं कृत्यें केलीं नाहीत सबब ७७ क० तील माफी त्यांस न देतां राहिलेल्या तीन च्यार्जांची चौकशी ही डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेटानें करणें जरूर होतें. तसेच फिर्यादीचे सर्व साक्षिदार क्रि० प्रो० च्या १८६ क० प्रमाणें घेणें ही जरूर होतें.

या विषयीं हाय कोर्टानें डिस्ट्रिक्ट माजिस्ट्राचा रिपोर्ट मागविला. त्यांत यांनीं फिर्यादीचे साक्षिदार न घेतल्याची गोष्ट कबूल केली त्यावरून हायकोर्टानें ठराव केला तो.—

डि० माजिस्ट्रेटानें ता० २९ जानेवारी रोजीं ठराव केला तो रद्द आहे व सदरहु फिर्याद त्यानें पुन्हा ऐकावी व फिर्यादीचे सर्व साक्षीदारांच्या साक्षी घ्याव्या. कदाचित कांहीं साक्षी झाल्यावर माजिस्ट्राची खात्री होईल कीं आतां आरोपितास कोर्टापुढें आणून त्याचा जबाब घ्यावा, अधिक पुराव्याची जरूरी नाहीं, तर मात्र राहिलेल्या साक्षी रद्द कराव्या.

काबुला कडील अशी बातमी आहे कीं अजिम खान सरदार ४०००० इसमांची फौज निशीं हिरातवर येणार आहे.

ग्वालेरकडे महामारीचा उपद्रव झाला आहे त्याचप्रमाणें जबलपुराकडेही उपद्रव सुरू आहे.

## Epitome of News.
## वर्तमानसार.

रा०बा० मोरोबा कानोबा मुंबईचे स्मालकाज जज्ज यांनीं ३ महिन्यांची हक्काची रजा मागितली आहे. व याच गृहस्थांनीं तेथील इंग्लिश वर्तमानपत्रांतून जाहिरात प्रसिद्ध केली आहे कीं आपण पुनर्विवाह करणार आहो; ज्या विधवेची आपणास वरण्याची खुशी असेल तिनें अर्ज पाठवावा. विधवेचें वय २० पासून ३६ वर्षांपर्यंत असावें. व आपण मरण पावल्यानंतर तिला ५० रुपये पेनशन मिळेल असेंही त्यानीं प्रसिद्ध केलें आहे.


## Advertisements.
## जाहिरखबरा.

नोटिस जोरावरमल गंगाधर साहू दुकान अकोलें यांस हरजीमल सुकदेव मारवाडी दुकान अकोलें यांजकडून लिहून कळविण्यांत येतें कीं तुम्ही तारिख २१ माहे एप्रिल सने १८६९ इसवी रोजीं नोटिस वऱ्हाडसमाचार अकोल्याचे मार्फत दिली ती पावली तुम्ही दिलेले नोटिशीचे शेवटील कलमांत लिहिल्याप्रमाणें तुमचे देणें नसून आमचें घेणें तुमचेकडे आहे त्या घेण्याबद्दल व रुईचे सव्वादाबद्दल सर्व खुलासा खालीं लिहिले कलमांत लिहून कळवि

तो तें येणें प्रमाणें.

रुईचीं ओझीं ३१ दर ८७ प्रमाणें सवदा आमचे नावचा झाला नमून ओंकार पुरणमल साहू दुकान अकोलें यांचे नावा नें दलालाचे मार्फत नगदीनें त्या दुकान चे वहिवाटदार आम्ही व सिताराम मारवाडी यांचे विद्यमानें सवदा झाला. दलालाचे तगादृतीं ओंकार पुरणमलचे नांवें लिहिला आहे सदरहू ओझीं सिताराम मारवाडी यानें मोजून देऊन रुपये मागितले असतां तुम्हीं म्हटलें कीं उदईक देऊं. त्याप्रमाणें दुसरे दिवशीं व आणखी कितियेक वेळां रुपयांचें मागणें केलें असतां देतों देतों म्हणून बोलत राहिला परंतु देऊन निकाल आजवर केला नाहीं त्यास सदरहू रुईबद्दल रुपये व त्यांचें व्याज दर शेकडा रुपये दोन प्रमाणें व येक रुपया शेकडा प्रमाणें हुंडणावळ पेठेचे सराफी शिरस्तेप्रमाणें आपलेपासून ओंकार पुरणमल घेण्यास शक्तिमान आहेत.

सदरहू रुईचे ओझ्यांबद्दल रुपये ओंकार पुरणमल साहू दुकान अकोलें यांचे दुकानीं न पटवितां अमानत आहेत म्हणून लिहिता त्यास अशी शाहजोगी दाखविणें सराफी रितीस बरोबर नाहीं. व्याज कमी करण्याचें लिहिलें तें व्याज कमी होणार नतून खर्चाविशीं लिहिलें तो खर्च देवविणें किंवा न देवविणें हा अधिकार कोडताचा आहे. त्याप्रमाणें ओंकार पुरणमल याजकडून तजवीज होऊन ऐन रकम व्याज व हुंडणावळ जबाबाचे खर्चासुद्धां ते सर्व घेतील.

तुमची खातेबाकी मजला देणें नाहीं विनाकारण लिहिता.

तुमची व आमची संवत १९११।१२ चे सालांत ज्वारीचे व्यापारांत शराकत होती त्या शराकतींत येकंदरींत जो नफा झाला त्यापैकीं आमचे हिशाचे रुपये तुमचे येथें अमानत आहेत त्यांनबद्दल आज पावेतों मागणें करित असतां उलगडा केला नाहीं आठ दिवसांत न केल्यास व्याज दरमहा दर शेकडा रुपये ॥ प्रमाणें सराफी शिरस्याप्रमाणें व्याज लाऊन फिर्याद जबाबाचे खर्चासुद्धां घेण्यांत येतील कळावें तारिख १ माहे मे सन १८६९ इसवी मुक्काम अकोलें.

(सही) हरजीमल सुकदेव दस्तुर खुद.

नोटिस संभाजी गायगोळ वस्ती धोतर्डी तालुके अकोलें यास खाली सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते ऐसीजे तुम्हाकडेस आमचे गहू मण १७॥साडेसतरा मण येणें ते आजमितीपासून एकमहिन्याने आणून द्यावे न दिल्यास दिवाणी कोर्टांत फिर्याद करून नोटिस व फिर्यादीचा खर्च सुद्धां घेऊ कळावें तारिख ४ माहे मे सन १८६९.

(सही) गंभीरजी काकड सांगळूद कर याची निशाणी.

नोटिस—गजमलजी वस्ती धोतर्डी तालुके अकोलें यास खाली सही करणार नोटिस देतों कीं तुम्हाकडे आमचे येणें बाकीबद्दल रुपये १२ व व्याज दरमाहा दर रुपयास दोनपैसे प्रमाणें हे आज मितीपासून एक महिन्यांत आमचे येथें आणून द्यावे न दिल्यास नोटिशीचा खर्च व फिर्यादीचा खर्च सुद्धां रुपये भरून घेऊ कळावे तारिख ४ माहे मे सन १८६९ इसवी.

(सही) गंभीरजी काकड सांगळूदकर याचे हातची निशाणी.

नोटिस—नागोजी वल्लद दत्ताजी पाटील वस्ती अनकवाडी तालुके अकोलें यास खालीसही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्हाकडेस आमचे खातेबाकीबद्दल रुपये ३६। व शिवाय व्याज दरमाहा दर शेकडा २ रुपये प्रमाणे येणें आहे ते आज मिती पासून येक महिन्यांत आमचे येथें आणून द्यावे न दिल्यास दिवाणी कोर्टांत फिर्याद करून नोटिशीचे खर्चा सुद्धां रुपये भरून घेऊ कळावें तारिख ४ माहे मे सन १८६९ इसवी मुक्काम अकोलें.

(सही) गंभीरजी काकड सांगळूदकर याचे हातची निशाणी

नोटिस—शिपतरजी गोरले वस्ती परतवाडा तालुके अकोलें यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्हाकडेस आमच खातेबाकी बद्दल रुपये ६१८=॥ व शिवाय व्याज दरमहा दर शेकडा २ रुपये प्रमाणें येणें आहे ते आज मिति पासून एक महिन्यात आमचे येथें आणून द्यावे न दिल्यास दिवाणी कोर्टांत फिर्याद करून नोटिशीचे खर्चासुद्धां रुपये भरून घेऊ कळावें तारिख ४ माहे मे सन १८६९ इसवी मुक्काम अकोलें.

(सही) गंभीरजी काकड याचे हातची निशाणी

नोटिस—नागोजी व राघोजी वल्लद जानजी माळी वस्ती वरुडी तालुके अकोलें यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्हांकडेस खाते बाकी बद्दल रुपये ४४ व ज्वारी खंडी ३॥३ शिवाय व्याज दरमहा दर शेकडा २ रुपये प्रमाणें हे येणें आहे ते आज तारखेपासून येक महिन्यात आमचे येथें आणून द्यावे न दिल्यास दिवाणी कोडतांत फिर्याद करून खर्चासुद्धां रुपये भरून घेऊ कळावें तारिख ४ माहे मे सन १८६९ इसवी मुक्काम अकोलें

(सही) गंभीरजी काकड सांगळूदकर याचे हातची निशाणी.

नोटिस—चंद्रभान वल्लद नारायणजी पाटील गाडे वस्ती अनकवाडी तालुके अकोलें यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्हाकडेस आमचे खातेबाकीबद्दल रुपये ४० व शिवाय व्याज दरमहा दर शेकडा २ रुपये प्रमाणें येणें आहे ते आज मितीपासून येक महिन्यांत आमचे येथें आणून द्यावे न दिल्यास दिवाणी कोर्टांत फिर्याद करून नोटिशीचे खर्चा सुद्धां रुपये भरून घेऊ कळावें तारिख ४ माहे मे सन १८६९ इसवी मुक्काम अकोलें.

(सही) गंभीरजी काकड सांगळूदकर याचे हातची निशाणी

नोटिस—सखाराम वल्लद चंद्रभान वणजारी वस्ती मारुडी तालुके अकोलें यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतेकीं तुम्हाकडेस आमचे खाते बाकीबद्दल रुपये २९ व शिवाय व्याज दरमहा दर शेकडा २ रुपये प्रमाणें येणें ते आज मिती पासून येक महिन्यांत आमचे येथें आणून द्यावे न दिल्यास दिवाणी कोर्टांत फिर्याद करून नोटिशीचे खर्चासुद्धां रुपये भरून घेऊ कळावें तारिख ४ माहे मे सन १८६९ इसवी.

( सही ) गंभीरजी काकड सांगळूद कर याचे हातची निशाणी

नोटिस—महादु वट्टी वस्ती धोतर्डी तालुके अकोलें यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुम्हाकडेस आमचे खातेबाकी बद्दल रुपये १६ व शिवाय व्याज दरमहा दर शेकडा रुपये२ प्रमाणें येणें आहे तें आज मितिपासून एक महिन्यांत आमचे येथें आणुन द्यावे न दिल्यास दिवाणी कोर्टांत फिर्याद करून नोटिशीचे खर्चासुद्धां रुपये भरून घेऊ कळावें तारिख ४ माहे मे सन १८६९ इसवी मुक्काम अकोलें

( सही ) गंभीरजी काकड सांगळूद कर याचे हातची निशाणी

नोटिस विठोबा खोडके वस्ती मोरगांव तालुके अकोलें यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते ऐसीजे तुम्हाकडेस आमचें घेणें आहे तें बितपशील.

६७४=॥ जातिचे खातेबाकी बद्दल ७४=॥
व गहूं खंडी एक बद्दल रुपये६०
२३ ।= बाबु लाघु ढोर याचे जामिनकी बद्दल.

————

९०॥–॥.

सदरील रुपये व व्याज असे आज मितीपासून एक महिन्यात अदा करावें नके त्यास दिवाणी कोडतांत दावा करून फिर्यादीचा खर्चसुद्धां भरून घेऊ कळावें तारिख ४ माहे मे सन १८६९ इसवी मुक्काम अकोलें

( सही ) गंभीरजी काकड सांगळूदकर यांचे हातची निशाणी.

## जाहिरखबर.

खालीं लिहिलेलीं भस्मे व औषधें अति उत्तम रितीनें तयार केलीं आहेत.

१ सांबरशृंगभस्म.
१ प्रवाळभस्म.
१ रुप्याचें भस्म.
१ वंगभस्म (कथील)
१ सिलाजित भस्म.
१ चंद्रप्रभा गुटिका (गोळ्या)
१ नागभस्म (सिसें)
१ ताम्रभस्म.
१ लोहोकांत.
१ पंचकापूर.

इतकीं तयार आहेत व पुढें तयार करण्याचा क्रम चालू आहे ही भस्में व औषधें माफक दरानें देण्यांत येतील.

पुणें पेठ बुधवार तारीख १९ एप्रिल सन १८६९ इसवी

नारो आपाजी गोडबोले

## पाहिजेत.

**मराठींत तयार कंपाझिटर.**

आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्याकरितां मराठींत टाइप जुळणारे जुने महितगार दोन चपल कंपाझिटर पाहिजेत. पगार त्यांचे हुशारीप्रमाणें १९ पासून २० पर्यंत मिळेल. ज्याची येण्याची इच्छा असेल त्यांनीं लवकर अकोल्यास येऊन आम्हास भेटावें किंवा अर्ज पाठवावे.

**वऱ्हाडसमाचाराचे मालक.**

**वऱ्हाडसमाचार** वर्तमानपत्र घेण्याचे बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबदलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्ध आणा प्रमाणें व्याज द्यावें लागेल.

ता० १० माहे आक्टोबर सन १८६८

**वऱ्हाडसमाचाराचे मालक.**

## वर्गणीदारांस विनंती.

गेल्या वर्षीचे आक्टोबर महिन्यांत आम्ही आकोल्यास वऱ्हाडसमाचार पत्र सुरुकेलें. त्यास वर्ष होऊन गेलें तर आगाऊ वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं.

**वऱ्हाडसमाचाराचे मालक.**

**आक्ट.**

सन १८६८चा ९वा
पेशे व धंदे यांवरील कराविषयीं
किंमत च्यार आणे.

## नादारी प्रकरणीं नियम.

हें पुस्तक आमचे छापखान्यांत नुकतेंच छापून तयार झालें आहे. वऱ्हाडांतील न्यायाच्या कोर्टांत हे नियम चालतात. किंमत ८६ सहा आणे व डाक हाशिल एक आणा पडेल. व. स. म्यानेजर

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to remind our subscribers that their Subscriptions, for the present year, should be remitted as early as possible, otherwise, we would, however reluctantly, be under the necessity of ceasing to transmit the paper to their addresses. We believe that this reminder will not fail to arouse the sympathies of our Constituents in the country and bring about speedy remittances from defaulting Subscribers.

*Proprietors of Berar Samachar*

| किंमतीचे ठराव. | रु. | आ |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास…… | ६ | ० |
| साल अखेर …… | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ …… | ३ | ८ |
| सहामाही अखेर …… | ४ | ० |
| फुटकळ एक अंकास …… | ० | ६ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालअखेर ३ रु. ८ आणे.

आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरु तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी.

**नोटिसा वगैरे छापण्याचे दर.**

१० ओळी पर्यंत…… १ रुपया
१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०।०।६
एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छापून प्र० केलें.

# वऱ्हाडसमाचार.

## THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.

VOL. IV AKOLA:—SATURDAY EVENING, MAY 15, 1869 NO. 19

पुस्तक ४ अकोला, शनिवार सायंकाळ तारीख १५ माहे मे सन १८६९ इ० अंक १९

## डा० भाऊदाजीचें रक्तपितीवरील औषध.

आलीकडे या वर्षांत देशांतील बहुधा सर्व लिहिणारे वाचणारे लोकांस व त्यांच्या सांगीनें इतर बऱ्याच लोकांस कळून गेलें आहे कीं मुंबईंतील प्रसिद्ध गृहस्थ डा. भाऊदाजी यांनीं रक्त पितीच्या महान रोगावर एक उत्तम औषध शोधून काढिलें आहे. व तें बऱ्याच रोग्यास देऊन त्याजपासून त्यांस गुण आला आहे. आजपर्यंत युरोपियन व नेटिव वैद्यांनीं या रोगानें ग्रासलेल्यास हटकून गुण आणण्याचे कामीं हात टेकलेले आहेत; परंतु या रोगरूप दुष्ट शत्रूचें निर्दाळण करावयास परमेश्वरानें डा. भाऊ दाजी हे महावीर उत्पन्न केले, या कृपाभरित देणगीबद्दल ईश्वराचा गौरव करून डा. भाऊ यांस अधिकाधिक यश चिंतावें

या दिव्य औषधीच्या योगानें भाऊ दाजी यांची कीर्ति केवळ हिंदुस्थानांतच नव्हे पण युरोपखंडांत ही देशोदेशीं प्रसृत झाली. आपल्या इंग्लिश सरकारानें भाऊ दाजींची इच्छा असल्यास तें औषध त्यांनीं सरकारास कळवावें व त्याबद्दल त्यांस मोठी देणगी दिली जाईल अशाविषयीं एक डाक्टर मध्यस्थ घालून बोलणें लाविलें होतें पण त्यांणीं तें कबुल केलें नाहीं असें म्हणतात.

आलीकडे रेवरेंड आबट साहेब सातारचे मिशनरी यांनीं डा० भाऊ दाजीकडील थोडें औषध मिळविलें आणि तें दुसऱ्या प्रकारानें तयार करून दोन रोग्यांस देऊन पाहिलें व त्यांस कांहीं गुण आला इतक्यांत आबट साहेब विलायतेस जावयास निघाले म्हणून त्यांनीं अशी आपली इच्छा प्रदर्शित केली कीं माझ्या औषधाची माहिती करून घेऊन तें पुढें चालविण्यास व त्याचा अनुभव घेण्यास कोणी उमेदवार तयार असेल तर मी त्यास सर्व सांगेन तेव्हां डा० यंग साहेब या नावाचे एक गृहस्थ या कामाचे पुढारी झाले पण त्यांची तब्बेत पडली विलक्षण; त्यांनीं प्रथमतःच डा० भाऊदाजी यांजवर शस्त्र चालवून त्यांची निंदा आरंभिली व आबट साहेबांची स्तुति चालविली. तथापि थोर ते थोरच. डा० भाऊ यांनीं त्यांकडे फारसें लक्ष दिलें नाहीं.

डा. भाऊदाजी यांनीं मराठी जुन्या वैद्याप्रमाणें औषध फार गुप्त ठेविलें असा एक यंग साहेब त्यांस दोष देतात, परंतु आम्हांस वाटतें कीं ही यंग साहेबांची गैरसमजूत आहे. फारच महत्वाची जी गोष्ट तिजविषयीं उत्तम प्रकारें मनाची खात्री झाल्याशिवाय ती प्रसिद्ध न करणें हें शहाणपणाचें काम आहे सबब डा. भाऊदाजी यांनीं उतावीळपणा केला नाहीं हें फार चांगलें केलें.

आतां हें खरें कीं सर्व राष्ट्रांचें लक्ष डाक्टर भाऊंच्या औषधाकडे लागलेलें आहे त्या अर्थी ते त्याविषयींची माहिती व आपला अभिप्राय वगैरे प्रसिद्ध करतील तर लोकांस फार संतोष होईल. व आम्हांस हेंही ठाऊक आहे कीं डा. भाऊदाजी हे जुन्या संप्रदायांतील नसून नवीन शिकलेल्यां पैकीं आहेत तेव्हां त्यांच्या मतें प्रसिद्धी करणें योग्य ठरल्यास ते त्यांत गुप्त ठेवितील असें सहसा होणार नाहीं सबब त्यांस व्यर्थ दोष देणें हें फार हलकेपणाचें काम आहे.

## पुनर्विवाहाची वाटाघाट.

गेल्या आठवड्यांतील इंदुप्रकाशांत पुनर्विवाहोत्तेजक सभेच्या सेक्रटरीची जाहिरात प्रसिद्ध झाली आहे कीं या महिन्याचे २३ वे तारखेस मुंबईस डा० आत्माराम पांडुरंग यांचे एथें कांहीं विशेष नवरीच्या कामाकरितां पुनर्विवाहोत्तेजक मंडळीची सभा भरणार आहे. व त्यादिवशीं मंडळीशिवाय इतरांस घेतलें जाणार नाहीं.

१० वे तारखेच्या ठाणें एथील सूर्योदय पत्रांत लिहिलें आहे कीं पुनर्विवाहोत्तेजक सभेचे चिटणीस रा० रा० विष्णु परशराम शास्त्री ठाण्यास येऊन पुनर्विवाहास कांहीं लोकांची अनुकूलता घेऊन गेले व १९ वे तारखेस मुंबईस एक पुनर्विवाह होणार असें ऐकतों.

मुंबई ग्याझेट पत्रांत जाहिरात पाहिली कीं "पाठारे रिफार्म असोसिएशन" ची सभा मुंबईस मि० नाना मोरोजी यांचे एथें १६ वे तारखेस भरणार आहे. हें असोसिएशन पाताणे परभु म्हणजे रा. ब. मोरोबा कानोबा यांच्या जातीच्या मंडळीचें आहे. व मोरोबा कानोबा त्या मंडळीचे सेक्रटरी आहेत. व पुनर्विवाहास अनुकूल अशी या सभेच्या संबंधानें त्यांनीं एक दोन पुस्तकेंही छापविलीं आहेत व आलीकडे त्यांनीं स्वतांचा पुनर्विवाह करण्याची इच्छा जाहिरातीनें प्रसिद्ध केली आहे. आणि सभा भरण्याची गडबड चालू आहे त्या अर्थीं कांहीं शुभचिन्ह असावें असें दिसतें.

पुनर्विवाहोत्तेजक मंडळीची जी गडबड चालली आहे तिजविषयीं आमचे समजण्यांत आलें आहे कीं मंडळीच्या सहायानें चित्पावन ब्राम्हण ज्ञातींतील एका विधवेचा पुनर्विवाह होण्याचा घाट चालला आहे व तो बहुधा ज्येष्ठ मासीं जी एक लग्नतिथी आहे त्यादिवशीं घडून येण्याचा संभव आहे.

ईश्वर करो आणि हे वाटाघाट चाललेले दोन्ही पुनर्विवाह निर्दोष होवोत व निर्विघ्न सिद्धीस जावोत आणि आपसून लोकांत व्यर्थ हासें न होतां तसे करण्यास उत्तेजन येण्याचा प्रघात पडो.

मोठे काळजीची गोष्ट दिसते कीं पुनर्विवाह सशास्त्र व निर्दोष कसा होईल? व लोकांस तो कसा मानवेल? पुनर्विवाह न करणाऱ्या ब्राम्हणादि जातींत ज्या लोकांची संख्या लक्षावधीची आहे त्यांत म्हणून असें इच्छिणारे त्यांपैकीं फार झालें तर पाच च्यार शें निघतील व त्यांत ही पुनर्विवाह झालाच तर त्या वधुवराबरोबर अन्नादि सर्व व्यवहार करणारे या पांच च्यार शेकड्यांपैकीं पाच च्यार दशक निघणारे आहेत, बाकीचे तोंडानें होहो म्हणणारे, आणि निषेध पक्षीं तर लक्षावधी लोकांचा समाव आहे तेव्हां पुनर्विवाह लोकांस मानवण्याची जी अडचण आहे ती कशी व केव्हां दूर होईल ती होवो.

आतां निषेध पक्षीं जे लक्षावधी लोक आहेत त्यांत पुनर्विवाहास शास्त्र अनुकूल नाहीं सबब अशास्त्र कर्म करावयाचें नाहीं अशी ग्रंथज्ञानानें ज्यांची समज होऊन पुनर्विवाह हा केवळ अधर्म आहे असें मनापासून व तळतळून म्हणणारे असे थोडेच निघतील. म्हणजे काशीपासून रामेश्वर पर्यंत असे शास्त्रद्रष्टे शेपन्नासच असतील नसतील. आणि बाकीचे लक्षावधी लोक गतानुगतिक म्हणजे स्वतांचा विचार न पाहतां लोक जातात त्या मार्गानें जाणारे आहेत.

पुनर्विवाहास शास्त्राधार नाहीं असें जें म्हणणें आहे त्याविषयीं आमचें असें मत आहे कीं तें म्हणणें बिलकुल खरें नाहीं पुनर्विवाहविधी व निषेध यांवरचे दोन्ही पक्षे शास्त्री एकास एक मिळवून बारकाईनें व विवेक बुद्धीनें पाहिले आहेत त्यांवरून पुनर्विवाह केवळ अशास्त्र नाहीं अशी आमची व आमच्या कित्येक मित्रांची खात्री झाली आहे व आमच्या पुनर्विवाहोत्तेजक सभेचे सेक्रटरी शास्त्रसंपन्न रा० रा० विष्णु शास्त्री पंडित हे कित्येक निषेध पक्षी शास्त्र्यांशीं कित्येक ठिकाणीं वाद करून व आपले पक्षाची प्रबलता दाखवून विजयी होऊन आले आहेत त्यावरून सुज्ञ देशसुधारकांस व विच्यारी आणि दूरदृष्टी लोकांस शास्त्राधाराविषयीं तिलमात्र संशय राहिला नाहीं. आतां वाद चालूच आहे हें शास्त्री लोकांचें वाक्चातुर्य व कोटिक्रमाचें भांडार आहे व तें दुराग्रहानें तसेंच चालविलें तर वर्षांच्या वर्षें कधींच संपणार नाहीं, बाकी त्यांत पाहिलें तर कांहीं अर्थ नाहीं आणि पुनर्विवाह व्हावा हा विधी व हल्लींच्या काळास याचें मोठें अगत्य आहे.

आतां पुनर्विवाहाची किकेक वर्षे रूढि मोडली आहे तेव्हां तो कसा करावा असेंही बहुत लोकांस अडचण वाटते; परंतु या अडचणींत कांहीं जीव नाहीं. कांहीं काल कांहीं तसे करण्याची आवश्यकता न पडली व त्यामुळें तें कार्य केलें नाहीं तर रूढि मोडली असें होत नाहीं. आवश्यकता जी आहे ती बहुत कालांच्या रूढी पाडितें व मोडितें, तेव्हां रूढि नाहीं म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आगगाडींतून बसून जाण्याची वहिवाट कधीं रूढि होती काय? नव्हती. आगगाड्याच नव्हत्या मग रूढी कोठून असेल? असें असतां आपण रूढीचा कांहीं विच्यार न करितां सुखार्थ आगगाडींत बसूं लागलों. व दोनशें कोस मुंबईस जावयाचें तर आज सायंकाळीं गाडींत बसून खुशाल झोप घेऊन उद्यां अकरा वाजतां जेवणास मुंबईस जाऊं लागलों. व रूढीची हरकत घेतों तर माळव्यांचे तट्टू मिळवून त्याजवर बसून व शा शा करून उन्हातान्हाची पंधरा दिवस दगदग करावी तेव्हां मुंबई दिसणार; मग हो यातना नको यास्तव आपण आगगाडींत बसावयाची नवी रूढी घातली. तशाच कांहीं रूढी व शास्त्रेंही सुखास बाध आणूं लागलीं म्हणून लोकांनीं त्यास हरताळ लाविली. पहा! मुंबईहून जहाजांत बसून मनुष्य सुरतेस किंवा सिंध कराचीस गेला किंवा तिकडून कोणी आला तर तो मोठा दोष होतो असें वचन आहे पण तें आलचे कालांत कोणीही मानित नाहींत. तसेंच जीव जाईल तर जावो पण इंग्लिश भाषा शिकूं नये असा जबरदस्त निषेध असतां सांप्रतचे कालांत कोणी तरी तो मानितो आहे काय? नाहीं. सर्व लोकांचे आणि भट, वैदिक, पुराणिक, शास्त्री, अग्निहोत्री यांचे मनांत पक्कें बिंबून गेलें आहे कीं आजचा मनु विशेषें इंग्लिश शिकण्याचाच आहे व तसें केलें नाहीं तर निर्वाहास व सुखसाधनास अंतर पडणार; हें पाहून व मुख्यत्वें निर्वाहावर नजर देऊन भटा भिक्षुकांनीं पोथ्या गुंडाळून ठेविल्या, वेदाच्या, कव्याच्या, शास्त्राच्या वगैरे शाळा ओस पाडिल्या व आपआपलीं मुलें इंग्लिश शाळेंत पाठवून दिलीं. व कित्येक दुढ्ढाचार्य शास्त्री स्वतांही इंग्लिश भाषा पाहून व इंग्लिशांची सेवा करून उदरदरी भरूं लागले, तेव्हा शास्त्राचा व रूढीचा निषेध कोठें राहिला? राहिला नाहीं. आणि पुनर्विवाहास तर शास्त्रानुकूलताही आहे व त्यापासून बहुत सोयी

व सुखें आहेत मग त्याची रूढी मध्यंतरीं जरी मोडवली तरी तिची पुन्हां उभारणी करण्यांत दोष काय?

ईश्वरानें स्त्रिया व पुरुष यांस बहुतांशीं सारखें उत्पन्न केलें. व त्या उभयतांनीं आपणामध्यें विवाहसंबंध जोडून आपलें जगतांतील सौख्य पुष्कळपट वाढवून घेतलें आहे. आणखी पृथ्वीवरील बहुतेक राष्ट्रांचा नियम पाहिला असतां पहिल्या विवाहसंबंधांत बिघाड झाला तर दुसरा करितात. म्हणजे स्त्रीचा पहिला नवरा मरण पावला तर ती दुसरा नवरा करिते; व याचप्रमाणें पुरुषाची बायको मेल्यास तो दुसरें लग्न करितो. व आपले हिंदुस्थान देशांत ही पाहिलें असतां ब्राम्हण व त्यांचा कित्ता वळवून चालणाऱ्या शेणवी, पर्भु, सोनार, वगैरे थोड्या जाती खेरिज करून अठरा पगड जातींत स्त्रीचा नवरा मेला तर तिचें, व पुरुषाची बायको मेली तर त्याचें, दुसरें लग्न करितात व या श्रेष्ठ मानिलेल्या ब्राम्हणादि जातींतही पुरुषाची बायको मेली तर दुसरी करितात, दुसरी मेली तर तिसरी करितात, तसेंच चैनीकरितां एक जीवंत असतांही दुसऱ्या कित्येक बायका करितात, आणि बायकोस मात्र तिचा नवरा मेला तर दुसरा नवरा करूं देत नाहींत आणि तिची हजामत करून तिला सांदींत टाकून देतात. काय सांगावें ब्राम्हणांनीं सर्व हिंदुस्थानांत आपणास भूदेव म्हणविलें व कित्येक गोष्टींत आपलें विद्वत्तेचें वगैरे श्रेष्ठत्वही राखिलें परंतु विधवांचा पुनर्विवाह न व्हावा असा जो त्यांनीं आग्रह धरिला व त्याप्रमाणें बराच काल वर्तत आले ही मोठी घोड्याएवढी त्यांनीं चूक केली. यांत त्यांनीं आपलें शहाणपण सगळें बुडविलें, या करण्यांत त्यांनीं आपल्या बहिणी, मुली, सुना वगैरेचें सुख व सौभाग्य यांवर दरोडे घातले. जारकर्माच्या विशेष प्रवृत्तीस हें यांचें करणें एक कारण झालें. या त्यांच्या कृत्यानें नीतीचा ऱ्हास होऊन विधवा स्त्रिया पुराणिक वगैरेचीं कुळें झालीं. व तेणेंकरून गर्भपात व बालहत्या या पातकांचे डोंगरचे डोंगर वाढले. प्रजोत्पत्ती कमी झाली, व देश हीनबळ झाला. आणि खरोखर या पातकांचे झाडे विधवांचा पुनर्विवाह नको म्हणणाऱ्या आग्रही ब्राम्हण लोकांस कृपाळु परमेश्वराजवळ केव्हांना केव्हां तरी द्यावे लागतील असें आम्हांस वाटतें.

मागील काळापेक्षां हल्लीं ब्राम्हणांचें महत्व कमी होत चाललें आहे. त्यांनीं आपली विद्या दुसऱ्यास न कळूं देण्याचें बराच काळ संधान केलें होतें तें आतां फसलें आहे. त्यांनीं बहुतेक गोष्टींत आपल्या पोळीवर तूप ओढून घेतलें होतें ती त्यांची स्वार्थबुद्धी लोकांचे नजरेस येत चालली आहे तर त्यांनीं आतां उमजावें आणि सर्व लोकांत मिसळून व्यवहारांत सुखाच्या, व सोईच्या, आणि देशाचे हिताच्या ज्या गोष्टी त्या सिद्धीस नेण्याविषयीं झटून कंबर बांधावी. ब्राम्हण लोकांच्या भाग्यकालीं इंग्लिश लोक केवळ जंगली होते ते आतां सर्व पृथ्वींत श्रेष्ठ, कलाकौशल्यनिपुण, व राजाधिराज झाले. त्यांचे मागून पारशी लोकांनीं डोकें वर करून आपलें वैभव बरेंच मजलेस आणिलें, आणि आपण हिंदु लोक मागें पडलों; आपणामध्यें देशाभिमान नाहीं, एकी नाहीं, दूरदेशचा प्रवास नाहीं, कला कौशल्याविषयीं अभिरुची नाहीं, शिवाय आपले पायांत जातिभेदाची बेडी जबरदस्त, धर्मांतील पोकळ आचार विचाराच्या अडचणी फार, व विधवांच्या तळतळाटाचें आपले माथां पातक मोठें, म्हणून आपण जगांत पूर्वीं श्रेष्ठ असतां हल्लीं नादान झालों आहों, ताबेदार झालों आहों, भिक्षुक म्हणजे भिकारी झालों आहों, परदेशीय लोकांच्या थट्टेस पात्र झालों आहों, व आलस्यनिद्रेनें आपणास घेरलें आहे तर आपणामध्यें कांहीं खरें पाणी असल्यास आतां आपण औदासिन्य टाकून सत्वर जागृत व्हावें व आपल्या कर्तव्यकर्मास लागावें आणि हल्लींच्या प्रसंगास पहिलें कर्तव्यकर्म कोणतें आहे म्हणाल तर विधवाविवाहाची वाटाघाट चालली आहे त्यास मदत करावी.

घडघडित ज्या गोष्टीस शास्त्राची अनुकूलता आहे व जी नीतीस आणि सुखास कारणभूत आहे व जिच्या घडण्याविषयीं लहान मोठ्या शेंपन्नास लोकांचे प्रयत्न चालले आहेत व सरकारही जिच्या पक्षास अनुकूल आहे ती गोष्ट म्हणजे "विधवांचा पुनर्विवाह" तो आतां झाल्यावाचून राहतो असें नाहीं, व प्रतिकूल असणाऱ्या लोकांवाचून नडेल असेंही नाहीं; होणार तें होऊन जाईल, आणि अशा चांगल्या, नीतीच्या व देशहिताच्या कामीं असे असे ठळक व समजदार गृहस्थ उदासीन अथवा विरोधी राहिले असा परिणामीं टिळा लागेल तर तो न लागण्याविषयीं ज्यांस जपणें योग्य वाटेल त्यानीं जपून संधी साधून घ्यावी हें उत्तम आहे.

आतां पुनर्विवाहोत्तेजक मंडळीस आमचें सांगणें आहे कीं जो विधवाविवाह त्यांस कर्तव्य असेल तो त्यांनीं नानाभिड्याच्या प्रमाणें गुपचुप करूं नये. प्रसिद्ध समारंभानें, चांगले खर्चानें, व यथाशास्त्र विधीनें ढोलदार करावा; तरच त्यांस भूषण आहे, नाहीं पेक्षा दोष आहे.

पुनर्विवाहोत्तेजक मंडळीचा समुदाय फार थोडा म्हणून त्यांस इतर लोकांपासून बहिष्कृतासारखें दूर राहवें लागेल किंवा नाहीं, याचाही या प्रसंगीं विच्यार करून मंडळीनें धारिष्ट केलें पाहिजे. शास्त्ररीत्या वागल्यानें लोकांस प्रसिद्धपणें धर्मबाह्य म्हणतां येणार नाहीं हें खरें आहे तथापि मनानें ते मंडळीशीं विरोध ठेवितील व अन्न विवाहादि व्यवहार बंद करितील तर त्यांस कोणाच्यानें हरकत घालवेल असें वाटत नाहीं. आणि असें झालें तर या मंडळी ची "पुनर्विवाहित ब्राम्हण" म्हणून एक वेगळी जाति होईल असा संभव आहे तर या सर्व गोष्टींचा मंडळीनें नीट विच्यार करून व योग्य बंदोबस्त करून जें करणें तें सुखें करावें व पुढें टाकलेलें पाऊल मागें नेऊं नये.

## NORTON'S PUMPS.

NORTON'S patent tube wells, which worked so successful in Abyssinia, are being gradually introduced into India. In many parts of this country they would prove a great boon. For instance about six months ago, when the drought was so great in Khandeish that the beds of many rivers were dry, by sinking these pumps in the dry beds plentiful supplies of water were obtained. The invention is exceedingly simple, and the pumps are light and compact for transport. On Saturday afternoon one of these wells was sunk in the compound of the Presidency Engineer's bungalow on the Esplanade, and a number of gentlemen assembled to witness the operation. The sinking of the tube was accomplished in about three quarters of an hour, when at a depth of about 13 feet water was struck, and was pumped up. The soil was sandy and a large quantity of sand was at first pumped up with the water; but the experiment was quite successful, and must have satisfied those present of the great utility of such tube wells. Another well had been sunk in the same compouud sometime ago, and a copious supply of good water is obtained from it. Messrs Remington and Co. have been appointed agents in Bombay for the sale of the patent, and a supply is now on the way from England by the Overland route.

## THE PROPOSED CIVIL SERVICE COLLEGE.

THE proposal to establish a Civil Service College at Home, for the education of the sons of gentlemen who have been at any time in civil employ, whether at Home, in the Colonies, or in India, has been taken up warmly in Madras. On the 26th February the Honorary Secretary of the Madras Committee was able to report to the London Committee that upwards of Rs. 10,000 had at that time been subscribed in the Presidency which we are occasionally good enough to call the Benighted Presidency, and he saw no reason why five times that amount should not shortly be on its way to England. In Bombay, on the other hand, the Committee have stated plainly that the public in that Presidency fail to perceive that the scheme offers to subscribers any special pecuniary advantage. In Madras also, where the proposal has since been so warmly taken up, doubts were at first entertained on this point; but these were promptly removed by the London Committee. In a recent letter to the Secretary of the Madras Committee they state the advantages so clearly, that it may be as well, perhaps, if we quote them at some length for the information of intending subscribers on this side of India:—

"There was no intention whatever on the part of the Home Committee to make any distinction between the services. They quite contemplated that the term 'Civil Servants' should be interpreted as liberally as possible. They, therefore, think that any gentleman who has at any time served in any civil capacity should be regarded as eligible to become a subscriber to the Civil Service College.

"That the right to one nomination, so far as the accommodation provided will permit, should be absolutely secured to a donor of £40, to be exercised by him at any time at or after the opening of the College.

"That priority of right should be determined by the date of payment.

"It is, however, understood, that after the claims of subscribers of sums of £40 and upwards have been satisfied, the nominees of the subscribers of smaller sums should be admissible, priority being in each case decided by the amount and date of the subscription."

We are not aware what the Committees in Bengal, the Punjab, and Oudh have been doing in this cause. The Committee for these Provinces has circulated to every division all the papers bearing on the subject, and we believe that earnest efforts are being made in many quarters to promote the success of this obviously excellent institution.—*Pioneer.*

## NATIVE CIVIL SERVANTS.

THERE can now, remarks the *Indian Daily News*, no longer be any doubt as to the admission of natives into the Indian Civil Service. It will be in the recollection of many of our readers that, about a year ago, three young men left for England to compete in the Civil Service examinations. This they have done successfully, Baboo Romesh Chunder Dutt (Presidency College) stands third in the order of merit. Baboo Behary Lall Goopta (Presidency College) the fourteenth, and Baboo Sorendronath Banerjee (Doveton) thirty eight. Some interest was occasioned at the time of the departure of these young men from Calcutta, especially as one of them departed unknown to his friends; though it is said that his wife knew of it, and approved of his departure to compete for honors in the West, and her womanly sacrifice is rewarded by his success. A yonng member of the Armenian community (named M. P. Gasper) has also passed successfully. He is said to be the first of his race, who has passed for the Civil Service, though others have been called to the bar.

THE "Madras Mail" says—"Sir Barnes Peacock assisted Lord Canning in framing the celebrated Press Gagging Act in 1857. He may possibly be still of opinion that the public have no right to think, or at all events to express their thoughts publicly. But surely it is time for public men in India to disabuse their minds of this idea. It is not long ago that Mr. Gladstone declared that without the corrective influence of the Press public men would live in a fool's paradise. It is really melancholy to find that, even with this influence, there are many estimable individuals who in this country occupy that position."

The Governor General in Council is pleased, under Section 3 of Act II. of 1869, to appoint Major William Nembhard, Bengal Staff Corps, Commissioner, East Berar Hyderabad Assigned Districts, to be a Justice of the Peace for British India.

## Local
## वऱ्हाड.

जळगाव एथून एका ग्रहस्थास पत्र आल्यावरून समजतें कीं तेथें तहशिलदारें कचेरिस आग लागली होती पण ती तहशिलदार व नायब तहशिलदार यांनी मेहनत घेऊन लवकर विझविली व तिचा आंत प्रेष होऊं दिला नाहीं; तेणेंकरून सरकारी कागद पत्र व खजीना वगैरेचा बच्याव झाला. तहशिलदारांनीं मेहनत करणारे लोकांस १० रुपये बक्षिस दिले. मागें पुसदचे तहशील कचेरिस आग लागल्याचे बाबदींत हयगयीवरून तहशिलदार, पेषकार वगैरे बरतर्फ झाले होते, तर आतां सरकारानें जळगाव तहशिलदार यांची तारिफ केली पाहिजे-

पूर्व वऱ्हाडचे कमिशनर मेजर नेंभार्ड साहेब यांस जस्टिस आफ धि पीस केलें.

बुलढाण्याचे डिपुटि कमिशनर नांदुऱ्यास आले आहेत.

चिखली तालुक्यांतील अमडापुराहून पत्र आल्यावरून कळतें कीं तेथिल शाळेंत चीफ कानस्टेबल मुशेखा व दुसरे कियेक ग्रामस्थ परीक्षेस गेले होते. व मुलांचा अभ्यास पाहुन खुष झाले. व त्यानीं साडे आठ रुपये वर्गणी करून मुलांस पुस्तकें, मिठायी व आंमरदे वाटले.

पुसदचे पोलिस इन्स्पेक्टर मि० सिलेमान बेग यांस जळगावचे तहशिलदार नेमून त्यास येण्याबद्दल डिपुटी कमिशनर साहेबांकडून लिहून गेलें व रेसिडेन्सी आर्डरमध्यें त्यांची नेमणूकही छापून आली.

बाळापुर तालुक्यांत बाडेगावास आग लागून च्यार पाचशें घरें जळालीं असें म्हणतात.

मूर्तिजापुरचे तिसरे प्रतीचे तहशिलदार रा० रा० तुकाराम गोविंद यांस दुसरे प्रतीचें केलें.

मि० अबदुल अजीज अकटिंग तहशिलदार यांस मुकरर करून मोर्शीस नेमिलें.

बुलढाणें गावास पोलिस आकट १८६१ चा ५ याचें ३४ वें कलम लागू केलें.

अकोला, खामगाव, व बाशिम एथील मुनसिपल कमिटयांस सन १८६७ चा १९ वा आकट लागू केला.

उमरावती—हवा अगदीं बेताल होऊन गेली आहे. दोन प्रहरीं प्रखर ऊन पडतें. कालपर्वापासून वारा सोसाट्यानें वाहत आहे. काल आकाश अभ्रांनीं व्याप्त होतें. व बारीक बारीक पावसाचे येंब पडले, ह्यावरून वर्षाकाल लवकर लागण्याचीं चिन्हें दिसत आहेत. देवी शिवाय इतर आजाराचें प्राबल्य नाहीं. लवकर पर्जन्य लागेल तर पाण्याची तूट पडणार नाहीं.

काल तिसरा प्रहरचे सुमारास भुसार दरवाज्या बाहेर शेट नाईक मानमोड यांच्या कपासी गोठाणास आग लागली ती इतकी भडकली कीं, दोन अडीच तासांचे आंत सर्व इमला जळून खाक झाला. ह्या गोदामांत ७०० रुईचे ओझें होतें, तें हो सर्व जळालें. एकंदर सुमारें ६०००० रुपयांचें नुकसान झालें.

ह्या गावांत कुत्रीं फार आहेत व त्यांपासून रहदारी लोकांस फार अडचण होते ह्याजकरितां मुनिसिपाल कमेटीनें कुत्रीं मारण्याची सुरवात केली आहे. गेल्या पांच सहा दिवसांत एकंदर १४० कुत्रीं मारलीं.

स० प्र०

### अकोला.

कमिशनर साहेब व डायरेक्टर साहेब चिखलदऱ्यासच आहेत; व दुसरेही बरेच युरोपियन लोक तेथें जमले आहेत; चिखलदरा हा इलिचपुर जिल्ह्यांत इलिचपुरापासून १२ कोसांवर गाविलगडानजीक डोंगर आहे; व ह्यावरील हवा नहर महाबळेश्वराप्रमाणें उन्हाळ्यां दिवसांत थंड असते.

कमिशनर साहेबांचे क्लार्क आफधि कोर्ट आजच चिखलदऱ्याकडे गेले.

एथील डिपुटि इजुकेशनल इन्स्पेक्टर व डायरेक्टरचे हेड क्लार्क तिकडे गेलेले अजून आले नाहींत.

डा० पोर्टर साहेब डिस्पेन्सरीकडील डाक्टरास च्यार्ज देऊन रजेवर गेले.

नदीचें पाणी अगदींच सुकून गेलें आहे तर धरणापलीकडील थोरले साठवणांतून पुन्हा कांहीं पुरवठा देण्याची अधिकाऱ्यानीं तजवीज करावी. उन्हाळ्याची, मजल बरीच मारली गेली; आतां अवशेष थोडा आहे सबब कांहीं पाणी सोडिलें तर शहरास त्याचा चांगला उपयोग होईल.

अहमदनगरचे पेनशनर प्रिन्सिपल सदर अमीन खा० ब० सयद कमालुदीन साहेब एथें आले आहेत.

आंब्याचा सुकाळ या वर्षी आधिक दिसतो, व नासके कुसकेही आंबे विकावयास रस्त्यांतून पुष्कळ पाटया बसतात व तसे आंबे खाल्यानें लोकांस खचित रोग होणार आहे, सबब अधिकारी या गोष्टीचा बंदोबस्त करितील तर फार चांगलें होईल.

हवा फार उष्ण झाली आहे व वारा सायंकाळपासून व कधीं कधीं दिवसांही फारच वेगानें त्रासरूप वाहतो. तेणेंकरून मनुष्याचे आंगावर भाते फुंकल्यासारख्या गरम वाफा चालतात.

डिपुटि कमिशनर साहेबांची स्वारी काल रोजीं एथें आली.

पोलिसचे जनरल इन्स्पेक्टर यांची स्वारी एथें येऊन खामगावाकडे गेली.

## Epitome of News.
## वर्तमानसार.

मुंबईचे विक्टोरिया बागे मध्यें माजी गवरनर सर बार्टल फ्रियर साहेब यांचे मढमेचा एक पुतळा करून बसविलेला आहे. तो कोणी दुष्टानें फोडून छिन्न भिन्न केला. सबब पोलिस कमिशनर यांनीं जाहिरात दिली आहे कीं तो मनुष्य कोणी पकडून देईल तर त्याला २०० रुपये बक्षीस मिळेल.

गेल्या रविवारीं सुरतेस मोठी आग लागून बहुत दुकानें व घरें जळालीं नुकसान सुमारें ४०००० रुपयांचें झालें.

रा० बा० मोरोबा कानोबा स्मालकाज जज्य यांनीं हायकोर्टापुढें अशी तक्रार नेली आहे कीं एका जज्याच्या फैसल्यावर स्मालकाल जज्याचे फुल कोर्टांत अपिला दाखल चौकशी करून फैसल फिरवितात असें करण्यास कायद्याचा आधार असल्याविषयीं संशय आहे. याविषयीं काय निर्णय होतो पाहू.

मुंबई सरकारचे अंडर सेक्रटरी मि० एन डब्ल्यु डानियल यांस डा० बिही तुरुंगावरील इन्स्पेक्टर जनरल यांचे जाग्यावर नेमणार.

पुण्याचे खजिन्यावर ज्यांनीं खोटा सिक्का बटाविला त्यांस पकडण्याकरीतां [illegible] १००० रुपयांचा जाहिरनामा [illegible] आहे.

आम्हांस लिहिण्यास [illegible] कीं बंगाल्याकडून सिविल [illegible] रितां तीन बाबूलोक विलायतेस गेले होते व ते तिघेही पसत झाले.

मुंबई इलाख्यांत मि० गोपाळ [illegible] टिळक एल० सी० ई० यांस तिसरे प्रतीचे असिष्टंट इंजिनियर केलें.

कराचीस येक किल्ला बांधण्याचा विचार होता पण त्यास ५० लक्ष रुपये खर्च लागतो म्हणून तूर्त बेत रहित केला आहे-

कर्नल आर. स्ट्रेची साहेब आर ई सी एस आय यांस हिंदुस्थान सरकारचे पब्लिक वर्क खात्याचे अफिशियेटिंग सेक्रटरी नेमिलें.

दरबार वगैरे समारंभांत पाहिले प्रतीचे राजे लोक यावयाचे त्यांचे ऐवजीं त्यांचे पुत्र आले तर वडिलास [illegible] तोफांचा मान असेल त्यापेक्षां [illegible] दोन तोफांचा कमी मान देत जावा असा ठराव झाला आहे.

बंगाल्याकडील हंटर साहेब सिविल सरविस यांनीं येक दोन पुस्तकें चांगलीं केलीं म्हणून सरकारांतून यांस २०००० रुपये बक्षिस मिळाले.

काबुलाकडील सरदार [illegible] यांचा मुलगा महमद इस्हाक खान यास मीरशीरा बाद यानें पकडल्याची खबर आहे.

शिकंदराबाद व चदरघाट येथें तारायंत्राचीं आफिसें कर[illegible] बेत चालला आहे.

## Advertisements.
## जाहिरखबरा.

नोटिस—राजश्री खुशाल हरिदास बेपारी मुंबईकर दुकान मुंबई ठिकाण मांडवी बाजार यास नोटिस देणार नाणकराम संतुकराम साहू दुकान पेठ खामगांव तालुके बाळापूर जिल्हा अकोलें यांजकडून नोटिस देण्यांत येतेकीं माघ शुद्ध १ संवत १९२५ तारिख १९ जानेवारी इसवीपासून माघ वद्य ३० संवत १८६९ मजकूर तारीख ११ फेब्रुआरी सन १८६९ पावेतों खामगाव येथील आमचे प्रेसावर रुईच्या कच्या गाठी येकंदर ५६२ तुम्ही आम्हा कडून बांधविल्या त्याचे मेहेनतीबद्दल तुमचे व आमचे ठरावा प्रमाणे येणें ते.

१३९८≡ प्रत गाठी २२१ दर ॥= प्र.
१७०॥. ,, ,, ३४१ ,, .॥. प्र.

३०८॥=

येणेंप्रमाणें रुपये तीनशें आठ रुपये दहा आणे आमचे मेहेनतीबद्दल तुम्हाकडेस येणें असून तुम्हास नेहमी आम्हीं तगादेही करित गेलो त्यावेळी तुम्ही हिशेब तयार करून देतों असें कबूल करित गेला परंतु रकम दिली नाहीं व सुमारे आठ दिवसां पासून येथून दुकान आटोपून मुंबईस निघून गेला यास्तव हल्लीं या नोटिसीनें तुम्हांस कळविण्यांत येते कीं. ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत सदहू रुप[illegible] व्याज [illegible] प्रमाणें [illegible] नोटिसीचा खर्च असे सर्व रुपयांचा निकाल करावा. जर याप्रमाणें तुम्ही न केलें तर कोर्ट मार्फतीनें सर्व रुपये [illegible] सुद्धा तुम्हास द्यावे लागतील कळावें तारिख १३ मे सन १८६९ इसवी.

(सही) नानकराम संतुकराम साहू
दुकान पेठ खामगाव.

नोटिस—रा० [illegible] दानमल साहू दुकान पेठ खामगांव तालुके बाळापूर यांस नोटिस देणार नानकराम संतुकराम साहू दुकान मजकूर यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्ही सोमवारीं म्हणजे तारिख ३ माहे मे सन १८६९ इसवी रोजी सकाळचे ९ वाजतां आमचे गुमास्ते बाळकृष्ण यांजपासी २९ बोझे रुईचा सवदा ८५॥।६२८ केला आणि त्यानंतर त्याच दिवशीं तिसरे प्रहरीं पुन्हा आमच्यासी बोझे ६१ चा सवदा दर ८५॥। प्रमाणे भावानें करून तुम्हास थपी दाखऊन दिली व त्यापैकीं ४॥. बोझे तुम्ही तोलून घेतले बाकी ८१॥. बोझे तुमचे तगांत तेच दिवशीं दाखल करून दिले व त्या बोझ्याबद्दल तुम्ही आम्हास येक हजार रुपये १०[illegible] आगाऊ दिल्हे आहेत. असे असून ८१॥. बोझे तुम्ही आज पावेतों वजन करून घेत नाहीं. सबब हल्लीं तुम्हांस कळविण्यांत येते कीं सदरहु राहिलेले बोझे ही नोटिस पावल्या पासून दोन दिवसांत तोलून घेऊन बाकीचे रुपये आमचे आम्हास द्यावे. जर या प्रमाणे तुम्ही न केलें तर सदहूं बोझे बाजारभावाप्रमाणें विकून टाकूं आणि त्यांत जी नुकसान येईल ती या नोटिशीचे खर्च [illegible] सराफी सिरस्त्याप्रमाणें व्याजासुद्धां तुम्हापासून भरून घेण्या करितां योग्य रितीनें कोर्टामार्फत दावा करून भरून घेतले जाईल हें तुम्हास कळावें. व सदरहु बोझे तुमचे तगांत आहेत ते तेथें जों पर्यंत राहातील तों पावेतों त्याची कोणत्याही प्रकारची जोखीम आम्हाकडेस नाहीं सर्व जोखिम तुमची तुम्हाकडेस असे कळावें.

तारीख ११ माहे मे सन १८६९ इसवी

(सही) नानकराम संतुकराम साहू
दुकान पेठ खामगाव.

बडोदें—तारीख ६ मे सन १८६९.

ज्ञानप्रकाशकर्ते यांस—

परगणे शिनोर येथील फौजदार सालभाई नागर यानें फौजदारी कामांत सहाहजार रुपये लांच खाला. त्याची चौकशी हुजूर फौजदारींत लखोबा फडके यांजकडे होऊन त्यावर शाबिदी झाली असून त्यास लल्लुचे शिफारशी मुळें त्याचा जामीन कबला

जो सरकारी दप्तरांत होता तो काढून देऊन त्यास परागंदा केलें. ही गोष्ट माहाराजास कळल्यावरून त्यांनीं लखोबास बोलावून सांगितलें कीं, सदर्हू सहा हजार रुपये तूं आतांचे आतां सरकारांत भर आणि सदर्हू मनुष्यास आणून हजर कर. इतका हुकुम होतांच सर्वांनीं लखोबास सांगितलें कीं, तूं गोपाळराव मैराळ यांजकडून रुपये आणून भर. आम्ही सर्व हिशेरशीप्रमाणें रुपये देऊं त्यावरून त्यानें राव साहेब यांजकडे जाऊन रुपये मागितले. तेव्हां ते म्हणाले कीं, हे रुपये तुम्हीच घेणार किंवा कसें; त्यावरून लखोबानें जबाब दिला कीं, मी, दिवाण साहेब, ललुभाई,व बळवंतराव केशव असे घेणार. त्यावरून त्यांनीं रुपये देऊन तीन सह्या करून घेतल्या ते रुपये सरकारांत भरतात तों तो कागद तिघांचे सहीचा माहाराजांजवळ गेला. त्यावरून माहाराजांनीं सोमवारीं सदर्हू मंडळींचीं घरें जप्त करून त्यांस कैद करून गायकवाडी चालीप्रमाणें मोठें समारंभानें बराबर स्वार शिपाई व आरबांचे पाहाऱ्यांनिशीं मकरपुऱ्यास नेलें- ललूयाचे घरचीं दप्तरें तेरा गाडे भरून नेलीं आहेत. सदर्हू लोकांस बिडया घालून ठेविले आहेत, व हल्लीं कसी चौकशी चालू आहे. ललू याणें अठ्ठाविस लक्षांची जमा बोरसद मुक्कामीं करून लाख रुपयांचा इमला बांधून गुमास्ते ठेवून पेढी चालविली होती, त्या ठिकाणींही माहाराजांनीं साहेब मार्फत जप्ती बसविली आहे. ही गोष्ट माहाराजानीं फारच शहाणपणाची केली. आतां महाराजांस दिवाण साहेबांचें खरें रूप लौकरच कळेल. सदर्हू पकडापकड झाल्यामुळें रयतेस तर इतका आनंद झाला कीं, तीन दिवसांत येथील नरशिंगजीस चार कळशा तूप (६४ मण) नवसाचें आलें, साखर पेढे वाटण्याचीं तर गणतीच नाहीं. दुसरें असें समजतें कीं, महाराज आपले सर्व रयतेस जाहिरनाम्यानें असें कळविणार आहेत कीं, ज्या ज्या लोकांनीं ललूस लांच दिला आहे त्यांणीं पंधरा दिवसांचे आंत सरकारांत अर्जद्वारा कळवावें म्हणजे त्यांचा पैसा परत मिळेल आणि सदर्हू मुदतींत जर कोणी न कळवील आणि मागाहून सरकारास माहित पडेलतर त्यांस कायद्याबरहुकूम सजा मिळेल. असो, हल्लीं दुःख इतकेंच वाटतें कीं, ललूस कैद केल्यामुळें आमचे धुरंधरनिधी दिवाण भाऊसाहेब शिंदे यांचा टील फारच बेहोष होऊन गेला आहे तथापि महाराज, हरीबा दादा, नाना यशवंत आदिकरून मंडळी होईल तितका दिवाण साहेबांचा दिल वढाव करित आहेत. पुढें कसें काय होईल तें पहावें.तात्पर्य या गामक वाडींत महाराजांचे पदरीं नेक सुशील व उत्तम सल्लागार मनुष्यें जीं भरलेलीं आहेत त्यांतील मुगुटमण्यांपैकीं हा एक मासला आपले वाचकांपुढें ठेविला आहे-

श्रीमंत राजश्री बापूसाहेब विंचुरकर यांची स्वारी एक वेळ येथें येऊन चिरंजिवास ठेवून परत सातान्यास गेली होती, परंतु हल्लीं भाऊशिंदे यांणीं पुनः त्यांस तार पाठवून बोलावून आणिलें आहे. येथील लोक असें म्हणतात कीं भाऊशिंदे हे यांस आपले हाताखालीं नायब दिवाण नेमणार आहेत परंतु असे राज्यांत बापूसाहेब नौकरी पत्करतील असें मला वाटत नाहीं. आणि जर पत्करतील तर कांहीं अंशीं तरी रयतेचें कल्याण होईल यांत संशय नाहीं.

सुरत जिल्ह्यांतील मांडव्याचा मामलेदार याणें लांच घेतल्याच्या वहिमावरून त्यास मि० होपसाहेब सुरतेचे कलेक्टर यांणीं अमानत केलें आहे असें समजलें आहे.

रेवाकाटयांत उदेपुरच्या संस्थानांत बापुजी यशवंत कारभारी होते त्यांच्या जागयावर भाऊराव किबे यांस नेमलें आहे.

तुमचा मित्र
अकबर नवीस.

---

नोटिस मारुती वलद शिवराम पाटील मौजे नांदुरें खुर्द तालुके मलकापूर यासी खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं आम्हीं तुम्हास तारीख १० फेब्रुवारी सन १८६८ इसवी रोजीं रुपय १०९ बद्दल कर्जाचा दस्तऐवज लिहून देऊन त्या ऐवजीं आम्हीं आपलीं खालीं लिहिलेलीं शेतें गहाण लिहून दिलीं असून तुमचे ताब्यांत ही दिलीं आहेत त्या शेतांचा तपशील.

१ शेत टिकें खारोपें मळा
१ शेत गोडाना मळा सर्वे नंबर १३९
१ शेत १ टिकें अखरमुंड सर्वे नंबर ४४.

सदरहूप्रमाणें ३ शेतें लिहून दिलीं असून त्या रोख्याचे रुपये आम्ही व्याजासुद्धां झालेले घेऊन आमचीं शेतें खालीं करून आमचे ताब्यांत द्यावीं म्हणून म्हणत असून रुपये नगदीही आणिले होते परंतु तुम्ही रुपये घेतले नाहीं आणि शेतेंही खालीं करून देत नाहीं. म्हणून म्हणतां त्यावरून हल्लीं या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं रुपये व्याजासुद्धां होत असतील ते तुम्ही सांगाल त्या दुकानीं पाहिजे तर अमानत ठेवितों अगर च्यारजणा समक्ष हिशेब करून रुपये घेऊन दस्तऐवज फाडून द्यावा आणि आमचीं शेतें आमचे हवालीं करून द्यावींत या तजविजीपैकीं कोणती ही तजवीज ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांत करून रुपये घेऊन शेतें द्यावीं नाहींपेक्षां आमचें नुकसान तुमचे जवळून भरून घेऊं शिवाय आज तारखेपासून पूढें तुम्हास व्याज मिळणार नाहीं अगर सरकारांत फिर्याद करून शेतें घेऊं मग खर्च तुमचे अंगावर पडेल कळावें तारीख २९ माहे मार्च सन १८६९ इसवी.

मुक्काम मलकापूर.

(सही) विठोबा वलद गणा पाटिल मौजे धरणगांव

---

## पाहिजेत.

### मराठींत तयार कंपाझिटर.

आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्याकरितां मराठींत टाइप जुळणारे जुने महितगार दोन चपल कंपाझिटर पाहिजेत. पगार त्यांचे हुशारीप्रमाणें १५ पासून २० पर्यंत मिळेल. ज्याची येण्याची इच्छा असेल त्यांनीं लवकर अकोल्यास येऊन आम्हास भेटावें किंवा अर्ज पाठवावे.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

---

नोटिस–रा०सोनबा त्रिंबक वाणी राहणार अकोलें यास वर्धमान पुनसी आणीं कंपनी मुंबईकर दुकान मूर्तिजापुर याजकडुन नोटिस देण्यांत येते कीं, तुम्ही आम्हास तूप दिलें त्यापैकीं तुमचे कडे बाकी घेणें मण २८ अठ्ठावीस मण घेणें आहे त्याचा ऐवज आगाऊ दिला तें तूप आज मित्ती पासून आठ रोजांत द्यावें; न दिल्यास फिर्याद करून तो खर्च व नोटिशीचा खर्च सर्व तुम्हास द्यावा लागेल कळावें तारीख ११ माहे मे सन १८६९ इसवी.

( सही ) वर्धमान पुनसी आणि कंपनी वहिवाटदार भवानसिंग
विठ्ठल सिंग

---

नोटिस—रा० देवराव माधवराव तूपकरी राहाणार अकोलें. यांस वर्धमान पुनसी व हिवाटदार भवानसिंग विठ्ठल सिंग दुकान मुर्तीजापूर याजकडुन नोटिस देण्यांत येते कीं, तुमचे कडे तूप मण १३२ त्या पैकीं तूप मण बाकी निघत आहे ती आज पासून आठ दिवसांत द्यावी. न दिल्यास फिर्याद केली जाईल त्याचा खर्च व नोटिशीचा खर्च सर्व तुम्हास द्यावा लागेल कळावें. तारीख ११ माहे मे सन १८६९ इसवी.

( सही ) वर्धमान पुनसी दस्तुर
भवानसिंग विठ्ठल सिंग

---

नोटिस—रा० पासुबा रुखुबसा वाणी तुपकरी यांस देवसी थारे वहिवाटदार कानजी भिमसी मुंबईकर दुकान मोर्तिजापूर-यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमचे कडे तूप घेणें आहे तें तुम्ही आजवर दिलें नाहीं. तर तूप आज मितिपासून आठ रोजांत द्यावें न दिल्यास तुमचेवर फिर्याद करू आणि सर्व खर्च तुम्हास द्यावा लागेल कळावें तारीख ११ माहे मे सन १८६९ इसवी.

( सही ) देवसी थारे दस्तुर कानजी
भिमसी

---

नोटिस—रा० सोनबा त्रिंबक वाणी तूपकरी राहाणार अकोलें यांस देवसी थारे वहिवाटदार कानजी भिमसी दुकान मुर्तीजापूर यजांकडून नोटिस देण्वात येतें कीं तुम्ही आम्हास मण तू। दिलें त्या पैकीं तुमचे कडे तूप निघत आहे तें तुम्ही दिलें नाहीं. सबब नोटिस दिली आहे तर तुम्ही आज मित्ती पासून आठ रोजांत द्यावे न दिले तर फिर्याद करू त्याचा खर्च व नोटिशीचा खर्च तुम्हांस सर्व द्यावा लागेल. कळावें तारीख ११ माहे मे सन १८६९इसवी

( सही ) देवसी थारे दस्तुर कानजी भिमसी

---

नोटिस–रा०देवराव सखाराम सोनार राहाणार मुर्तिजापूर यांस देवसी थारे वहिवाटदार कानजी भिमसी मुंबईकर-दुकान मुर्तिजापुर यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्ही आम्हास तूप दिलें त्यापैकीं, बाकी तूप ३५। मण ३॥। शेर निघत आहे तें तुम्ही दिलें नाहीं. तुमचे कडे मागणें दहापंधरावेळ केलें परंतु तुम्ही दिलें नाहीं. याजकरितां तुम्हास नोटिस दिली आहे तर तूप आज मित्तीपासून आठ रोजांत द्यावे अगर भाव रुपये ८ मणी प्रमाणें हिशेब चुकवून द्यावा न दिलेतर तुम्हावर फिर्याद करू आणि सर्व खर्च तुम्हास द्यावा लागेल कळावें तारीख ११ माहे मे सन १८६९ इसवी.

( सही ) देवसी थारे दस्तुर कानजी
भिमसी.

---

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचे बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येथें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्धआणा प्रमाणें व्याज द्यावें लागेल. ता० १० माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे
मालक.

---

## वर्गणीदारांस विनंती.

गेल्या वर्षाचे आक्टोबर महिन्यांत आम्ही आकोल्यास वऱ्हाडसमाचार पत्र सुरूकेलें. त्यास वर्ष होऊन गेलें तर आगाऊ वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं-

वऱ्हाडसमाचाराचे
मालक.

---

आक्ट.
सन १८६८चा ९वा
पेशे व धंदे यांवरील कराविषयीं
किंमत च्यार आणे.

---

## नादारी प्रकरणीं नियम.

हें पुस्तक आमचे छापखान्यांत नुकतेंच छापून तयार झालें आहे. वऱ्हाडांतील न्यायाच्या कोर्टांत हे नियम चालतात. किंमत ०६ सहा आणे व डाक हाशिल एक आणा पडेल. व. स. म्यानेजर

---

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to remind our subscribers that their Subscriptions, for the present year, should be remitted as early as possible, otherwise, we would, however reluctantly, be under the necessity of ceasing to transmit the paper to their addresses. We believe that this reminder will not fail to arouse the sympathies of our Constituents in the country and bring about speedy remittances from defaulting Subscribers.

*Proprietors of Berar Samachar*

---

| किमतीचे ठराव. | रु. | अ |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास... ... | ६ | ० |
| साल अखेर ... ... ... | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ ... ... | ३ | ८ |
| सहामाही अखेर ... ... | ४ | ० |
| फुटकळ एक अंकास ... ... ... | ० | ६ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालअखेर ३ रु० ८ आणे.

---

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरु तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी.

नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत... ... ... १ रुपया
१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०।०६
एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

---

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छापून प्र० केलें.

# वऱ्हाडसमाचार.

**THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.**

VOL. IV    AKOLA :—SATURDAY EVENING, MAY 22, 1869    NO. 20

पुस्तक ४    अकोला, शनिवार सायंकाळ तारीख २२ माहे मे सन १८६९ इ०    अंक २०


## यंदाची सिविल सर्विसची परीक्षा.

विलायतेस सिविल सर्विसची परीक्षा दर वर्षास होत असते व यंदाचे परीक्षेस आपले हिंदु ग्रहस्थ कोणी पास होतील असा संभव नव्हता. आणि एकाएकी च्यार हिंदु ग्रहस्थ पास झाले असें समजलें तेव्हां या विषयीं आपणा हिंदुस्थानच्या लोकांस विशेष आनंद होईल यांत संशय नाहीं. गेल्या आठवड्यांत इंडियन डेलीन्यूस पत्रावरून आम्ही इंग्लिश भागांत या विषयीं लिहिलें होतें त्यांत त्या पत्रकर्त्यानें मुंबई इलाख्यांतील एक ग्रहस्थ पास झाल्याचें मुळींच लिहिलें नव्हतें. ती गोष्ट या आठवड्यांत बाहेर पडून मागील आनंदास दुगुणी झाली आहे.

आमच्या प्रिय वाचकांस ठाऊक असेल कीं आनरबल मंगळदास नथू भाई यांची ट्रावलिंग फेलोची जागा पतकरून रा० रा० श्रीपाद बाबाजी हे गृहस्थ गेल्या आक्टोबर महिन्यांत विलायतेस गेले होते; त्यांस तेथें पोंचून सात महिनेही झाले नाहींत तों त्यांनीं यंदाचे सिविल सर्विसचे उमेदवारांत आपलें नाव लिहून दिलें व परीक्षेत त्यांस यश येऊन ते सिध्धी पावले हें त्यांच्या विदेस व श्रमास मोठें भूषण खरें.

हिंदुस्थानांतील एकंदर जे च्यार हिंदु उमेदवार पसंत झाले त्यांचीं नावें व नंबर येणे प्रमाणें आहेत.

| नाव. | नंबर. |
|---|---|
| १ बाबु रमेशचंद्रदत्त | ३ |
| २ बाबु बिहारी लाल गुप्त | १४ |
| ३ बाबु सुरेंद्रनाथ बानरजी | ३७ |
| ४ श्रीपाद बाबाजी ठाकूर | ३९ |

यंदाच्या सिविल सर्विस परीक्षेंत युरोपियन उमेदवार २९५ व नेटिव उमेदवार ५ मिळून ३०० होते. त्यांतून ५० पसंत ठरल. पैकीं युरोपियन ४६ व नेटिव ४; आमचे नेटिव पाचांतुन च्यार पसंत व युरोपिन २९५ तुन ४६ हें प्रमाण पाहिलें असतां युरोपियनांवर फार मोठा जय नेटिवास या खेपेस आला आहे. व आतां वर्षानुवर्ष नेटिव लोक या परीक्षेस जाण्याचा पाठ अधिकाधिक पडत आहे त्या अर्थीं ते आपले मिळविलेलें भूषण राखण्यास सतत श्रम करितील व या त्यांच्या स्तुत्य उद्योगांत कृपाळू परमेश्वर त्यांस यश देवो असें आम्ही मनापासून इच्छितों.

( CONTRIBUTED )

## कागदाची चलन उर्फ नोटी

कागदाची चलन या जमान्याची आहे. असें नाहीं. जुने इतिहास पाहिले असतां कळतें कीं कागदाची चलन युरोप खंडांत अजमासें ७५ वर्षांपासून लोकां मध्यें जारी होती; परंतु आलीकडेस मात्र जसजसे व्यापार वाढत चालले, व लोकांची बुध्धी, तेज व हुशारी जास्ती झाली तसतशी कागदाची चलनही वाढत जाऊन त्याचा बंदोबस्त जास्त झाला; या हिंदुस्थान देशांत सन १८६१ सालचे १९ वे आक्टावरून या चलनीचा आरंभ झाला; परंतु ज्याप्रमाणें चांदी घेऊन सरकारी छाप्यावरून त्या चांदीला रुपया म्हणतात त्याप्रमाणेंच कागदावर तोच सरकारी छापा घालून त्या कागदाची किंमत रुपयाचे किमती प्रमाणेंच होती मग ती तशी किंमत कां लगूनये? म्हणजे सरकाराला दगा करणें असल्यास चांदीचे रुपयांत कांहीं तरी दगा केला असता पण लोकांची खात्री असून सरकारी चांदीची चलन निःसंशय घेतात आणि कागदाची चलन पाहून नानाप्रकारचे संशय उत्पन्न करतात. कारण नवीन पदार्थ म्हणून त्याची चांगली ओळख झाल्याखेरीज खात्री होतच नाहीं; या कारणानें या प्रांतांत नोटी नुकत्याच जारी झाल्यामुळें लोकांची त्यांजवर खात्री नसून किती एक लोक नोटी बिलकुल घेतच नाहींत; याजकरितां लोकांचे हितास्तव आम्हीं खुलासा लिहितों.

चांदीचे किंवा सोन्याचे चलनीस कांहीं तरी मर्यादा असते कारण हे पदार्थ इकडे उत्पन्न होत नसून लांब असलेले मुलखांतून आणावे लागतात; परंतु जितके पाहिजेत तितके हिंदुस्थानांत येत नसल्यामुळें रुपयांची टंचाई व्यापारांत होऊन कुणबी इत्यादि लोकांस भारी व्याज दिल्यावाचून काम पडल्यास रुपये मिळू सकत नाहींत. तेव्हां सदरी प्रमाणें टंचाई न व्हावी म्हणून सरकारानें कागदाची चलन जारी केली यांत किती उपयोग आहे याचा विचार लोकांनीं केल्यास सहज समजेल.

चांदीचे चलनी पेक्षां थोडक्यांत पुष्कळ किमतीचा समावेश सरकारी कागदांचे चलनींत होतो. म्हणजे हजार रुपये ठेवण्याकरितां मोठी पिशवी पाहिजे. तितकेच किमतीची एक नोट खिशांत ठेविल्यास मुंबईस किंवा काशीस घेऊन गेल्यास अडचण पडत नाहीं.

जोपर्यंत इंग्रजसरकारचा अंमल आहे तोंपर्यंत नोटीला बट्टा लागणार नाहीं. चांदीचे रुपयांस तरी एक वेळ फार घासलेला असल्यामुळें खजिन्यांत देखील घेत नाहींत. व साहू लोक तर कांहीं तरी बट्टा घेतल्यावांचून तसा रुपया देत नाहींत. तसेंच चलनीचे रुपये अवघे म्हणजे मग बटयाला कांहींच प्रतिबंध नसल्याचे दिसतें यावरून कुणबी लोकांनीं आपले कष्टाचे किमती बद्दल नोट घेतल्यास साहु लोकांचा बट्टा बसणार नाहीं. कारण कीं, खर्चास रुपये लागत असल्यास कोणतेही खजिन्यांत नोट दिल्यास रुपये बिनबट्टा मिळतील. व फाटलेली नोट बिनदिक्कत सरकार घेऊन तिचे रुपये किंवा दुसरी नोट देतील. यांत उपयोग नाहीं असें कशावरून?

एके ठिकाणाहून दुसरे ठिकाणीं रुपये पाठविण्याचे आहेत तरि हुंडी घ्यावी तर लवकर कोणी देत नाहीं. दिल्यास मन मानेल तशी हुंडणावळ मागतात त्यांत घेणाराचें नुकसान चोहोंकडून होतें. ही नसती कशानें दूर व्हावी! कागदाची नोट नोटअफिसांत तत्काळ मिळते. ती घेऊन तिचे दोन तुकडे करून एके दिवशीं एक तुकडा टपालांतून पाठवावा व दुसरें दिवशीं दुसरा तुकडा पाठवावा म्हणजे बिनधोक पाहिजे तेथें नोट पोहोंचेल. जरी नोट गुम झाली किंवा चोरीस गेली तरी चालू असलेले कायद्यावरून तिची किमत मिळते म्हणजे येक तुकडा असल्यास तत्काळ किंमत मिळते.

जशी चांदी व सोनें चोरी करण्यास सोपें आहे तशी नोट चोरी करण्यास सोपी नाहीं. कारण कीं तिजवर नंबर असल्यानें ओळखण्यास कठिण नाहीं. रुपयावरील शिक्याला कोणी ओळखील काय? याजवरून नोट जवळ बाळगून लिहिणार लोकांनीं नंबर अलाहिदा टिपून ठेविल्यास चोरीचाही प्रतिबंध असतो. असें असून सरकारी नौकर व वकील लोक यांनीं चांदीचे रुपयांपेक्षां कागदाचे रुपये कां जवळ ठेऊनयेत? व ठेवित नाहींत? हें नकळे! नोटाविषयीं त्यांची गैरसमजूत हेंच बहुधा कारण असावें. चोरी झाली म्हणजे नगदीची ओळख न पुरतां चोरी करणार खुशाल राहून धनी मात्र आपले नशीबावर नुकसानीचा हवाला ठेऊन दिलगिर राहतो.

या नोटींत सरकारचा फायदा पाहिला तर इतकाच दिसतो कीं सरकारचे टांकसाळेंत भारी किमतीचें जें यंत्र आहे तें नोटी चालल्यास कमी काम केल्यानें झिजले जात नाहीं यांत पुष्कळ नफा आहे. दुसरें चांदीचे झिजीमुळें पुष्कळ नुकसान होतें तें वांचेल. तिसरें जो पैसा नोटांऐवजीं येतो तो पैसा सरकारी व्याजीं कागद घेऊन व्याजाचा नफा होतो. मात्र लोकांस पैसा देण्यासाटीं खजिन्यांत कांहीं कमी नाहीं यावर लोकांनीं लक्ष दिल्यास या नोटीमध्यें सरकार कांहीं गैरशिस्त फायदा करून घेण्यास इच्छितें असें नाहीं हें उघड दिसून येईल.

लोकांची खात्री नसल्यामुळें कोणतेही प्रांतांत नोटी चालत नाहींत असें कितियेक लोक समजतात तरी ही समज अगदी बराबर नाहीं. सन १८६१ सालापासून आतपर्यंत म्हणजे साडेआठ वर्षांत सर्व हिंदुस्थानांत सुमारें दहा कोट रुपयांच्या नोटी लोकांनीं घेतल्या आहेत असें सरकारी ग्याझेटावरून समजतें. यापैकीं मुंबई भागांत इतर पेक्षा ज्यास्त नोटी लोकांचे हातीं आहेत. मुंबईत साडेपांच कोट, कलकत्ता तीन कोट, मद्रास ६६ लाख, व मध्य प्रांत देशांत (नागपुर) ५० लाख, व लाहोर व अमदाबाद या ठिकाणींही अजमासें ६६ लाख. सदरीलप्रमाणें आहे याजवर लोकांचा भरवसा नसल्यास दर आठा दिवशीं सरकारी ग्याझेटांत छापिलें आहे तें पाहून खात्री करून घ्यावी तरी वऱ्हाड हा प्रांत मुंबई व नागपुरचे दरम्यान असून जसे तिकडील लोक नोटी घेतात तसे या देशांतील लोक न घेऊं लागतील तर त्यांस काय म्हणावें? जर लोकांच्या उपयोगीं नोटी न पडत्या तर वर लिहिल्याप्रमाणें इतर ठिकाणीं इकडीलपेक्षां ज्यास्त हुशार लोक असून ते दहा कोटपर्यंत नोटी कां घेते? याजवर थोडासा विच्यार करावा

कितियेक लोकांचें म्हणणें आहे कीं घरास आग लागली असतां नोटी असल्यास जळून जाऊन नुकसानी होईल. बरें फक्त वऱ्हाडांतच आग लागते कीं काय? असें नसेलतर दुसरे प्रांतांतील लोक नोटी कशा ठेवितात? याचें कारण हेंच कीं आग लागलेले घरांतून नोटांपेक्षां चांदीचे रुपये ज्यास्त वजनदार असून जितकें कमवजन असेल तितकें घराबाहेर काढण्यास सोपें आहे असें समजून नोटी ठेवितात. उदाहरण.

जर ३००० रुपये आग लागलेले घरांत असले तर येका खेपेंत सर्व बाहेर काढतां येणार नाहींत. दुसरी खेप होईपरयंत आपणच आग लागलेले घरांत फसल्या सारखे आहे. पण घराचे आंत जाऊन तीन नोटी उचलून बाहेर पळत निघण्यास किती उशीर लागेल, असे प्रसंगीं नगदी किंवा नोटी जवळ असल्यानें कशांत ज्यास्त फायदा आहे हें उघड दिसतें. याशिवाय जळून गेलेले नोटीचा पैसाही सरकारांतून मिळू शकतो इत्यादि एकंदर गोष्टीवरून रुपयांपेक्षां नोटीचा उपयोग करणें अधिक चांगलें, व सुखाचें व सोईचें आहे असें सिद्ध होतें.

MR. WALTER KNOX.

MANY of our readers will like to read the following official document regarding Mr. Knox:—

Railway Department, Bombay Castle, 13th May 1869. From the Consulting Engineer for Railways, No. 1424,

dated 8th May 1869.

Submits a letter from Mr. Knox, Agent, Great Indian Peninsula Railway Company, reporting his intended departure to Europe on sick certificate, and that Mr. LeMessurier, Chief Resident Engineer, will act as Agent during his absence.

RESOLUTION.—A despatch should be sent to the Secretary of State expressing the opinion entertained by Government of the value of the services rendered to the Great Indian Peninsula Railway Company by Mr. Knox, during the period he has filled the post of Traffic Manager, and of Agent.

2. Mr. Knox's management of the Traffic Department has led to a most marked improvement; complaints of delay in despatch of goods have altogether ceased, and the traffic has been worked with great regularity, notwithstanding the defective state of the line. The goods traffic has been steadily developed, and the traffic charges have been gradually reduced. These results are solely attributable to Mr. Knox's constant personal inspection of every section of the Railway, and to his thorough knowledge of his duties as Traffic Manager.

3. Since Mr. Knox has been called upon to discharge the more responsible duties of Agent, in addition to those of General Traffic Manager, his task has been most arduous, and the numerous difficulties with which he has had to contend, owing to the original faulty construction of large portion of the Railway, and the generally lax manner of conducting works under contractors which had prevailed for so long a time, could only have been surmounted by the exercise of more than ordinary ability, zeal, and energy. By the exhibition of these qualities, and by the numerous reforms which he has effected, he has done signal service to the Company, and has earned for himself the approbation of Government, and the general good will of the community.

4. His Excellency the Governor in Council regrets exceedingly that Mr. Knox should be compelled by ill health to leave India at the present moment; but he trusts that this absence will be only temporary, and that, after a short interval of repose, Mr. Knox will be able to resume the duties which he has hitherto performed so efficiently, and to continue the gradual course of improvement which he has commenced so successfully, and in which his labours have been productive already of so much benefit to the Company, and to the public.

(Signed) M. R. KENNEDY Colonel,
R. E. Secretary to Government.

---

FROM a private letter we learn that heavy rain accompanied with thunder and lightning fell at Ahmedabad on Sunday last.

---

ALL subordinate Judges whose appointments to particular Courts have appeared in the "Government Gazette," are ordered to join their new offices at the expiration of the present vacation of the Civil Courts, *i. e.* on or before the first of June.

---

THE grain dealers of the city of Poona have recently raised the price of grain of every description and since Monday last they have raised the rate of bajree to *ten seers per rupee.* This no doobt is the advantage taken by them of "free trade," We have been credibly informed that these grain dealers have on stock twenty-five thousand pullas of bajree stored up in the city market, and their object in raising it to such a high price, at this slack season of the year, is to increase the rate of grain as soon as the monsoon sets in. Can no measures be adopted to check this monopoly? It is said that, some thirty years ago, the grain dealers made a combination amongst themselves in Poona to sell bajree at seven seers per rupee, but one, an eminent native banker of the time, came forward and offered to the Collector of Poona to sell bajree at fifteen seers per rupee, whereupon the Collector called upon all the grain dealers to sell at the rate of fifteen seers per rupee, or otherwise to close their shops, which they, having no alternative left, agreed to do, they having at the time a large quantity of bajree on hand. In the present instance some such example would be made with profit.—*Id.*

---

THE Government of India has sanctioned the establishment of a Female Normal School at Benares under the superintendence of Mrs. Graves, the Inspectress of Female Schools. The cost will be Rs. 375 per mensem; the Female Normal Schools at Agra and Allyghur will be retained at their pre sent cost.

---

THE Supreme Government have accorded their sanction to the estimate submitted to them in March last by the Madras Government, amounting to five lacs and forty-one thousand rupees, for completing for rapid wheel traffic 58 miles of the main line of road between Calcutta and Madras, being the portion lying in the Kistna district.

---

THE weather in Calcutta on Sunday was thoroughly wet and there were many indications of a storm. The barometer fell, and the wind rose; and in the course of the afternoon the storm signals on the Trade Association, the Chamber of Commerce, and the Sailor's Home, gave warning of a gale. When the *Indian Daily News* went to press the wind was gusty, and seemed to be rising. But, it is added, the few hours' notice that have been given, may have been found invaluable, should the storm become anything like the cyclones of 1864 and 1867.

---

THE reports from the Central Provinces continue favourable, and some works which were to have been undertaken for the relief of the poor in the Nagpore district have been abandoned, partly in consequence of the outbreak of cholera, but chiefly because such works were no longer necessary. The Sanitary Commissioner had been most energetic in his endeavours to check the ravages of the cholera, and by suggesting the desirability of obtaining a plentiful supply of water for cleaning purposes had partially succeeded in Seonee. In Saugor, however, the supply of water was beginning to run short and the pasturage was withering. Prices generally continue favourable. Small-pox was still prevalent in many districts, especially in Saugor, where three hundred and five cases were reported in four Tehseels, ninety-three of which had been fatal.

---

DEATH OF HIS HIGHNESS CHIMMA SAHIB, BROTHER OF THE LATE RAJAH OF KOLAPOOR.

His Highness Chimma Sahib, the younger brother of the late Rajah of Kolapoor, who was sent to Kurrachee as a State prisoner, on suspicion that he had participated in the lamentable revolt of 1857-58, died this morning, from the bursting of an abscess on the liver. His Highness, who was about 34 years of age, showed symptoms of serious illness about ten days ago, and in consequence of apprehension, Dr. Hopkins, the Civil Surgeon, in company with Col. Marston, the Superintendent of Police, waited on him last night and in order that medical aid might be at hand, Mr. DeSouza, the Apothecary, was left in attendance on His Highness all last night. His Highness, who received a monthly allowance of Rs. 600 from Government, and a free bungalow in one of the gardens, arrived here in 1858. From particulars we have received, we gather that there was a difference of only sixteen hours between the birth of Chimma Sahib and his late brother, the two having been born of different mothers. As the late Rajah of Kolapoor was born of the senior Ranee, he, of course, ascended the *gaddee.* Owing to this and other causes, an enmity arose between the two brothers, and the firm conviction of the public is, that Chimma Sahib in reality intended to dethrone his brother, rather than to revolt against the British Government. His Highness will be buried this evening, and as he left hardly any funds, his funeral expenses will, no doubt, be borne by Government.—*Sindian, May* 15.

---

# Local
# वऱ्हाड.

इलिचपूर जिल्ह्याचे डिस्ट्रिक्ट पोलिस सुपरिंटेंडेंट क्यापटन जेमसीस साहेब यांची नेमणूक बुलढाणें जिल्ह्यांत झाल्याप्रमाणें कामाचा चार्ज मे० रिचार्डसन साहेब पोलीस इन्स्पेक्टर यांस देऊन निघून गेले. साहेब बहादूर यांची कारकीर्द उत्तम प्रकारची होती. व हे हाताखालील लोकांवर फार प्रीति करित असत. सु० प्र०

---

अकोला.

लिहिण्यास दुःख वाटतें कीं मि० गोरसाहेब येथील हायस्कुलावरील असिस्टंट मास्तर उन्हाचे झळईनें पूर्णा नदीचे काठीं कालरोजीं मरण पावले.

अडगावचे एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर रा० रा० श्रीकृष्ण नरहर रनेंत येथें आले आहेत.

क्या० वोडहौस साहेब आफि० डायरेक्टर चिखलदऱ्याहून एथें आले.

## अग्निनारायणाचा कडाका.

आमचे अकोला शहरांत याआठवड्यांत सतत च्यार दिवस अग्निनारायणांनीं भयंकर रूपानें आगमन करून सुमारें सवाशें घरांचा आंतील बहुतेक सामानासुमानासुद्धां होम केला. येणेंकरून सर्व गावांत हलकालोळ होऊन गेला आहे. एकंदरीनें पाहतां आमच्या वऱ्हाड प्रांतावर अग्निनारायणाचें फारच प्रेम दिसतें उन्हाळ्यांत कधीं कोणे आठवड्यांत कांहीं तरी घरांवर कृपा केली नाहीं असें नाहींच. व या विषयीं बहुतवेळां आम्हीं लिहिलेंही आहे. तेव्हां या खेपस नवें कांहीं व्याख्यान दिलें पाहिजे असें नाहीं. झाली गोष्ट मात्र सांगतो.

बुधवारीं सकाळीं नबाव पुऱ्यांत आग लागली व सुमारें १२ घरें जळालीं. गुरुवारीं १० वाजतां ताजना पेठेंत माळीपुऱ्यांत आग लागली व सुमारें ३० घरें जळालीं आणि शुक्रवारीं १२ वाजतां त्याच पेठेंत त्याच ठिकाणीं भयंकर आग लागून राहिलीं साहिलीं सुमारें ७५ घरें जळालीं. या दिवशीं वारा फार सुसाटयाचा असून पाण्याची कुमक झाली नाहीं; व तहशिलदार वगैरें त्या ठिकाणीं जमले होते त्यावरून विझविण्याची मदत व्हावयाची परंतु ती त्याच वेळेस एक भयंकर दंगा झाल्या मुळें झाली नाहीं आणि या टोकापासुन त्या टोकापर्यंतच्या सर्व घरांची राखरांगोळी झाली, नंतर अग्निनारायण स्वस्थानाप्रत गमन करिते झाले. जळाल्या घरांचे मालक पराव्या परदेशाप्रमाणें दीन होत्साते दुःख शोकांत निमग्न होऊन राहिले. अहाहा! काय तो भयंकर प्रसंग! परंतु तशाही प्रसंगीं दांडग्या व निष्काळजी लोकांस भयंकर दंगा करावयास फावलें व असिस्टंट कमिशनर, डिपुटि कमिशनर या समयास तेथें न येते तर निश्चयें कांहीं खूनही झाले असते. याप्रमाणें तीन दिवस झालें व आज सकाळीं ही अक्कलकोटयाकडे आग लागून २ घरें जळालीं.

भयंकर दंगा—सदरीं शुक्रवारीं दोन प्रहरीं आग लागून ७५ घरें जळाल्याचें लिहिलेंआहे त्या वेळीं तहशिलदार कचेरी तेथून अगदीच नजीक होती त्यामुळें रा० गोविंद राज अप्पा तहशिलदार हे आग विझविण्याचे खटपटी करितां तिकडे गेले. व वाटेंत जे

जे लोक भेटले त्यांस त्यांनीं तिकडे वळऊन नेले व भिस्ती आणविण्याची वगैरे तजवीज केली. क्या० मेकंजी साहेब डि० क० व मे० दस्तुर बहिमनजी जामासजी साहेब असि० क० हेही समयास तेथें आले होते. इतक्यांत हैदराबादकंटिंजेंट पलटणीची एक तुकडी येथें बंदोबस्तास आहे ती पैकीं एक बिनदरेशी शिपाई भाग लागले ठिकाणाहून परत जातांनां तहशीलदारानीं पाहिला व त्यास आपले शिपायाकडून सक्तीने मागें बोलाविलें हें पाहून कंटिंजेंटमधील शिपायाचा कैवारी एक दुसरा शिपाई येऊन त्यानें तहशीलदाराशीं व त्यांच्या लोकांशीं तंटा आरंभिला व हात घाईचा प्रसंग आणिला हें पाहून अधिकाऱ्यानीं पोलिसास सांगितलें कीं त्यास पकडून केद करावा त्यावरून पोलिसचे ५ च सात लोकांनीं त्यास मोठ्या प्रयासानें पकडले पण त्यावेळीं पलटणींतले आणखीं पाच च्यार जण येऊन त्यांनीं पोलिसावर जी हाणामारीची वृष्टी केली ती सांगतां येत नाहीं. तथापि तितकी सोसून पोलिसानीं तो धरलेला शिपाई बाजूस नेला इतक्यांत पुन्हां त्या पलटणवाल्या टोळीनें राक्षसघाई करून व काठ्यांनीं बहुत मारहाण करून आपला शिपाई सोडवून नेला व फारच दंगा आरंभिला. सारांश राम रावणाच्या लढायीप्रमाणें अकोल्यास मोठी कत्तल होण्याचा तो समय होता परंतु परमेश्वरानें खैर केली. असें म्हणतात कीं मोठमोठाल्या अधिकाऱ्यांसही थोडाबहुत मार बसला. नंतर पलटणीचा सुभेदार बाहेर गेला होता तो येऊन त्यानें बिगुल करविलें त्याबरोबर दंग्यांत असलेले त्याचे लोक काठ्यावगैरें टाकून देऊन त्यापाशीं जाऊन उभे राहिले. तेव्हां सर्व गडबड मिटली. आतां याचा परिणाम काय होईल तो पुढें व्हिहू. तूर्त पलटणी पैकीं १२ व पोलिसांपैकीं १२ असामी अटकावून ठेविले आहेत.

## Epitome of News.
## वर्तमानसार.

मद्रास येथील उदीमपट्टीचे कलेक्टर यांस पैसा वसूल करण्यास मोठा घोटाळा पडला. येके दिवशीं त्यांनीं सुमारे १०० लोकांवर पट्टीचा पैसा देण्यास हयगय करितात असा च्यार्ज आणून फौजदारींत घातलें. परंतु त्यांतील बहुतेकांनीं अधिकाऱ्यापुढें खटले चालू होण्यापूर्वींच पैसे दिले. तरी सदरहु कलेक्टरानीं आणखी सुमारे १०० लोकांस पकडण्यास समन्सें मागितलीं आहेत. असा गोंधळ आहे. मुंबईस या कराचें काम सुयंत्र चाललें आहे.

पुण्यास खोटा चेक दाखवून सुमारें साडे पांच हजार रुपये उपटणारा मनुष्य पकडला व त्यावर मि० रिचर्डसन साहेब सिटी माजिस्ट्रेट यांनीं खटला करून सेशन कमिट केला आहे.

डा० विही तुरुंगावरील इन्स्पेक्टर जनरल यांचे जाग्यावर कर्नल आशबर्नर यांस नेमिलें असें आतां कळतें.

सिंधु नदीचे पाण्याचा ओघ शहा बदराजवळ सरून दुसरे बाजूस गेला व त्यामुळें तांदळाचे पिकाचें मोठें नुकसान झालें.

मुंबईहून हैदराबादेस सुमारे १०००० रुपयांच्या चांदीच्या लगडी आगगाडींतून जात असतां चोरीस गेल्या. त्यांपैकीं सुमारे निम्यांचा पत्ता रेलवे पोलीस इन्स्पेक्टर अबदुल फिरोज यांनीं लाविला आहे. व चोर टे पकडले आहेत. थोडया दिवसांत तिकडेही तिसऱ्यानें चोरी झालेली आहे.

✓ मद्रास इलाख्यांत वेलूर येथें कांहीं व हावी लोकांनीं कट करून सर्व युरोपियन लोक ठार मारण्याचा बेत केला होता परंतु तो उघडीस आला.

ब्रम्हदेशांत सिंकोना म्हणजे ज्यां पासून कुईनेन निघतें तीं झाडें लाविलीं आहेत व तीं चांगले प्रकारें आलीं आहेत असें कळतें.

मद्रास ईलाख्यांत ठिकठिकाणीं पाण्याचा पुरवठा फार कमी झाला आहे.

मि० नाक्त साहेब जी आय पी रेलवेचे ट्राफिक म्यानेजर रजा घेऊन विलायतेस गेले. त्यांचे कामाची मुंबई सरकारानें फार तारीफ करून ते रजेवर जातात याजबद्दल मोठी दिलगिरी दाखवीली आहे.

हिंदुस्थान सरकारानें क्षेत्र काशी येथें स्त्रियांचें नार्मल स्कूल स्थापण्याचें सांगशन केलें. व त्यावर मीसेस ग्रेवस नावाची युरोपियन स्त्री शिकवावयास नेमिली व दरमहा ३७५ रुपयांचा खर्च मंजुर केला. आग्रा व अलीगढ येथेंही स्त्रियांचीं दोन नार्मल स्कुलें झालीं आहेत.

छोटा नागपुर प्रांतांत दालतानगंज येथें एक ताब्याच्या धातूची खाण लागली आहे. परंतु तिजपासून मोठासा फायदा होणार नाहीं असें म्हणतात.

मद्रासची टंकसाळ बंद करण्या विषयीं हिंदुस्थान सरकारानें शिफारस केली आहे.

महाराणी साहेबांच्या जन्मदिवसाचा कलकत्याचे लोकांनीं मोठा थाटमाटाचा समारंभ करण्याची प्रसिद्ध रितीनें तजवीज चालविली आहे. व मोठा दरबारीहि भरविणार आहेत.

नागपुराकडे महामारीचा उपद्रव सुरु आहे असें कळतें.

वायव्य प्रांताचे सरकारानें सुमारें तीन महिन्यांत विहिरी बांधण्याकरितांव तलाव दुरुस्त करण्याकरितां दोन लक्ष रुपये खर्च केले.

थोतांड—परसगडा नजीक एलमाचा डोंगर म्हणून एक प्रसिद्ध देवस्थान असून तेथें हजारों लोक दर्शना करितां जात असतात वत्यापासून तेथील पुजारी वगैरे लोकांस मोठी किफायत होति ही गोष्ट कित्येक धुतांनीं लक्षांत आणून पैसा गोळा करण्याचे बेताने त्या देविस, तेथून तीन चार कोशावर आपल्या हद्दींतलि एका डोंगरावर आणून सोडीली ति अशा रितीनें कीं, देविनें आपल्या स्वप्नीं येऊन मी माझ्या स्थानास कंटाळून तुमच्या शेजारचा अमक डोंगरावर येऊन राहिले आहे. तर माझी पुजा अर्चा करा असा दृष्टांत दिल्याचें थोतांड रचून जिकडे तिकडे पुकारा केला त्याबरोबर देव भोळ्या हजारों लोकांची यात्रा तेथें जमण्याची सुरुवात होऊन पुजारी बावाचें उखळ पांढरें होऊं लागलें परंतु ही खबर आमचा माजीस्त्रेट साहेबांस समजल्या वरून त्यांणीं लोकांचा असा जमाव न जमु देण्याबद्दल हुकूम केला आहे असें समजतें. बे० स०

नागपूर—गेल्या वर्षीं रा० रा० लक्ष्मणजी दादा आकुलवार राजे साहेबांचे कारभारी यांनीं पाणपोय घालून या ठिकाणीं जो कोणी गरीब गुरीब येईल त्यास सतू, साखर व गार केलेलें उत्कृष्ठ पाणी द्यावें असा एक धर्मकृत्य कारखाना ठेवला होता तसा यंदांहीं त्यांनीं तोच क्रम चालविला आहे हें पाहून म्हणा अगर या वर्षीं अन्न व पाणी या दोहोंच्या कमताईमुळें म्हणा शहरांत दहाबारा पाणपोईचे अखाडे नजरेस पडतात इतके जरी अड्डे आहेत तरी आमच्या दादा साहेबांच्या अड्यात [illegible] गर्दी असते तशी इतर ठिकाणीं नाहीं. या ठिकाणी लोक विशेष जमण्याचें कारण हेंच कीं, तेथें मुख्य पाणी इतकें [illegible] करून ठेवलेलें असतें कीं, तें [illegible] उत्तम रीतीनें समाधान वाटतें शिवाय साखर व सतु हीं मिळतात म्हणून लोकांची गर्दी व्हावी. यांचे बंधु धर्माजी आकुलवार यांणीं गरीब लोकांस जेवण घालण्याचें सत्र सुरु केलें आहे. या सत्रांत १००।१५० पर्यंत पात्र होते. शिवाय नीच जातीच्या लोकांस भाकरी वांटतात तेथें ही २००।३०० पर्यंत मनुष्यें जमतात. यंदां हें धर्माजीचे अन्नसत्र आहे म्हणूनच पुष्कळ गरीब लोकांचा प्राण रक्षण होत आहे. नाहीं तर अन्न अन्न करून कित्येक अनाथांस प्राण सोडावा लागता यांत संशय नाहीं अशी स्थिति यंदां येऊन पोंचली होती. ना० अ०

कोलापुरचे मयत राजे साहेब यांचे बंधू श्री० चिमासाहेब कराचीस प्रतिबंधांत होते ते छातींत रोग होऊन गेल्या मंगळवारीं प्रातःकाळीं कैलास वासी झाले. इ० प्र०


## Advertisements.
## जाहिरखबरा.

### नोटिस.

रा० बाकाजी वलद दत्ताजी पाटील मौजे हिंगणी बुद्रुक परगणे अडगांव तालुके अकोट यास खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुमचे व माझे शराकतित मौजे हिंगणी येथील शेत असून त्या शेताचे निमें हिस्साबद्दल नोंदणी रजिस्टर झाले आहे. आणि तुम्हासी आम्हासी वारंवार तंटा बखेडा होतो. व तुमचेवर याबद्दल निमें हिश्शाचा हल्लीं हुकूमनामा झाला आहे यास्तव लिहिण्यांत येतें कीं, ही नोटीस पोचले तारखेपासून आठदिवसांचे आंत सदर्हू सेताचा आम्रचा निम्मे हिस्सा वांटून द्यावा. जर या प्रमाणें न झाल्यास शिरस्त्याप्रमाणें दिवाणीत फिर्याद करून या नोटिशीचे खर्चासुद्धां तुम्हांपासून निमें हिस्सा वाटून घेतला जाईल तर याप्रमाणें हिस्सा वाटून द्यावा. कळावें. तारीख २१ माहे मे सन १८६९ इसवी मुक्काम अकोला.

(सही) दाजी जैराम कुळकर्णी.

नोटिस—सखाराम वलद मानाजी पाटील मौजे हिंगण तामसवाडी तालूके आकोले यांस—भवानी वलद जानजी पाटील मौजे निंभोरे तालुके अकोलें, यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमची नोटिस तारीख १४ माहे मे सन १८६९ इसवीची वऱ्हाडसमाचार अंक १७ मध्यें आमचे नांवची आली ती आम्हांस पावली. तिचें उत्तर देण्यांत येते कीं, तुम्ही नोटिशींत आमचे देण्याबदल तपशील लिहून आमची बाकी ४९९ राहिली ती देण्यांत हजर म्हणून लिहिले त्यास जी बाकी आमची काढली ती तुम्ही गलत काढली आहे; आमचे रुपये तुम्हाकडे जास्त निघत आहेत, आणि तुम्ही नोटिस देण्या पूर्वीं च्यार पंचाचे विद्यमानें अ[illegible] बाकी १९०९ काढली असून नोटिशींत तुम्ही वेगळा प्रकार लिहिला हा खोटेपणा तुमचा आहे. तुम्ही ऐन [illegible] वगैरे बाकीत रुपये पदरांत घालावे व आमचे निघालेले रुपये सर्व एकदम देऊन आपला फैसल करावा हें उत्तम आहे व आम्ही ही तुम्हांकडून दामदाम आपले रुपये घेऊन फैसला करून घेण्यास इच्छित आहोत; जमिनी विषयीं तुम्ही मजकूर लिहिला त्यास जमीन सरकारी आहे. तिचा राजिनामा तुम्ही सरकारांत दिला त्यापेक्षां तुमचा हक्क राहिला नाहीं आम्ही कबुलायत सरकारांत दिल्यावरून सरकारांनीं आम्हांस नवीन दिली ती आम्ही सात गुदस्त पासून वहिवाट आहोंत तुम्ही आपला हक्क सोडलीं असून आतां हरकत कराल तर ते विषयीं सरकारांतून फौजदारी तुम्हावर होईल. आणि तुमचा कसें प्रकारचा हक्क आहे त्याविषयीं सरकारांत तुम्ही आम्हावर आना केल्यास आमचा जबाब कोर्टांत जो देणें तो देऊं कळावें ही नोटिस लिहून दिली सही.

(सही) भवानी वलद जानजी पाटील यांचे हातचे निशाणी


## महामारी विषयीं खबरदारी कायकाय ठेविली पाहिजे याविषयीं यादी.

महामारी विशेषें करून ज्या ऋतूमध्यें उपस्थित होते तो ऋतु जवळजवळ येईल त्याप्रमाणें, गत वर्षीं या मध्य प्रदेशांतील कित्येक जिल्ह्यांमध्यें ज्या महामारीनें इतका मोठा विध्वंस उडविला, तिचें आगमन या देशांत जागोजागीं पुनः होण्याचा संभव आहे. तशांत अन्न आणि पाणी यांचा तोटा असणें या अरिष्टाच्या योगाने साथीच्या रोगांचा अमल लोक समुदायांवर विशेषेंकरून न होतो; तें अरिष्ट सालमजकुरीं प्राप्त हो होईल अशी धास्ती आहे. याजकरितां जीं जीं कारणें महामारीचा फैलाव होण्यास व तिचा जोर वाढविण्यास अनुकूळ तीं नष्ट करण्याविषयीं मुद्दाम ज्यास्त उपाय करणें अवश्य आहे.

पूर्वींच्या साथींचें अवलोकन केल्यावरून असें मत ठरलें आहे कीं, दोन अरिष्टांच्या विषयीं विशेषेंकरून खबरदारी ठेविली पाहिजे व त्या मतास या प्रांतांतील गेल्या साथींच्या अनुभवानें बळकटी आली आहे. तीं दोन अरिष्टें येणेंप्रमाणें:—

ज्या नदी किंवा नाल्याच्या किनाऱ्यावर शौचास जाण्याच्या जागा असतात; किंवा ज्या तळ्यामध्यें स्नानें करितात, अगर चिरगुटें धुतात, अगर ज्या उघड्या विहिरीमधील पाणी घाणेरड्या भांड्यांना काढिल्या

मुळें किंवा वरील धुण्याचें पाणी पुनः आंत गेल्या मुळें नासण्या सारखें आहे, अशा ठिकाणचें पाणी म्हणजे ज्या मध्यें मनुष्याच शरीरांतला मळ किंवा इतर कुजत असणारे पदार्थ यत्किंचित ही मिसळल्या मुळें भ्रष्ट झालें असेल तें पाणी पिणें हें पाहिलें अरिष्ट होय. व अशाच प्रकारचे पाण्यापासून उत्पन्न होणाऱ्या वाफांनीं भ्रष्ट झालेला हवेचा श्वासोश्वास येणें हें दुसरें अरिष्ट होय या देशांतील बहुतकरून सर्व कसबे व खेडीं यांतील हवा व पाणी या प्रकारें भ्रष्ट होण्यास अत्यंत पात्र आहे ही गोष्ट सांगावयास पाहिजे असें नाहीं. ही अडचण नाहींशी करण्या करितां या प्रांतांत मोठे मोठे यत्न करण्यांत आले आहेत व गेल्या बेमारीच्या वेळेस, खेडे गावच्या संबंधानें पाहिलें असतां, मोठ मोठया कसब्यांचा बचाव चांगल्याच प्रतीचा झाला, त्याचें ही कारण खरोखर पाहिलें असतां असें आहे कीं, त्या कसब्या मध्यें सफाईचे कायदे ज्यारी करून स्वच्छता ठेवण्या विषयीं सक्ती करण्यांत आली.

३ आरोग्य संरक्षणाचे उपाय करितात त्यांत मुख्य असा हेतु आहे कीं, ज्या ओंगळपणाच्या स्थितीपासून महामारीच्या फैलावास मदत होते ती स्थिती उत्पन्न न होई असें साधल्यास करावें. हा हेतु उत्तम रीतीनें कसा साध्य होईल येविषयीं खालीं सूचना करण्यांत येत आहेत त्या येणेंप्रमाणें.

४ वसाहती मधली जागा व वसाहतीच्या आसपासची जागा मैल्यानें घाणेरडी न करूं देणें व कचरा वगैरे कोठें ही न जमूं देणें येविषयीं प्रथमतः खबरदारी ठेविली पाहिजे.

५ रस्त्यामध्यें व घरामध्यें मोकळी हवा खेळत असली तर ती सातीच्या रोगास हटविते. व त्याचा जोर कमी करिते. आणि ज्या ठिकाणी घरें फार दाट असून मोकळी हवा खेळण्यास प्रतिबंध होतो तेथें माहामारी फार नासाडी करिते असें समजलें आहे. या प्रांतांतले बहुतकरून सर्व कसबे व खेडीं यांची दुर्दैवेंकरून अशी स्थिती आहे ही एक मोठी अरिष्टाची गोष्ट होय व गुरें गांवच्या आंत बांधण्यांचा जो साधारण प्रकार आहे तेणेंकरून तर त्या अरिष्ठाची दसपट वृद्धी होते. बहुधा गांवांतील लोकसंख्ये पेक्षां गुरांची संख्या जास्त असते व तीं गुरें रात्रीं फक्त गावाच्या आंत बांधतात इतकेंच आहे बहुशा घरांतच बांधलीं जातात आणि त्याच घरांत मुलें माणसें राहात असतात ह्या वहिवाटीनें हवा अगदीं खराब होते आणि त्या हवेंत रहाणारे लोक सातींच्या सपाटयांत येण्यास विशेषेंकरून पात्र होतात. वसाहतीचे बाहेरचे बाजूस सर्वांनीं एक समाईक जागा करून तेथें सर्वांचीं गुरें रहाण्याची तजवीज करावयास गुरांचे मालकांस कठीण पडूं नये.

६ खराब पाणी प्याल्या पासून होणारे अरिष्टाविषयीं अत्यंत सावधगिरी ठेविली पाहिजे जेथें विहिरी असतील तेथें तळयाचें व नद्यांचें पाणी पिण्यापेक्षां विहिरीचें पाणी प्यावें. परंतु या देशांतील विहिरी उघडया असतात, सबब त्यांचें पाणी भ्रष्ट होण्या सारखें नाहीं. असें मुळीं म्हणावयास नको कारणकीं, मळवरून आंत जातो. ज्या गावांत एकच विहिर असून तिच्या काठावर स्नान करणाऱ्या मनुष्यांच्या आंगाचें पाणी आंत परत वाहून जात असेल त्याग:वाचें त्या बयाचें सगळें पाणी अगदींच बिघडून जाण्याचा संभव आहे. ज्या घडया मध्यें अगर इतर भांडयांमध्यें पूर्वि खराब पाणी होतें त्या घडयानें किंवा भांडयानें विहिरीचें पाणीं काढलें तरीही तसाच परिणाम घडेल अशाच एखाद्या रीतीनें विहिरीचें पाणी नासल्यापासून गांवामध्यें पराकाष्ठेची महामारी मातल्याची उदाहरणे न मिळण्या सारखीं वाहींत.

७ ज्या विहिरीचें पाणी पितात तो दस उन्हाळया मध्यें साधल्यास साफ केली जावी ज्या विहिरीस पाणी थोडें तिला तर साफ करण्याची अवश्यकता विशेष आहे. झरे किंवा उथळ विहिरी यांचें यांचेंच पाणी नेहमी प्यावयाचे असा प्रकार असल्यास त्या पासून फार धोका असतो कारण कीं तें पाणी बिघडण्याचा संभव फार असून उष्णकाळा मध्यें बहुधा पाण्याचा साता कमी होत असतो झऱ्याशिवाय दुसरें पाणी नाहीं असे होतें तेव्हा त्यापासून धोका कमि होण्याचा यत्न करावा तो झिरा साथिल तितका खोल कनरून त्याचे सभोंवताची जागा नांसूं देऊं ये. (पुढें चालूं) स० प्र०

## जाहिरखबर.

नोटिस—ओंकार पुरणमल दुकान अकोलें यास गंगाधर जोरावर साहू दुकान अकोलें यांजकडून देण्यांत येतें कीं तुम्ही तारीख १ मे १८६९ इसवीची अकोलें येथिल वऱ्हाडसमाचारांत नोटिस दिली त्याचें उत्तर येणेंप्रमाणें.

१. ओंकार पुरणमल या दुकानचे रुइचीं ओझीं आम्ही घेतल्याचें स्मरत नाहीं व तुम्ही घेतल्याचें म्हणतां तेव्हां तुमच्याजवळ आमची तगपट्टी असल्यास दाखवावी त्याखेरीज कबूल करितां तेत नाहीं.

२. नोटिसीचे शेवट भागास पांच खंडी गव्हांबद्दल मजकूर लिहिला परंतु ज्या मजकुराबाबद तुम्ही नोटिस देता तो मजकूर तुम्हास पुरतेपणीं माहित नाहीं व त्या गव्हांचा उलगडा पेशर्जी झाला आहे त्याचे अदाईचा प्रकार हरचंद मारवाडी यास सर्व माहित आहे आहे त्याजला विचारून माहिती घ्यावी तुम्ही लिहिलेले नुकसान आमचे कडून होत नाहीं किंवा झाली नाहीं सबब त्या जबाबास आम्ही पात्र नाहीं.

३. तुम्ही दिलेली नोटिस कोणतेही प्रकारें आम्हास मुळींच देण्याचें कारण नव्हतें विनाकारण दिली भबब या नोटिशीचा खर्च लागलेला तुम्ही द्यावा न दिल्यास दिवाणींत दावाकरून घेतला जाईल. तारीख ११ माहे मे १८६९ इसवी मुक्काम अकोलें.

(सही) गंगाधर जोरावरमल द० खुद.

## पाहिजेत.

**मराठींत तयार कंपाझिटर.**

आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्याकरितां मराठींत टाइप जुळणारे जुने महितगार दोन चपल कंपाझिटर पाहिजेत. पगारांचे हुशारीप्रमाणें १५ पासून २० पर्यंत मिळेल. ज्याची येण्याची इच्छा असेल त्यांनीं लवकर अकोल्यास येऊन आम्हास भेटावें किंवा अर्ज पाठवावे.

**वऱ्हाडसमाचाराचे मालक.**

नोटिस—रामाजी वल्लद निबाजी दारकार राहाणार मौजे मुंडगांव तालुके अकोट यांस खालीं सहि करणार याजकडुन नोटिस लिहून देण्यांत येते कीं तुमची कन्या बजी नावाची इसी व मजसीं कायदेसिर विवाह जाहला असून लग्न झाल्यानंतर दोन च्यार वेळा तुम्ही बाजी इजला आमचे येथें पाठविलें व तिला मी चांगले वर्तणुकेंने वागविलें आहे.

वयांत आल्या नंतरहि सहा महिने माझे घरीं होती आलीकडेस तिजला दोन चार वेळा मी आणण्यास तुमचे येथें आलों असून तुम्ही तिजला विनाकारण माझे येथें धाडित नाहींत व विवाहा पासून होणारे फायद्याचें नुकसानी होण्यास तुम्ही कंबर बांधली आहे व तुमची इच्छा असिआहे कीं मी जिवंत असतां बजी इचे दुसरें लग्न करून द्यावें परंतु असें होणें नाहीं कारण बजी इजला वागविण्यास मी सिद्ध असून दुसरा विवाह करण्यास मी परवानगी दिल्ही नाहीं असें असतां आपले ज्यातीत स्त्रीचें दुसरें लग्न होउ सकत नाहीं.

मांगणीसीं बायको प्रमाणे वर्तणुक केल्या मुळें तुम्ही ज्यांतींत येउ सकत नाहीं असें म्हणणें तुमचें आगदी निर उपयोगी आहे. माझे विरुद्ध असणारे लोकांनीं मजवर सदरील दोषाचा आरोप आणीला होता तथापि सर्व गावचे पंच व आकोटचे जोसि यांजला देवरी येथें जमा करून शास्त्रोक्त विधीनें सर्व ज्योती बांधवानीं मजला ज्यातींत घेऊन त्याच प्रसंगांत सर्व लोकांनीं पंक्तीत पंक्तीपावन केले आहे व जातींत येण्यास मजला सात आठशें रुपये खर्च जाला आहे असें होण्यास चार वर्षें जहालीं असोन सर्व लोकांशीं माझा पंक्ती व्यवहार सुरू आहे सदरील दोषाचा तर मजवर आळ होता परंतु कुणबी जातींत कांहीं कहीं मनुष्यानीं प्रत्यक्ष सदरील कृत्य केले असून त्यांची शुद्धता जहाली आहे व त्यांचे संततिशीं देखील लग्नव्यवहार सुरू असल्या बद्दल पुष्कळ दाखला मिळतो.

आमची शुद्धता करण्या करितां तेरा चवदा गावचे पंन्नास कुणबी पंच व अकोटचे पंधरा ब्राम्हण सिवाय इतर कुणबी एकत्र मिळाले व आमची शुद्धता केली आहे त्या प्रसंगात तुमचा बंधु जानजी वल्लद नीबाजी हे असून त्याणी ही पंक्ती पावन केले आहे. जर तुम्ही आमचे पाशीं मुकाबल्या करितां याल तर प्रत्येक इसमासीं शुद्धता झाल्या बद्दल रुजुवात करून देऊ असें असतां माझे कुटुंबास दुसरें लग्न दुसरे इसमासीं करून दिल्यास कायद्या प्रमाणे तुमचेवर फिर्याद केली जाईल.

याजकरितां तुम्हीं या फदत न पडता सदरी लबजी इजला माझे घरीं पावती करावी तिचें पोषण करण्यास मी सिद्ध आहें.

राजीनाम्या वाचुन जिवंत नवऱ्या वर पाट कुणब्यांत देत नाहीं हा नियम पूर्ण लक्षांत ठेवावा कळावें तारिख १७ माहे मे सन १८६९ इसवी.

(सही) ढवु वल्लद रामाजी काकड राहाणार मौजे देवरी याची निशाणी

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचे बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्धआणा प्रमाणें व्याज द्यावें लागेल. ता० १० माहे आक्टोबर सन १८६८

**वऱ्हाडसमाचाराचे मालक.**

## वर्गणीदारांस विनंती.

गेल्या वर्षाचे आकटोबर महिन्यांत आम्ही आकोल्यास वऱ्हाडसमाचार पत्र सुरूकेलें. त्यास वर्ष होऊन गेलें तर आगाऊ वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं.

**वऱ्हाडसमाचाराचे मालक.**

**आक्ट.**
सन १८६८चा ९वा
पेशे व धंदे यांवरील कराविषयीं
किंमत च्यार आणे.

## नादारी प्रकरणीं नियम.

हें पुस्तक आमचे छापखान्यांत नुकतेंच छांपून तयार झालें आहे. वऱ्हाडांतील न्यायाच्या कोर्टांत हे नियम चालतात. किंमत ॥ सहा आणे व डाक हाशिल एक आणा पडेल. व. स. म्यानेजर

### TO OUR SUBSCRIBERS.

We beg to remind our subscribers that their Subscriptions, for the present year, should be remitted as early as possible, otherwise, we would, however reluctantly, be under the necessity of ceasing to transmit the paper to their addresses. We believe that this reminder will not fail to arouse the sympathies of our Constituents in the country and bring about speedy remittances from defaulting Subscribers.

*Proprietors of Berar Samachar*

| किमतीचे ठराव. | रु. | अ |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास… … | ६ | ० |
| साल अखेर … … … | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ … … | ३ | ८ |
| सहामाही अखेर … … | ४ | ० |
| फुटकळ एक अंकास … … … | ० | ६ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५२ आठवडयांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालअखेर ३ रु० ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी.

**नोटिसा वगैरे छापण्याचे दर.**

१० ओळी पर्यंत… … … १ रुपया
१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०।०६
एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छापून प्र० केलें.

# वऱ्हाडसमाचार.

**THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.**

VOL. IV    AKOLA:—SATURDAY EVENING, MAY 29, 1869    NO. 21

पुस्तक ४    अकोला, शनिवार सायंकाळ तारीख २९ माहे मे सन १८६९ इ०    अंक २१


## जाहिरखबर.

घड्याळ हरवल्याबद्दल.

आमचें वाच म्हणजे खिशांतील धाकटें घड्याळ राहते बंगल्यांतून ता० २२ शनिवार रोजीं चोरीस गेलें आहे, तें जिनीवा असून त्याचा परीघ सुमारें तीन इंच आहे. व तें रेलवे फयाशन प्रमाणें ओपन फेस आहे म्हणजे त्याचे वरचे बाजूस झाकण फक्त भिंगाचें आहे. व त्याचा नंबर ९९७९६ आहे. जो कोणी हें घड्यांळ सापडून देईल किंवा निश्चयें सापडावें असा पत्ता लावून देईल त्यास ५ पांच रुपये इनाम मिळेल. तारीख २४ मे १८६९ इ०

खंडेराव बाळाजी फडके.
व० स० मालक.

## कोलापुरकर चिमासाहेबांचा मृत्यू.

राजकुळांत जन्मास येणें हे बहुतेक सुखाचें साधन म्हटलें पाहिजे कारण द्रव्याचे योगानें जीं सुखें प्राप्त व्हावयाचीं तीं राजकुळांतील पुरुषास द्रव्य विपुल असल्या कारणानें मिळण्यास सुसाध्य आहेत. त्यावरून बहुतेक सर्वत्र असें मानिलें आहे कीं चांगलें दैव असल्यावांचून राजकुळांत प्राणी जन्मास येत नाहीं.

आतां राजकुळांत मनुष्य जन्मास आला व मोठा सुखी ही असला तरी त्यास दुर्दैवानें गांठलें तर विपत्ती व अडचणी येणार नाहींत असें सहसा नाहीं. दुर्दैवाचा फेरा मोठा कठीण आहे; तो अल्पकाळांत सर्व सुखाचें व स्वतंत्रतेचें मातेरें करितो.

साताऱ्याच्या गादीचें मालक शाहुमहाराज वगैरे किल्यावर पेशव्यांच्या अटकेंत असत; पुढें बाजिराव पेशवे इंग्रजसरकारचे प्रतिबंधांत होते; तिकडेच त्यांचा मोक्ष झाला. साताऱ्याचे बुवासाहेब महाराज काशीस प्रतिबंधांत असूनच कैलासवासी झाले. व त्यांच्या राणीसाहेब हल्लीं नगरास प्रतिबंधांत आहेत तसेंच पुढें व्यंकोजी राजे नगरास प्रतिबंधांत राहून मरण पावले. कोलापुरचे चिमासाहेब कराचीस प्रतिबंधांत मरण पावले याविषयीं हल्लीं लिहित आहों- व साताऱ्याचे दुसरे राजपुत्र (बुवासाहेबांचे दत्तक) शाहुराजे अजून कराचीस प्रतिबंधांत आहेत. इत्यादि या राजकुळांतील पुरुषांच्या दुर्भाग्याच्या गोष्टी आठवून आम्हास आमचे देशाचे संबंधानें फार वाईट वाटतें. एकेक वीर पुरुष राजा त्रिभुवनात भारी होता अशा कथा आम्ही आपल्या स्वदेशीय राजांविषयीं हमेशा वाचितों व ऐकतों; आणि त्याच आमच्या देशांतील सदरीं लिहिलेले इतके राजपुरुष कांहींच उदयास न येतां चोरापोरासारखे कैदेंत राहून मरावें काय? व औषधापुरता आणि उत्तरक्रियेपुरताही पैसा त्यांजवळ असूंनये काय? अरेरे! काय दुर्गती ही! एथें कल्पनेची तोड चालत नाहीं; तेव्हां भगवत्सत्ता प्रमाण, असेंच म्हणून स्वस्थ राहिलें पाहिजे.

ज्याचें जसें कर्म तसें त्यास फळ मिळतें हेंच प्रमाण म्हणावें तर सदरील पैकीं कित्येक दुष्ट बेतांत नव्हते, व कित्येकांवर दुस्मान लोकांनीं केवळ आरोप केला असें असतां न्यायी राजानीं त्यांविषयीं कांहीं विशेष न पहातां सकट घोडे बारा टक्के याप्रमाणें अपराधी हा एकच न्याय ठरविला; तेव्हां यास कर्माचें फळही म्हणतां येत नाहीं यास परमेश्वराची इच्छा किंवा मनुष्याचें दुर्दैव म्हटल्यावांचून हें कोडें उलगडत नाहीं.

अबला म्हणजे निर्बल व भितऱ्या बायका त्यांनीं काय प्रबल इंग्लिश सरकाराविरुद्ध उठावयाचें आहे? पण दैव योगानें तशांचाही सरकारास संशय आला आहे; व आज दहाबारा वर्षें होत आलीं त्यांनीं साताऱ्याच्या राणीस प्रतिबंधांत ठेविलें आहे. त्या मावलीस २५०० रुपयांची नेमणूक होती ती सर्व कमी करून नुसत्या डाळपिठावर कांहीं दिवस ठेविलें होतें. पुढें १०० रुपयांची नेमणूक केली व आलीकडे ती थोडी वाढविली आहे; तरी तिला नगरास व तिच्या मुलास कराचीस ठेविलें आहे. ज्या बंडाच्या वेळीं यांजवर संशय होता तें संपून एक तप होत आलें तेव्हां या बिचाऱ्या लोकांस अजून तरी सरकार मुक्त करिल तर फार चांगलें होईल. अस्तु.

आतां चिमासाहेबांविषयीं गेल्या आठवड्यांत सिंदियन पत्राधारें इंग्लिश मजकूर आम्ही लिहिला आहे त्यांतील भावार्थ मराठी वाचकां करितां एथें लिहितों.

चिमासाहेब हे कोलापुरच्या कैलासवासी राजे साहेबांचे बंधू होत. यांजवर सन १८५७–५८ सालांतील बंडाच्या संबंधाचा कांहीं संशय असल्या वरून यांस सन १८५८त कराची एथें राजकीय प्रतिबंधांत ठेविलें होतें तेथें या महिन्याच्या १६ वे तारखेस काळजांतला रोग होऊन यांस देवाज्ञा झाली. हे दहा दिवस या रोगानें फार आजारी होते. यांचे वय ३४ वर्षांचें होतें. यांस ६०० रुपयांची सरकारांतून दरमहा नेमणूक होती. त्यांचे जवळ कांहीं पैसा नव्हता म्हणून सरकार त्यांच्या उत्तर क्रियेचा खर्च करणार होतें.

(COMMUNICATED).

## शरीरसंपत्ति.

शरीर संपत्ति ही मनुष्यास ईश्वराच्या कृपेच्या देण्यापैकींच एक देणगी आहे असें म्हटल्यास चिंता नाहीं. जर मनुष्याजवळ पैसा नाहीं; आणि तो जर शरीरानें धट्टा कट्टा आहे तर तो पाहिजे तितके श्रम करून आपला काळ मोठ्या आनंदानें घालवील; परंतु ज्या मनुष्याजवळ पुष्कळ द्रव्य हिरे, रत्नें, वाडे, घोडे, गाड्या, पालख्या इत्यादि सर्व उपभोगाच्या वस्तू आहेत पण या सर्वांचा उपभोग घेणारी जी शरीर संपत्ति ती नाहीं, तर या सर्वांचा त्यास काय बरें उपयोग? आपल्या देशाकडे नजर टाकली असतां अनेक पुष्कळ कागदी ज्ञान सांपडतील आणि त्यांत विद्वान मंडळीमध्यें, की जिच्या पासून आपल्या देशाचें कल्याण व्हावयाचें अशामध्यें तर फारच शक्तिहीन सांपडतील.

ह्या देशाच्या इतिहासाकडे पाहिलें तर ह्या देशांत कांहीं काळापूर्वीं लोक फारच शक्तिमान होते असें दिसून येतें; एका पुस्तकांत रजपूत स्थानांतील एका मुलीची गोष्ट अशी लिहिली आहे कीं, ती मुलगी एका शेताची राखण करित असतां एका राजाच्या शिकारींतून एक रानडुकर सुटून त्या शेतांत गेला. तो तिणें शेतांतील एका जोंधळ्याच्या ताटानें ठार मारून राजास आणून दिला. अशी आणखी कित्येक उदाहरणें सापडतील.

आतांच्या लोकांमध्यें अशी शक्ति सांपडणें कठीणच परंतु याच्या दाहव्या वाट्यानें तरी आहे काय नाहीं. शरीर संपत्तीची अशी राळ होण्यास व तिला ऱ्हास लागण्यास लहानपणीं लग्न करणें, अल्पवयीं वेश्यांच्या दारोदार फिरणें, व मुखगतें करून शरीर सदृढ होण्यास शारीर श्रम त्याचा गंध ही कोणास नसणें इत्यादि अनेक कारणें आहेत.

आतां आपल्या लोकांची अशी झालेली स्थिति एकदम पालटेल असा तर अर्थ नाहींच. परंतु हळू हळू त्यांनीं व्यायामाकडे वळावें हें चांगलें. व सरकारानें ही त्यास मदत करावी. हें उचित होय. ज्याप्रमाणें मुलगा पांचवर्षांचा झाला म्हणजे त्यास विद्या शिकविण्याची सुरुवात करावयाची त्याच प्रमाणें कांहीं त्याचा वेळ शरीर सुधारण्याकडे जाईल अशी तजवीज त्याच्या पालकांनीं अवश्य करावी. केवळ मुलगा केव्हां बी० ए०, एम० ए० होईल आणि पैसा मिळवूं लागेल एवढ्यावरच लक्ष देऊं नये. अशा कृत्यास सरकारानें ही अवश्य मदत करावी म्हणजे प्रत्येक शाळेलाच जोडून एक लहानशी जागा तालमी करितां ठेवावी. आणि ज्या प्रमाणें मुलांची वार्षिक परिक्षा होऊन त्यास त्यांच्या विद्येच्या मानानें उत्तेजनादाखल बक्षिसें मिळतात; तशीच तालमीचा अभ्यास पाहून त्यास उत्तेजनें मिळावीं म्हणजे मुलांस ईर्षा उत्पन्न होऊन आमच्या ह्या देशांतील कागदी ज्ञानांची संख्या निश्चयें करून कमी होऊन त्या पासून लोकांस व देशाचे मोठे फायदे होतील यांत संशय नाहीं. आतां कोठें कोठें तालमी शाळेला जोडून आहेत परंतु त्या फारथोड्या ठिकाणी आहेत व त्या तशा [illegible] असल्या तशा नाहींत. जर ह्या सर्व शाळांस होतील तर फार चांगलें होईल.

देशप्रीति म्हणजे आपल्याच जातीच्या [illegible] मनुष्यास असतें असें कांहीं ठरीव आहे असें नाहीं; ती सर्वत्र लोकांमध्यें मोठ्या हुद्याच्या व मोठ्या कुलांत [illegible] लोकांपेक्षां ही अधिक असते. हे गेल्या आठवड्यांत मुंबईत कंपाझिटर लोकांची एक सभा प्रो० दादाभाई यांनीं आरंभिलेल्या कामास मदत करण्याविषयीं भरली होती. याविषयीं [illegible] जें लिहिलें आहे त्यावरून स्पष्ट दिसून येतें तो मजकूर आम्ही आपले वाचकां करितां येथें घेतों.

मुंबईच्या छापखान्यांतील सुमारें शंभर खिळे जुळणाऱ्यांची एक सभा गेल्या आठवड्यांत मुंबईस भरली होती. त्यांत इंदुप्रकाशापैकीं रा० [illegible] हे अध्यक्ष स्थानीं [illegible] रा० [illegible] भास्कर [illegible] (इंदुप्रकाशापैकींच) यास थोडक्या [illegible] कडून एक इनाम मिळालें होतें त्यांनीं प्रो० दादाभाई यांणीं आरंभिलेलें काम किती महत्वाचें आहे हें सर्वांस चांगल्या रीतीनें कळविलें. नंतर दुसऱ्या कित्येकांनीं त्यांस अनुमोदन दिल्यावरून वर्गणीची याद झाली. सुमारें १०० रुपये जमले. आणखी जमविण्याची व त्या दिवशीं चाकरीच्या संबंधानें ज्यांचें या वेळीं येणें झालें नाहीं त्यांची दुसरी एक सभा होऊन आणखी रुपये जमविण्याची खटपट सुरू आहे. या खिळे जुळणाऱ्या कंपाझिटर लोकांनीं व त्यांत मुख्यत्वें करून रा० [illegible] भास्कर यांणीं हें फार उत्तम काम केलें असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. छापखान्यांतून चाकरी करणाऱ्या लोकांस या गोष्टीचें इतकें महत्व कळावें ने समजावें असें कित्येक म्हणतात, पण खरी खरी तसें नव्हे. हा धंदा करणारा जर थोडा बहुत शिकलेला असून थोडा विचारी व शोधक असेल तर त्यांच्या मनावर असल्या गोष्टीचें महत्व जितकें दृढतर होण्याचा संभव आहे तितका एकाद्या वर्तमान पत्र चालविणाऱ्याच्या मनावर ही होण्याचा संभव कमी. कारण वर्तमान पत्र चालविणारा वर्तमान पत्रांतलि सर्व मजकूर एकटाच लिहित असतो असें फारच कचित असतें आणि कंपाझिटरचें तसें नसून वर्तमान पत्रांतील सर्व मजकूर त्यांच्या हातांत आल्या शिवाय व त्यांणें वाचल्या शिवाय छापले जाणारच नाहींत. तेव्हां वर्तमान पत्रांत वाद विवाद होणाऱ्या हरएक विषयाचें महत्व कंपाझिटर लोकांस समजण्याचें चांगलें साधन असतें. सबब त्या साधनाचा आमच्या मुंबईकर कंपाझिटर लोकांनीं चांगला उपयोग केला यांत संशय नाहीं.

Nassick.—We learn that a Money Order Office is to be opened at Nassick from the 1st proximo.

The Government of India is said to have sanctioned a branch railway from Jullum to Khangaon, the latter being one ot the great cotton marts of Central India.

We regret to notice a report from Kamptee that the extreme heat of the weather is beginning to tell fatally on the European troops there, no less than seven deaths having occurred on Wednesday last among the soldiers, through heat-apoplexy. Five of the deceased persons were found dead in their beds.

The Central India times believes that it is decided that the Berars should be totally severed from the Central Provinces in those administrative relations which at present exist, such as the office of Registrar General of Assurances, Inspector General of Prisons, and Superintendent General of Vaccination.

Sir Alexander Grant has been lecturing on Western India, in Edinburgh. He informed the Young Men's Christian Association that in Bombay a married man could not live as a gentleman under £1,000 a year. Things are not quite so bad as that, we hope. There is a kind of gentlemanliness that makes itself manifest through a much smaller salary than that.—*Id.*

A Juvenile Improvement Society.—A Society under the name of "The Juvenile Improvement Society" has been lately established at the Loharchall Street by some young natives of about 12 and 13 years of age. The object of the Society is to improve the members in English composition and conversation. They read essays, in turn, on different subjects, and each member expresses his views on the subject. The president of the Society is Mr. Shitaram Visram.

The Hon'ble Mr. H. Sumner Maine, we are in a position to inform our readers, positively leaves India for good, via Bombay, on the 9th October next. Speculation is rife as to who will be the hon'ble and learned gentleman's successor in the Indian Council; but no selection has yet been made, and the Duke of Argyll has still close on six months before him to decide whom he will send out,—unless in the meantime one is furnished from Serampor.—*Indian Daily News* May 18.

The Hyderabad correspondent of the "Englishman" writes—"The report in the city now is that Sir Salar Jung intends to form a Council of Regency with the sid of some half a dozen noblemen. The plan appears good, but it is doubtful whether it will succeed when it is remembered how general is the dislike to the Minister, and how many are ready to intrigue against him. In Berar the season is said to be the hot test experienced for at least five years."

From telegraphic advices received by a Madras contemporary from Vellore, it appears there was an extreme improbability of disaffection being rife among the native troops at that station. A squabble between two Mahomedan sects would seem to have been the original cause of the rumours, which are said to have reached Madras in a very exaggerated form, and obtained too ready credence. It is very properly suggested, however, that the true state of the case should be accurately explained to the public by the prompt publication of the proceedings of the Committee of Enquiry.

His Excellency the Governor of Bombay has nominated Venayekrao Appasaheb of Koorundwar, to be an additional member of His Excellency's Council for the purpose of making Laws and Regulations only, in the room of His late Highness the Honourable Sir Jowan Singjee, Maharaja of Edur, K. C. S. I. His Excellency has also accepted the resignation by the Honourable Mr. Brown (who went home lately) of his seat in the Council. The appointment and resignation are notified in yesterdays's official "Gazette." Venayekrao Appasaheb, we may mention, is a younger brother of the Chief of Koorundwar, whose estate, yielding an annual revenue of Rs, 1,50,000, is situated in the Southern Mahratta Country. He is spoken of as an intelligent promising man, and we are told is acquainted with English. The Koorundwarkars belong to the great Putwardhan family, several members of which distinguished themselves under the Peishwas as military leaders.

The Abyssinian Medal.—The Commissary General of the Bombay Army, having enquired whether clerks, overseers and inspectors who served with the Abyssinian expedition, were entitled to the medal about to be issued, the Commander-in-Chief has reported to Government that only the Naval and Military forces are entitled to the reward. The decision at the Horse Guards is, His Lordship states, absolute against the non-combatants. Government therefore have negatived the claims of the clerks, &c., though some of these were present at the capture of Magdala. Considering that many, and indeed, the greater part, of those who will get the medal under the above ruling, have not seen a shot fired in Abyssinia, it appears unjust to withhold the decoration from non-combatants who underwent as much hardship as the troops themselves, and this appears to be particularly so in the case of those non-combatants who, in the exigencies of the service, had to be present at the action before Magdala.—*Deccan Herald.*

LADY MAYO.

It is generally understood, says the "Englishman," that Lady Mayo will leave Simla within a few weeks and proceed via Calcutta to England. Various reasons are assigned, but it is believed the truth simply is that the death of her Ladyship's father and the large property which he has left, renders Lady Mayo's presence for a short time in England expedient. The alleged unhealthiness of Simla has nothing to do with the matter—notwithstanding the report just published by the Punjaub Government on its defective sanitation. It is rumoured that Lord Mayo will accompany Her Excellency as far as Calcutta and then take up his residence, chiefly at Barrackpore, for the rains. Simla is very charming to constitutions relaxed by Indian service, but it is said that Lord Mayo finds it rather cramping to a vigorous mind and body fresh from England, and is bent upon looking at things as much as possible with his own eyes. These reports are given for what they are worth.

We are glad to learn that His Excellency the Governor of Madras in Council has sanctioned three Bachelor Scholarships of Rs. 70 per mensem tenable for three years to be awarded to those students who may be desirous of presenting themselves at the M. A. Examination. The nomination is vested in the Syndicate of the Madras University who, we are sure, will try their best to nominate the best men to these scholarships. The liberal views which His Excellency entertains about higher education were alluded to in a previous number of ours and the fonndation of these scholarships is an illustration of the deep interest His Excellency takes in the welfare of the natives of this vast country. His Excellency hopes that this liberality of Government will be supplemented by that of some wealthy citizens of Madras. It is likely that His Excellency will not be disappointed in his expections.

We have been particularly requested by Rao Bahadoor Moroba Cannoba to state for the information of his caste that in consequence of a very few applications from widows having been received up to this time, he has been obliged to modify one of the terms of his advertisement. Instead of females between 20 and 25 years of age being qualified to apply, all widows of whatever age, may make the necessary ap lication until the evening of the 10th June—provided they have no children by their former husbands living.

*Indu Prukash.*

## Local

## वऱ्हाड.

बडनेरापासून उमरावतीपर्यंत रेलवे करणार असें समजतें.

अम्हांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं, इलिचपुरचे पोलिस इन्स्पेक्टर रा० दुनियासिंग यांस १५० रुपये पगार होता तो २०० रुपये झाला.

क्यापटन. बेल साहेब उमरावती जिल्ह्याचे डिपुटी कमिशनर यांची मुलगी आजारी असल्यामुळें ते तीस घेऊन मुंबईस गेले असें वर्तमान समजतें.

जलमपासून खामगांवापर्यंत रेलवे करण्याचे इंडिया सरकारानें पसंत केल्याचें समजतें.

आम्हांस लिहिण्यास फार संतोष वाटतो कीं, यथें कोणी ब्राम्हणानें पुनर्विवाह केल्यास त्या विवाहाचे खर्चाकरितां मेहरबान दिनसाजी भाईसाहेब जुडिशियल एकस्ट्रा आसिस्टंट कमिशनर आणि मेहेरबान शेखइसामुद्दिन साहेब ए० असिस्टंट कमिशनर या उभयतांनीं शंभर शंभर रुपये देण्याचें कबूल केलें आहे असें ऐकितो. व विवाह करण्याकरितां दोन विधूर तयार असल्याचें समजतें.

करजगांव तालुके इलिचपुर येथें यमुना नांवाचे बाईनें घरास आग लावल्यामुळें त्या बाईस मेहेरबान स्प्यान्स्की साहेब डिपुटी कमिशनर यांणीं तीनवर्षें सक्त मजुरीनिशी कैदेची शिक्षा दिली.

एथें अशी गप उठली आहे कीं एथील सर्व लष्कर अलवारास जाऊन, येथें नागपुर प्रांतांतील लष्कर येणार व कांहीं लष्करापैकीं गोरे सैन्य ही येईल असें म्हणतात

सु० प्र०

## अकोला.

अकोल्याचे माजी तहशीलदार मे० बेजनजी साहेब हे मेल्या कारणानें खालीं लिहिल्याप्रमाणें वर्गावर्गी झाली.

रा० त्रिंबकराव यशवंत मेहेकरचे तहशीलदार यांस पहिल्या प्रतीचे तहशीलदार नेमलें व रा० गोविंद राव यशवंत यांस दुसऱ्या प्रतीचे तहशीलदार नेमलें.

क्यापटन मेकंजी साहेब येथील अफीशीयेटींग डे० क० हे अकोट तालुक्याकडे फिरावयास जाणार आहेत.

मे० मिर्जा सुलिमानबेग नवीन नेमलेले नळगावचे तहशीलदार यांनीं आपले कामाचा च्यार्ज घेतला.

हवा ह्या आठवड्यांत अतिशय उष्ण झाली आहे. प्रातः काळीं सूर्योदया बरोबर उष्मा होण्यास सुरुवात होते. मंगळ वारीं व बुधवारीं रात्रीं किंचित पाऊस पडला परंतु तो जसा पडावा तसा पडला नाहीं म्हणून उष्णता अधिक होत आहे. नदीचें पाणी अगदीं आटलें आहे. मेघराज जर अशांत कृपा करील तर फार चांगलें होईल.

रा० नारायण प्रभाकर डे० क० यांचे कचेरींतील रायटर यांस नांदुरा येथें ६०

रुपयांची हेड मास्तरची जागा मिळाली. व नांदुऱ्याचे पहिले मास्तर रा० गणेश अनंत यांस बुलढाण्यास ५० सावर पाठविलें.

येथील सरकारी तारायंत्रांचें आफिस बंद झाल्याचें समजतें.

येथील शाळेचे अ० मास्तर मि० गोर हे मरण पावल्याचें आम्ही पूर्वींच लिहिलें आहे. आतां असें समजतें कीं त्यांचे जागेवर. मे० डारेक्टर साहेब मराठी व संस्कृत जाणणारा कोणी, बी० ए. एम० ए पैकीं आणणार आहेत व त्यांस १५० पगार मिळेल.

बाळापुर तालुक्याचे नायब तहशीलदार रा० भिकाजी चिमणाजी यांस सेकंड क्लास सबार्डीनेटचे अधिकार मिळाले

येथील रेल्वे स्टेशनावर कांहीं फौजदारी खटला उपस्थित झाल्याचें ऐकतों त्याज विषयींची कच्ची हकिकत पुढें लिहूं.

गेल्या अठवड्यांत हैदराबाद कंटिंजेंट पलटणीच्या एका तुकडींतील कांहीं लोकांनीं दंगा केल्याचे आम्हीं पूर्वीं लिहिलें होतें. यांची चौकशी मे० डेविस साहेब यांच्या समोर झाली. एकंदर अरोपी १५ होते पैकीं ७ असामीस दोनदोन वर्षें सक्त मजुरीची कैद व १कास २ वर्षें सक्त मजुरीची कैद व ५० रुपये दंड अशा शिक्षा झाल्या. बाकी सात असामी सुटले.

## Epitome of News.

## वर्तमानसार.

इंडियन डेली न्युज वरून असें कळतें कीं मे. एच समर मेन हे येत्या आक्टोबरचे ९ तारखेस खचीत विलायतेस जाणार. त्यांचे जाग्यावर कोणाची नेमणूक होणार हें अजून समजलें नाहीं.

हैदराबादेकडून इंग्लिश मेनचा एक बातमीदार असें लिहितो कीं सर सालर जंग कांहीं सरदार लोकांच्या साह्यानें कारभाऱ्याची एकमंडळी नेमणार आहेत. हा यांचा बेत बरा दिसतो परंतु तो सिद्धीस जाईल किंवा नाहीं याच्याविषयीं संशय आहे.

श्री०रा० विनायकराव अप्पासाहेबकरंदवाडकर यांस मुंबईच्या कायदे कौन्सिलांत मेंबर नेमलें.

नाशकास पुढील महिन्याच्या १पाहिल्या तारखेपासून मनिआरडरचें आफिस चालूं होणार.

झांझीबारचे सुलतान यांचे प्रधान मागील शनिवारीं मुंबईस आले होते.

आम्हास लिहिण्यास फार आनंद होतोकीं ग्यासकंपनीनें आपले दर कमी केलें.

लिहिण्यास फार दुःख वाटतें कीं ५९ वे रिजमेंटेंतील ३ सोलजरांनीं मागील गुरुवारीं, रात्री ११।१२ चे अमलांत माठे रस्त्यावरील बोहऱ्याचे दुकान फोडून आंत चोरी करण्याचे इराद्यानें शिरले इतक्यांत हकाहाक होऊन पोलिस कान्स्टेबल मि०स्मिथ ह्यांनीं तिघांपैकीं एकास पकडले व दोघे पळून गेले असें पु०अ०वरून कळतें

आमदाबाद आणि खेडा येथील पुरापासून जो तोटा झाला त्या दुःखापासून सोडविण्याकरितां सरकारास रिपोर्ट झाला होता त्याप्रमाणें ता० २ नोवेंबर रोजीं सरकारानें खालीं लिहिल्याप्रमाणें ठराव केला

गुजराथेच्या उत्तर दिशेस पुष्कळ विहिरी पाण्याचे तुफानानें फुटून गेल्या. त्यांचे दुरस्तीचें काम एरिगेशनकडे नाहीं. शेतकरी लोकांकडे आहे कारण या विहिरीवर ते लोक व गुरें पोसलीं जातात म्हणून अमदाबाद आणि खेडा येथील कलेक्टर यांस अशी विनंती केली आहे कीं, एकंदरींत किती विहिरी फूटलेल्या आणि या तयार करण्यास किती खर्च लागेल याजविषयीं यादकरून पठवावी. तारीख २३ मार्च रोजीं खेडा जिल्ह्यांतील अशा विहिरी बांधण्याकरितां ८५०० रुपये सांकशन केलें.

तरुणाच्या सुधारणूकेची मंडळी—याना वाची एक सभा मुंबईस लोहारचाळींत स्थापन झाली आहे. तिच्यामध्यें १२–१३ वर्षांच्या वयांचीं मुलें आहेत. या मंडळीचा उद्देश इंग्लिश भाषेचें ज्ञान वाढाविणें हाच आहे. अशा सभा जर चहूंकडे स्थापन होतील तर फारच चांगलें.

आम्हांस लिहिण्यास अतिशय दूःख वाटतें कीं रा० रा० सदाशिव बल्लाळ गोडबोले उर्फ भाउसाहेब गायकवाड सरकारचे न्यायाधिश यांस नवज्वर होऊन तारीख १६ रोजीं देवाज्ञा झाली. हे गृहस्थ पूर्वीं नगर जिल्ह्यांत १ क्लासचे मुनसफिच्या जागेवर होते व पुढें त्यांची हुषारी पाहून गाईकवाड सरकारांनीं त्यांस न्यायाधिशाची जागा दिली होती. हे स्वभावानें फार चांगले होते. व आपल्या कामांत फार हुषार होते. यांच्या मरणानें यांच्या नातलगास व मित्रमंडळीस व त्यांस जे जाणत होते त्यांस दुख झाल्यावाचून राहणार नाहीं. गाइकवाड सरकारांनीं मेहेरबान होऊन त्यांचा जसा प्रतिपालकेला त्याचप्रमाणें त्यांच्या मुलांचाही करावा हें त्यांस उचित आहे.

सातार तालुक्यांत सुमारें दाहा गांवीं पटकीचा उपद्रव सुरु आहे. यवतेश्वरचे पश्चिम बाजूस आदमासेकोस दीडकोसावर एक लहानसें खेडें आहे त्या खेड्यांतील सर्व लोक कांहीं वाखा झालेलीं माणसें तशीच घरांत टाकून पळून रानांतून राहण्यास गेलीं

मद्रासेंत कडपा या गांवीं सरकाचे हुषार नोकर मे० गोरमन्साहेब अ० इंजिनीयर पब्लिक वर्क्स डिपार्टमेंट यांस उष्णतेनें ता० १४ रोजीं गाठलें आणि ते ४० मिनुटांचे आंत मरण पावले.

हल्लीं हवा फार गरम आहे वारा बराच असल्यामुळें वाटत नाहीं. व हवामापक यंत्रांत पारा ९५अंशावर असतो महामारीचा उपद्रव कमी जहाला असें नाहीं. गेले आठवड्यांत १३ मनुष्यें तिणें नेलीं. शहरांत चांगलें पाणी पिण्यास सुद्धां मिळत नाहीं

शु० सू०

गेल्या सोमवारीं मी० वाईट साहेब दक्षिणेंतलि सरदारांचे एजंट यांणीं पुण्यास सालाबाद प्रमाणें राणी साहेबांचा जन्म दिवशीं दरबार भरवीला होता. यासमयीं ३५० लोक आले होते.

नागपुरास फार उष्णता चालली आहे. असें समजतें कीं, कामटीस मागील बुधवारीं प्रखर उष्णतेनें सात सोलजर मेले व त्यापैकीं पांच तर बिछान्यांत मेलेलेच सांपडले कायहा उष्णतेचा अनर्थ!

रावबहादूर मोरोबा कानोबा यांणीं स्वतांच्या पुनर्विवाहविषयीं जाहीरात दिली होती हें सर्वत्रांस माहितच आहे. त्यांणीं त्या जाहिरातींत आतां कांहीं फेरफार केला आहे तो येणें प्रमाणें पूर्वीं २० वर्षांपासून २५ वर्षांपर्यंत वयाची नवरी मुलगी असली पाहिजे असें लिहिलें होतें, परंतु ते आतां असें म्हणतात कीं ही अट त्यांच्या जाहिरातींत होती म्हणून त्यांजकडे फार अर्ज आले नाहींत. परंतु आतां त्यांणींती अट अगदीं काढून टाकली आहे. आतां कोणत्या ही वयाच्या विधवा स्त्रियांनीं त्यांजकडे अर्ज केला असतां चालेल. मात्र आदल्या घरचें त्यांस जिवंत पोर नसावें.

अहंमदनगर जिल्ह्यांत प्रवरा नदीपासून कालवा बांधून नेण्याचें कामीं तेथील एरिगेशन कडील चीफ इंजिनियर यांणीं ता० १७रोजीं सरकारास तो लौकर बांधण्याविषयीं शिफारस केली. व या कामाकरितां ६ लक्ष रुपयांचे एस्टिमेट केलें आहे तें काम चालीवण्याकरितां सरकारानें हुकूम दिला आणि याचे खर्चाकरितां ६०७० पांच हजार रुपये खर्चण्याची परवानगी दिली.

## Advertisements.

## जाहिरखबरा.

नोटिस—राजश्री नानकराम संतुकराम दुकान खामगांव यास नोटिस देणार गंगाप्रसाद दानमल साहू दुकान खामगांव यांजकडून देण्यांत येते कीं तुम्ही तारीख ११ मे सन १८६९ इसवीची नोटिस दिली ती तारीख २० मिनहुस पावली तिचें उत्तर येणें प्रमाणें.

१. बालकृष्ण यानें तारीख ३ मे रोजीं ४॥. ओझीं नगदीनें त्यानें आपले नावावर आम्हांस विकलीं तो माल आम्हीं समक्ष त्याचे गाडीवर असलेला पारखून सवदा करून घेतला त्यांत तुमचे नावाचा संबंध नाहीं व तो तुमचा गुमस्ता आहे हें आम्हांस माहित नसून त्यानेंही सांगितलें नाहीं व बाळकृष्ण यानें आम्हांपाशीं आणखी असा करार केला कीं उदईक तुम्हास पंचवीस ओझीं याच मालाप्रमाणें मी आणून देईन परंतु त्यांनीं आणून दिला नाहींत त्याचा व आमचा पक्का सवदा नसल्यामुळें याजबद्दल त्याजवर आमचा दावाही नाहीं. व तुम्हांस लिहून कळविण्याचें कारणही नाहीं तुम्हीं लिहिता हो तुमची चूक आहे

२. ६१ ओझांचा सवदा तारीख ३ मे सन १८६९ इसवी रोजीं सायंकाळीं दर ओझ्यास रुपये ८५॥. प्रमाणें माल चांगला अकोट जिल्ह्याचा दुसरे दिवशीं तुम्ही मोजून देण्याचा करार करून आम्हापासून तुम्ही त्याजबद्दल आगाऊ रुपये येक हजार घेऊन गेला असून त्याप्रमाणें तुम्ही अकोट जिल्ह्याचा माल न देतां आमचे तमात खराब बनीचा माल आणून टाकीला तो माल चांगला नाहीं म्हणून आम्हीं तुम्हांस सांगितलें असून तो माल परत घेऊन जाऊन चांगला माल तुम्हीं आम्हास आणून दिला नाहीं आणि दिवसें दिवस रुईचा भाव ज्यास्त होत चालल्यामुळें तुम्ही लालचींत पडून तो चांगला माल आम्हास न देतां नगदीनें विकला आतां भाव कमी झाल्यामुळें आमचे गळीं पडून आम्हांस रुई मोजून घेण्याची नोटिस देता परंतु तुमचे नोटिशींत लिहिल्याप्रमाणें येकही गोष्ट खरी नसून तुम्ही आम्हास कराराप्रमाणें चांगला माल दिला नाहीं सबब आमचे भावाचें नुकसान झालें यास्तव तुम्हस ही नोटिस पावल्यापासून दोन दिवसांत दर ओझ्यास रुपये ५।. प्रमाणें येकसष्ट ओझ्यांचे भावाचें नुकसान व तुम्ही येक हजार रुपये नेले ते व या नोटिशीचा खर्च विनाकारण आम्हांस पडला आहे तो व तुम्ही आमचे तगांत खराब ओझीं आणून टाकिलीं आहेत त्यांजबद्दल भाडें वगैरे आणून देऊन आमची पावती घेऊन जावी आणि तुम्ही आपलीं खराब ओझीं तगांतील घेऊन जावीं त्यां ओझ्यांचे कोणतेही प्रकारें नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांकडे नाहीं हें तुम्हास कळविलें आहे या प्रमाणें तुम्ही सदरील रुपये आणून दिले नाहीं तर करार झाल्याबर तुम्हावर दिवाणींत फिर्याद करून रुपये घेण्यांत येतील कळावें तारीख २९ माहे मे सन १८६९ इसवी.

(सही) गंगाप्रसाद दानमल साहू

दस्तुर खुद.

नोटिस—सखाराम वल्लद रामचंद्र अबुलकर राहणार कुरणखेड तालुके आकोले नोरगाव यास या नोटिसीवरून असें कळवितो कीं, तुम्हाकडेस आमची खाते बाकी ऐन रुपये ७४८६ कंपनी शिवाय व्याज एकंदर रुपये ६८४ जे आहेत ते आज तारखे पासून आठ दिवसांचे आंत दाखल करावे न केल्यास दिवाणींत फियार्द करूं म ग फिर्यादीचा व या नोटिसीचा सर्व खर्च सुद्धां रुपये तुम्हापासून घेण्यांत येतील कळावें तारिख २९ माहे मे सन १८६९ इ०

(सही) हरीसा जानुसा रंगारी दुकान कुरणखेड

दस्तुर खुद.

नोटिस—रामधन असाराम मारवाडी रहाणार मौजे पिंपळगावकाळे तालुके जलगाव यास खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं, मौजे मजकुरीं आमचे वडिलार्जित खासगत घर आहे तें आमचे चुलते गंगाराम मढधे यानें आज सरासरी २५ वर्षें झालीं, समशेरी १२५ रुपयांस, तुमचे रुपयांस व्याज नाहीं. व आमचे घरास भाडें नाहीं. अशा करारानें तुमचे पाशीं गाहाण ठेविलें; व त्याजबद्दल एक दस्त ऐवज ही तुम्हास करून दिला. आतां तें घर आमचे ताब्यांत घेण्याकरीतां सदरील रुपये घेऊन आम्ही तुमचे दुकानीं तीन वार वेळा आलों; परंतु तुम्ही रुपये न घेतां घर व दस्त ऐवज आमचे ताब्यांत दिला नाहीं; याजकरितां या नोटिसीने असें कळवितों कीं, आज तारखेपासून पांच दिवसांचे आंत आपले रुपये घेऊन जाऊन घर व दस्तऐवज आम्हास परत द्यावा. नाहीं तर कायद्या प्रमाणें गाहाण माल परत घेण्या विषयीं व या नोटिशीचे खर्चा सुद्धां फिर्याद केली जाईल कळावें तारीख २९ माहे मे सन १८६९ इसवी.

(सही) खुशाल दामोदर मढधे.

रा० रा० वर्तमान दीपिका कर्ते यांस.—

वि० वि०. महाराज, लिहावयास कारण कीं, आमच्या ज्ञातींतील एक थोर गृहस्थ राव बहादूर मोरोबा कान्होबा, बाळाजी विजयकर यांनीं जी एक जाहिरात लावली आहे. त्या जाहिराती आन्वयें राव बाहादुरांस मी माझा अर्ज आपल्या वर्तमान दीपिके द्वारें पाठवूं इच्छितें. तर पत्रकर्ते महाराज, तो छापून प्रघट करण्याविषयीं आपण अवश्य मेहेर्वानी करावी.

श्री सूर्यवंशी क्षत्रीय पतन परभू ज्ञातींतील कैलासवासी * * यांची मी सून आहे माझ्या भ्रताराचें नांव राजमान्य राजश्री * * आहे. मला वैधव्य प्राप्त होऊन आज सुमारें पांच वर्षें होत आलीं. हल्लीं माझें वय

सुमारें पंचविस वर्षांचें आहे. वैधव्य दशेचीं पाच वर्षें फारच दु:खानें काढलीं. परंतु मागील आठवड्यांत आपल्या सहींचा जाहिरनामा वर्तमानदीपिका पत्रांत वाचून तें पांच वर्षांचें दु:ख पांच मिनिटांत विसरलें. कारण आपणासारखे थोर, कुलीन, मोठा हुद्दा चालविणारे, व मोठा पगार कमावणारे यांच्या सारख्यांनीं आम्हांसारखे दीन प्राण्यांची दया जाणून ज्यापेक्षां पुनर्विवाहास कंबर बांधली आहे त्यापेक्षां आतां आमच्या सुखास पार नाहीं.

असो, आपण सुज्ञच आहां त्यापेक्षां आपणास फार लिहिणें नलगे. परंतु विवाहाची तजवीज कोणते रितीनें व्हावी याविषयीं आपणास थोडी सूचना करितें; व त्याप्रमाणें आपण सिद्धता केल्यास माझे वाढवडील आपणास माझें दान करायास एका पायावर सिद्ध आहेत असें आपण खात्रीपूर्वक समजावें.

### सिद्धतेचें साहित्य.

१ आपल्या काळका देविच्या रस्त्यावरील थोरले वाड्यांत विवाह व्हावा. माझ्या आंगावर किमान पक्ष पन्नास शेर सोनें तरी घातलें पाहिजे. ज्ञाती भोजन एक सहस्र किंबहुना पांचशें पात्र तरी झालें पाहिजे. आपल्या वाड्यांत थोरला मंडप, ग्यासाची आराष, पुण्यांतील पदमजी शेटजींची प्रख्यात मुसलमानीन बाईजी पालख्यावर झालेल्या परभू भोजनाच्या दिवशीं आपणास हात दाखवीत होती, व आपण तिच्या सन्निध बसला होतां तिचें नृत्य गायन असावें.

२ वरातीच्या प्रसंगीं रूप्याचा साज घातलेला एक छानदार घोडा आपणा उभयतांस बसावयास असावा. आपणास थोरला ज्यामा घालावा लागेल. कपाळी बाशींग व मुंढावळी बांधाव्या लागतील. व वराती बरोबर उत्तम वाद्यें, हिलाल, शेंपन्नास गाड्या व घोडे आणि दारूकाम याची रगड असावी. जसें कोणीं म्हणेल कीं, जगत शेटीचे नातवाचीच ही वरात निघाली आहे.

३ लग्न समारंभास व भोजन समारंभास आपल्या ज्ञातीपैकीं कनिष्ट प्रत हे पुढील गृहस्थ तरी असले पाहिजेत.

### नांवनिशी.

नवे वाडीवाले विनायकराव वासुदेवजी बंधूवर्गा सहवर्तमान. रामवाडीवाले वासुदेवजी पांडुरंगजी बंधू वर्गासहवर्तमान. फिरंग्याच्या देवळाजळचे भास्कर सुंदरजी पुत्रांसह वर्तमान. पालवावरील भाऊ रसूलचे चिरंजीव बंधूवर्गा सहवर्तमान. लैनींतले पांडुरंगजी दिनानाथजी बंधूवर्ग व चिरंजीव यांस हवर्तमान. काळका देवीवाले नाना मोरोजी. वकील लोकांपैकीं विनायकराव हरिश्चंद्रजी, हरिशंकर बाळकृष्णजी, पांडुरंग बळीभद्रजी इ० त्रान्सलेटरांपैकीं सरोत्तमजीचे चिरंजीव, बाळदिनाजी, सोकर बापूजी, अनंराव चापाजी वगैरे. ग्रंथकर्त्यांपैकीं शामराव मोरोजी, नारायण केशवजी, कृष्णराव माधवरावजी वगैरे. पत्रकर्त्यांपैकीं सुंदररावजी, बाळकृष्णवासुदेव नारायणजी, नारायण मोरोजी वागळे, इ० हेड कारकुनांपैकीं म्युंनिसिपाल खात्यांतले भास्करजी विश्वनाथजी, हारबर डीफे० स खात्यांतले हरिश्चंद्रजी हरिशंकरजी, टपाल खात्यांतले नारायणरावजी, कमिशनरी खात्यांतले गणपत रावजी राघोजी उगले, मास्तराचे खात्यांतले हरिश्चंद्रजी जनार्दनजी, एग्झिक्युटिव इंजनियर खात्यांतले दिनानाथजी हरिश्चंद्रजी, कलेक्टर खात्यांतले जगन्नाथजी मोरोजी इ० व इतर धंदे चालविणारे म्हणजे स्टांप कागद विकणारे नारायणजी सुंदरजी, नवी वाडीवाले गांवठी वैद्य सदानंदजी मोरोजी, डाक्तर शामरावजी नारायणजी, इंजनेर अनंदरावजी विनायक धैर्यवान तसबीरवाले जी. एस. तालपडे, विलायतेहून आलेले असिस्टंट सर्जन जी इ० याखेरीज, सर्व वाजकर कोठारे ब्रम्हांडकर नवलकर, इ० इ० इ० सहकुटुंब, पुत्र, कन्या, भाऊबंध सोईरे, भाचे, पुतणे इत्यादिकांसहवर्तमान.

### परकीय

रा० रा० विष्णुशास्त्री पंडित, पुनर्विवाह मंडळीचे सर्व सभासद, इंदुप्रकाश कर्ते, वर्तमानदीपिका कर्ते, ज्ञानबोधक कर्ते, मित्रोदय कर्ते, पुण्यांतील ज्ञानप्रकाश व ज्ञानचक्षु कर्ते ठाण्यांतील अरुणोदय कर्ते, सातारा येथील शुभसूचक व महाराष्ट्रमित्र कर्ते अहमदनगर येथील वृत्तवैभव कर्ते, रत्नागिरींतील जगन्मित्र कर्ते इ० इ० इ० तसेंच आपल्या ओळखीचे साहेब, पारशी मुसलमान, वाणी, भाटये सोनार, शिंपी, शेणवी, कायस्थ, भंडारी, भट, भिक्षूक वगैरे मंडळी.

आजपर्यंत मी खडूस बलावीत होतें महिन्यांतून चार वेळां; परंतु आपण हा माझा अर्ज मान्य केल्यावर त्याचें तोंड पहाणार नाहीं. तरी पण वरातीचे रात्री पर्यंत अर्ज मान्य झाल्या दिवसापासून अर्धबोटापेक्षां डोईवर केंस ज्यास्त वाढायाचे कठीणच तेव्हां आपणास तितक्याच वाढलेल्या केंसानिशीं मांडीवर धरून घोड्यावर बसावें लागेल. तर याविषयीं आपणाकडून नकार नसावा.

५ वयानें तरूण, रूपानें सुंदर, शरीरानें नाजुक वर्णानें गोरी, खाण्यांत राक्षसी, निजण्यांत कुंभकर्णी, बसण्यांत जगदंबा, चालण्यांत हत्ती, बोलण्यांत वक्ती, मसलतींत चतूर इष्की करण्यांत फक्कड अशी आहे, तेव्हा आपली उभयतांची हळद निघाल्यावर आपल्या काळका देवीवरील वाड्यांत ज्या दोन गच्या आहेत त्यांपैकीं एकीवर आपणास खुरसी घालून न्यूजपेपर हातीं घेऊन बसावें लागेल. व दुसरे गच्चीवर एक मोठा आरसा ठेवून त्या आरशासमोर मला बसुंद्यावें लागेल व तेथें बसून आपण आपल्या इतिहासांत सुवर्णमय अक्षरांनीं लिहून ठेवण्याजोगत्या पुनर्विवाहाबाबदच्या जितक्या टीका व वर्तमानें त्या न्यूजपेपरांत येत जातील तितकिं मला वाचून दाखविलीं पाहिजेत. व मी मझ्या पुढें ठेवलेल्या आरशांत माझें केस प्रती मिनिटास किती वाढत असतात हें पहात बसेन तसें मला आपण बसूं दिलें पाहिजे.

६ आपण मजसाठीं फंड भरून पेनशनाची तजवीज करावयाचे खटपटींत पडूं नये. कारण मला त्याची जरूरी नाहीं. आपल्या पाठीं एक छोटेखान बहादूर मी पाहून ठेविलाच आहे.

तस्मात अहो, माझे नवीन जन्म देणारे रावबहादूर पतिराज, हीं वरील सहा कलमें आपणास कबूल असतील तर आपल्या गळाबरील लाख रुपयांचे वाडींत आपली भेट घेण्यास मी तयार आहें. आपणास कळावें हे विनंती.

मिती अधिकमास.

आपली आशाधारक

सुंदराबाइ.

---

नोटिस दाजी बळवत कुळकर्णी कसबे पातुरसेखबाबू तालुके अकोलें यांस बाळाजी भोजराज कुळकर्णी पातुरसेखबाबु तालुके अकोलें याजकडून तुम्ही तारीख ६ माहे मे १८६९ ची रजीष्टर करून नोटिस पाठविली ती तारीख १९ मे रोजीं पावली व तींत तुम्ही लिहितां कीं सन १२७७ फसली सालाबद्दल लवाजमा व मुशाऱ्याबद्दल ६२८२८ रुपये येणें असून २५ विठू बिन रामजी तारलावी याचे हातून पावले बाकी ३७८२८ रुपये येणें आहे त्यास वर लिहिलेले ३७८२८ रुपये जे दिवशीं अकोल्यांस तहशीलदार कचेरींत मुशारा घेतला तेच दिवशीं मी खुद्द तुम्हास अकोलें मुक्कामीं बिऱ्हाडी भगवान विदूर यांचे घरीं दिले आहेत तुमचे मजकडे कांहीं नाहीं. सदरील रुपये मजकडून तुम्हास पावलेच नसते तर इतके दिवस तुम्ही कसे स्वस्थ बसला हें आश्चर्य आहे.

(सही) बाळाजी भोजराज कुळकर्णी.

---

## अवलिया.

ह्या नांवाचें नवीन पुस्तक पुणें ज्ञानप्रकाश छापखान्यांत सुंदर ठसे छापण्वर छापून तयार होत आलें आहे. ह्याच्या प्रती वर्गणी अगाऊ भरणारांस येत्या जून महिन्याच्या विसावे तारखेच्या सुमारास रवना करण्यांत येतील. ह्याचीं पृष्ठें सुमारें १३० होतील बुकाचा सांचा मुक्तमाले येवढा होईल. ह्या पुस्तकांतील कथा सरळ आणि सोप्या भाषेनें लिहिली असून संभावित व कुलीन स्त्रियांसही वाचण्यास योग्य अशा प्रकारचें याचें संविधानकही सभ्य आहे. ह्यांत असंभव्य गोष्टींचें विवेचन केलें नाहीं. ज्या गोष्टी व प्रमाद नेहेमी आपल्या डोळ्यासमोर घडतात त्याच चित्तवेधक रीतीनें कथन केल्या आहेत. ज्यांची उदार आश्रय देण्याची इच्छा असेल त्यांणीं आमचे नांवावर पोष्टपेड पत्रें पाठवावीं नाटपेड पत्रें घेतली जाणार नाहींत. किंमत १ रुपया पडेल. व डा० ह० पडणार नाहीं.

तारिख २१ माहे मे सन १८६९.

विनायक बाळकृष्ण दामले,

विश्रामबागे नजीक शेवडे यांच्या बोळांत गंगाधर शास्त्री साठे यांच्या वाड्यांत.

---

## पाहिजेत.

### मराठींत तयार कंपाझिटर.

आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्याकरितां मराठींत टाइप जुळणारे जुने महितगार दोन चपल कंपाझिटर पाहिजेत. पगार त्यांचे हुशारीप्रमाणें १५ पासून २० पर्यंत मिळेल. ज्याची येण्याची इच्छा असेल त्यांनीं लवकर अकोल्यास येऊन आम्हास भेटावें किंवा अर्ज पाठवावे.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

---

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचे बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्धआणा प्रमाणें व्याज द्यावें लागेल. ता० १० माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे

मालक.

---

## वर्गणीदारांस विनंती.

गेल्या वर्षाचे आकटोबर महिन्यांत आम्ही आकोल्यास वऱ्हाडसमाचार पत्र सुरूकेलें. त्यास वर्ष होऊन गेलें तर आगाऊ वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं.

वऱ्हाडसमाचाराचे

मालक.

---

आक्ट.

सन १८६८चा ९वा

पेशे व धंदे यांवरील कराविषयीं

किंमत च्यार आणे.

---

## नादारी प्रकरणीं नियम.

' हें पुस्तक आमचे छापखान्यांत नुकतेंच छापून तयार झालें आहे. वऱ्हाडांतील न्यायाच्या कोर्टांत हे नियम चालतात. किंमत ८६ सहा आणे व डाक हाशिल एक आणा पडेल. न. स. म्यानेजर

---

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to remind our subscribers that their Subscriptions, for the present year, should be remitted as early as possible, otherwise, we would, however reluctantly, be under the necessity of ceasing to transmit the paper to their addresses. We believe that this reminder will not fail to arouse the sympathies of our Constituents in the country and bring about speedy remittances from defaulting Subscribers.

*Proprietors of Berar Samachar*

---

| किमतीचे ठराव. | रु. | अ |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास… … | १ | ० |
| साल अखेर … … … | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ … … | ३ | ८ |
| सहामाही अखेर … … | ४ | ० |
| फुटकळ एक अंकास … … … | ० | ६ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालअखेर ३ रु० ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी.

नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत… … … १ रुपया

१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०।०६

एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

---

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छापून प्र० केलें.